
साप्ताहिक
# साधना
१० मार्च ८४ / दोन रुपये

## पंजाब आसामच्याच मार्गाने जाणार!



## शरच्चंद्रांच्या कादंबऱ्या

साप्ताहिक

# माणूस

वर्ष : तेविसावे

अंक : बेचाळीसावा

१७ मार्च १९८४

किंमत : दोन रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ

संजय पवार

## सप्रेम नमस्कार, माणूस

### दोन शरद – दोन मार्ग

दिनांक १४ मार्च १९८१ शनिवार, निपाणी गावाबाहेर, पुढे आंदोलन-नगर ह्या नावाने ओळखल्या गेलेल्या भूमीवर एकाग्र-चित्त विराट शेतकरी व तंबाखू स्त्री-पुरुष कामगारांच्या समुदायापुढे शरद जोशी शेतकऱ्यांच्या आंदोलनातील एका नव्याने उघडावयाच्या आघाडीची सूत्रबद्ध रूपरेषा काहीशा भारावलेल्या तरीही आत्मविश्वासपूर्ण स्वरात समजावून सांगत होते. सफेद झब्बा व जीनची निळी पँट घालणाऱ्या त्या तरुणाच्या मुखातून शेतीविषयक तर्कशुद्ध लखलखीत अर्थशास्त्र सामान्य शेतकऱ्याला समजणाऱ्या सोप्या भाषेत प्रगल्भपणे प्रकटत होते.

माझ्या दृष्टीने शरद जोशींकडे आदराने आकर्षिले जाण्याची दोन मुख्य कारणे होती. पहिले म्हणजे इतर उद्योगांप्रमाणे शेतीलाही उत्पादनखर्चावर आधारित योग्य भाव मिळण्याबाबत त्यांनी भारतीय शेतकऱ्याला दिलेली पायाशुद्ध विचारसरणी आणि दुसरे महत्त्वाचे कारण हे की, ह्या आपल्या तर्कसंगत व भारतीयच नव्हे तर कोणत्याही अविकसित देशातील शेतीला वरदायी ठरू शकणाऱ्या स्वच्छ विचारसरणीवर दृढ विश्वास ठेवून, महिना रु. ४५०००/– ची परदेशातील सुस्थिर, सुप्रतिष्ठित उच्चाधिकारावरील नोकरी सोडून, खांद्यावर नांगर घेऊन कोरडवाहू शेतीत पाय रोवण्याची त्यांची मर्दानी धडाडी!

१९७६–७७ मध्ये नोकरीला रामराम ठोकून शेतीचा स्वीकार केल्यानंतरपासून निपाणी आंदोलन उभे करेपर्यंतचा प्रथम शरद जोशी व त्यानंतर 'शेतकरी संघटने'चा इतिहास 'माणूस' नेच आम्हाला कळविला होता. (इतर बाबतीमधील 'मित्र' पत्रे ह्या विषयात मात्र 'परकी' बनली.) एकदा घेतलेल्या भूमिकेवरून न ढळणारी निष्ठा, विचारांमधील सातत्य व उत्तरोत्तर वाढणारी परिपक्वता, शासनाच्या सूडापोटी होणारे अत्याचार, लाठीमार, गोळीबार व बदनामी-मोहीम यांतूनही न दबता झळाळून उठणारी विजिगीषु अस्मिता व न्याय मिळवून देण्याचा प्रखर आत्मविश्वास हे अद्वितीय नेतृत्वाचे गुण शरद जोशींच्या निपाणी येथील २३ दिवसांच्या 'हायवे' वरील अस्तित्वात प्रत्यक्ष अनुभवलेच.

भारतात परतल्यानंतर दोन वर्षे उलटण्यापूर्वीच उभारलेली व प्राणांतिक उपोषणासह सर्वस्व पणाला लावून यशस्वी केलेली तीन कांदाआंदोलने, त्यानंतर नासिकचे ऊस-आंदोलन व त्यानंतर हे तंबाखू-आंदोलन. ऐकून असलेल्या भव्यतेवर शिक्कामोर्तब करणारे ध्येयवादी माणसाच्या निष्ठेचा अन् निग्रहाचा निर्वाळा देणारे. निपाणी आंदोलनाने शोषणकर्त्या निर्दय दलालांना फेडरेशनच्या रूपाने शह मिळाला हे आंदोलनाचे यश निश्चितच आहे हे काळ पटवून देईलच.

त्यानंतर शेतकरी संघटनेची सटाणा, परभणी येथील अखिल भारतीय 'शेतकरी तितका एक' अधिवेशने, दूधभात-आंदोलने, शरद जोशींचा 'राष्ट्रीय शेतकरी एकात्मकता' साधणारा पंजाब-दौरा हे कार्यक्रम त्यांच्या ठायी एकवटणाऱ्या 'शेतकरी निष्ठे'ला पोषकच आहेत.

आता अशाच दुसऱ्या ध्येयवादी शरदची ओळख–सामाजिक विकासाचा वसा घेऊन आलेल्याची!

दिनांक २८ जानेवारी १९८२–देवगड मुक्कामी देवगड कॉलेजच्या वार्षिक स्नेहसंमेलनास प्रमुख पाहुणे होते आमदार अमृत-

दादा राणे व प्रमुख वक्त्यांचे नाव होते बॅरिस्टर शरद पालव. त्यांची ओळख करून देताना प्रारंभी प्राचार्य गोपाळराव मयेकरनी सांगितले की, बॅरिस्टर शरद पालवनी लंडनमधील स्वतःच्या सुस्थापित वकिलीच्या व्यवसायाला रामराम ठोकून कोकणच्या भूमिपुत्राच्या उन्नतीच्या कार्याला वाहून घेण्याचे ध्येय समोर ठेवले आहे व त्या हेतूने ते भारतात नुकतेच परत आले आहेत. ह्या त्यांच्या परिचयाने जमलेल्या स्थानिक मूठभर समुदायाला मोठे आश्चर्य वाटलेले दिसून आले. मला शरद ह्या नावानेच चक्रावून टाकले. वाटले शरद ह्या नावातच मातृभूमीवरील प्रेमाचे कुंड धगधगत असावे.

बॅरिस्टर शरदरावांनी सांगितले की, लंडनच्या उच्चभ्रू वातावरणात वावरत असतानादेखील आपल्याला कोकणचीच सतत ओढ असे व त्या ओढीखातरच आपण इकडे परत आलो आहोत. इथे राहून येथील गरीब समाजाची काही सेवा करायची इच्छा आहे व सार्वजनिक कार्याला मी दादांच्या म्हणजे आमदार राणेंच्या मार्गदर्शनाखाली प्रारंभ करणार आहे. त्यासाठी उपस्थितांचे आशीर्वादही त्यांनी प्रार्थिले.

नंतर सुमारे अर्धा-पाऊण तास 'इंग्लंडमधील संसद व न्यायव्यवस्था' ह्याविषयी त्यांनी खूप मनोरंजक व ज्ञानात भर टाकणारी माहिती सांगितली. तेथील समाजजीवनावर प्रकाश टाकणारी बरीचशी माहितीही त्यांनी मराठी सतत बोलायची सवय सुटल्याने थांबत थांबत पण सोप्या भाषेत सांगितली. आपल्या सार्वजनिक कार्याविषयीच्या कल्पना अगर दिशा याविषयी काहीही न बोलता त्यांनी आपले भाषण संपवले. अखेर ते कॉलेजचे स्नेहसंमेलन तर होते.

पण माझ्या मनात काही शंका भिरभिरून गेल्या. निःस्पृह जनसेवेसाठी सत्ताधारी पक्षाच्या आमदाराचे मार्गदर्शन आवश्यक आहे काय? स्वतः अलिप्तपणे येथील प्रश्नांचा अभ्यास करणे जरुरीचे नाही का? प्रथम निःपक्षपातीपणे समतोल व चिकित्सक वृत्तीने ह्या भागाचा, येथील प्रश्नांचा सूक्ष्म अभ्यास करून मागासलेपणाच्या कारणांचा मागोवा घ्यायला नको का? स्वतंत्रपणे लोकांमध्ये मिसळल्याखेरीज विकासाची नेमकी दिशा निश्चित करणार कशी व ह्या दिशेने स्वतःस झोकून देणार कसे? जर आमदारांचेच मार्गदर्शन घ्यायचे तर आजवर त्यांच्या हातून विकास का होऊ शकला नाही, हे अधिकाराने त्यांना विचारणार कोण?

गेल्या दोन वर्षांत काही प्रश्नांची उत्तरे मिळाली आहेत. बॅरिस्टर शरद पालव यांची कोकण विकास महामंडळाचे अध्यक्ष म्हणून शासनाने नेमणूक केलेली आहे. मुंबईमधील कार्यालयात ते अधिकारारूढ झाले आहेत. कोकणविकासाचा कार्यक्रम तेथूनच सुरू होतो व तेथेच त्याची अखेर होते हा आजवरचा अनुभव आहे. कधीकधी आमदारसाहेबांच्या जोडीने बॅरिस्टरसाहेबांची गाडीही कोकणच्या लाल मातीत लोळून जात असेल. विकासाच्या गाडीची गती मात्र कुंठीतच आहे. 'पत्र नव्हे मित्र' मध्ये बॅरिस्टरनी जाहीर केलेला कोकण विकासाचा कार्यक्रम वाचल्याचे स्मरते. विकास खेडोपाडी कधी पोचणार? बॅरिस्टर शरदरावांची ध्येयाकडे वाटचाल 'फोर व्हीलर' मधूनच होणार काय?

५ मार्च — शाम वसंतराव वैद्य
रत्नागिरी

---

¤ 'साप्ताहिक माणूस'च्या गेल्या काही अंकांमध्ये श्री. गो. रा. जोशीलिखित 'नाट्यपंढरी' ह्या शीर्षकाखाली २० व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळातील नाट्यसृष्टीतील काही हृद्य आठवणी वाचावयास मिळाल्या आहेत. आठवणी वेचक व भावनाप्रधान असतातच; पण त्याहीपेक्षा माझ्या दृष्टीने त्यांना ऐतिहासिक महत्त्व असते.तेव्हा थोडीशीही विसंगती राहू नये यास्तव २५-२-१९८४ च्या अंकामधील एक अल्पशी चूक आपल्या निदर्शनास आणण्यासाठी हे पत्र पाठवीत आहे.

केशवराव भोसले व बालगंधर्व या संगीत रंगभूमीवरील अत्यंत लोकप्रिय नटांनी एकत्र येऊन 'मानापमान' नाटकाचा जो संयुक्त प्रयोग ८-७-१९२१ रोजी मुंबई येथील बालीवाला थिएटरात करून दाखविला तो दिवस 'मंगळवार' म्हणून उल्लेखिलेला आहे. तो 'मंगळवार' नसून 'शुक्रवार' होता असे वाचावे. ८-७-१९२१ ही तारीख बरोबर आहे हे मी इतर संदर्भग्रंथांवरून सांगू शकतो. तेव्हा ८-७-१९२१ चा वार 'शुक्रवार' च होता हे निश्चित.

७ मार्च — गो. म. आगासकर
मुंबई

---

## गौरवाचा ठराव

---

साप्ताहिक 'माणूस' पुणे,

¤ आपला दि. १८ फेब्रुवारी ८४ चा 'माणूस' अंक आम्हीं विल्ये ग्रामस्थांनी वाचला. गेली २।। ते ३ वर्षे आम्ही ग्रामस्थ मंडळी विल्ये गावच्या विकासासाठी प्रयत्न करत आहोत; परंतु महाराष्ट्रपातळीवर अशा वर्तमानपत्रांतून कसलीच माहिती आलेली नव्हती; परंतु आपल्या साप्ताहिकाने 'गोष्ट विल्ये गावची, गोष्ट कोकण विकासाची' हा प्रा. वैजनाथ कळसे यांचा लेख छापून आम्हा सर्व ग्रामस्थ कार्यकर्त्यांचा उत्साह द्विगुणित केला, धन्यवाद!

या संदर्भात विल्ये गावात दि. २३-२-८४ रोजी ग्रामसभा घेऊन आपल्या गौरवाचा ठराव पास केला.

— विल्येगावचे प्रमुख ग्रामस्थ

कार्यकर्ते

१. जगन्नाथ रामचंद्र देसाई
२. चंद्रकांत वामन देसाई
३. नंदकुमार वामन देसाई
४. गंगाराम सोनु कांबळे
५. महादेव काशिराम कांबळे
६. बालकृष्ण वामन देसाई
७. विनय बालकृष्ण देसाई
८. सुधाकर महादेव देसाई
९. प्रा. वैजनाथ कळसे
१०. डॉ. ज. बा. मोकाशी

२३ फेब्रुवारी ८४ — 'ग्रामरचनाकेंद्र'
विल्ये ग्रामस्थ, मु. विल्ये
पो. तरवळ, जि. रत्नागिरी

□

# ‘राजहंस’चा नवा उपक्रम

राजहंस प्रकाशनने नुकतीच एका नवीन उपक्रमाला सुरुवात केली. प्रत्यक्ष कारखान्याच्या आवारातच पुस्तकांचं प्रदर्शन आणि विक्रीकेंद्र काही वेळापुरतं उभं केलं होतं.

या उपक्रमाची सुरुवात झाली प्रकाशनव्यवसायातल्या नेहमीच्या अडचणीमुळे— ‘पुस्तकं लोकांपर्यंत पोचतच नाहीत.’ दररोज वेगवेगळ्या प्रकाशनसंस्थांतर्फे इतकी प्रचंड पुस्तकं प्रसिद्ध होत असतात की, त्यातली टिकाऊ आणि टाकाऊ पुस्तकं वेगळी काढणं हेसुद्धा या व्यवसायातल्या काही लोकांनाच जमू शकतं. पुन्हा चांगली पुस्तकं जी थोडी-फार निघतात ती बहुतेक वेळा जास्त किंमतीमुळं वाचकांच्या हातात क्वचितच पडतात. म्हणून चांगली पुस्तकं काढणं, ती लोकांपर्यंत पोचवणं आणि त्यासाठी किंमती आटोक्यात आणणं हे दिवसेंदिवस फारच अवघड होत आहे. याला उत्तर शोधण्याचा एक प्रयत्न म्हणून हा राजहंसचा नवा उपक्रम आहे.

आज कारखान्यांमध्ये फार मोठ्या संख्येनं सुशिक्षितवर्ग सामावला जात आहे. हा मोठा गट दिवसेंदिवस कारखान्यातील नोकरीच्या व्यापामुळे वाचनाच्या सवयीपासून आणि आवडीपासून दूर जात आहे. या विशिष्ट वर्गासाठी काय करता येईल असा विचार करताना कारखान्याच्या आवारातच पुस्तक प्रदर्शन भरवण्याची कल्पना सुचली.

प्रत्यक्ष या कल्पनेवर काम करायला सुरुवात केली तेव्हा कारखान्यातील अधिकारीवर्गाने या उपक्रमाला अतिशय चांगला प्रतिसाद दिला आणि अशा प्रकारचे कार्यक्रम ही कारखान्याची एक सांस्कृतिक गरजच आहे असं मत व्यक्त केलं.

पुणे औद्योगिक परिसरातील महिंद्र ओवेन या कारखान्यात ७ मार्चला पुस्तकप्रदर्शनाचा पहिला कार्यक्रम झाला. वेगवेगळ्या प्रकाशनांची सुमारे ७०० पुस्तकं या प्रदर्शनात होती. बालसाहित्य, संतवाङ्मय, ऐतिहासिक पुस्तकं, चरित्रवाङ्मय, ललितसाहित्याबरोबरच तांत्रिक पुस्तकांचाही या प्रदर्शनात समावेश होता. त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे सर्व पुस्तकं सवलतीच्या दरात विकली जात होती.

महिंद्र ओवेन या कंपनीचे जनरल मॅनेजर श्री. बेंगाली, पर्सोनल मॅनेजर श्री. होनप, वेल्फेअर ऑफिसर श्री. सहस्रबुद्धे आणि कंपनीचे महाराष्ट्र सरकारचे ‘गुणवंत कामगार’ पुरस्कार मिळालेले श्री. येळकर यांनी जातीनं संपूर्ण कार्यक्रमात लक्ष घातलं. त्यांच्या सहकार्यामुळंच या उपक्रमातला हा पहिला कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

उद्घाटनानंतरच्या प्रदर्शन–विक्री कार्यक्रमाला कंपनीच्या कामगारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सुमारे ४००/५०० कामगार उत्साहानं पुस्तकं उलथी–पालथी करत होते, हवी ती पुस्तकं नोंदवत होते. प्रदर्शनातून बाहेर पडताना बहुतेकांच्या हातात खरेदी केलेली नवी पुस्तकं दिसत होती.

याच कार्यक्रमात राजहंस प्रकाशनतर्फे कंपनीतील गुणवंत कामगार व दहावीच्या परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवलेल्या कामगारांच्या सहा मुलांना काही पुस्तकं भेट दिली.

पहिला कार्यक्रम तर असा उत्साहानं यशस्वी पार पडला आहे. यातून एक गोष्ट लक्षात आली की, चांगल्या दर्जेदार पुस्तकांना वाचकवर्ग कमी आहे हे जसे खरे, तसेच ही पुस्तके वेगवेगळ्या माध्यमातून त्या विशिष्ट वाचकापर्यंत पोचवायला हवीत. अनेक प्रकाशनसंस्था मर्यादित प्रमाणात हे काम करतच आहेत; पण तेवढेच काम पुरेसे नाही. अशा प्रकारचे विशिष्ट वर्गासाठी केले जाणारे नेमके कार्यक्रम या दृष्टीने म्हणूनच फार महत्त्वाचे आहेत.

असे पुस्तक प्रदर्शनाचे कार्यक्रम महिन्यातून दोनदा वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये करण्याची ‘राजहंस प्रकाशन’ची कल्पना आहे. अर्थात कारखान्यातील अधिकारी आणि कामगार वर्गाकडून मिळणाऱ्या सहकार्यावरच हे अवलंबून आहे. पहिल्या कार्यक्रमाला मिळालेल्या प्रतिसादामुळे आता उत्साहही वाढला आहे. कारण बारा तारखेला हिंदुस्तान अँटिबायोटिक्स या कंपनीत झालेल्या दुसऱ्या कार्यक्रमात पुस्तकांची संख्या दोन हजार होती !

—प्रतिनिधी


अलिप्तपणे तरी भेदकतेने
घडवलेले बिहारच्या
माणसाचे दर्शन.

**पूर्णिया**

अनिल अवचट

बारा रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

राष्ट्रवादी भूमिकेतून
नव्या क्षितिजांचा
घेतलेला शोध.

**बलसागर**

श्री. ग. माजगावकर

तीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

# अनवट

## □ २५ व्या कलमाचा कार्यक्रम !

अकाली दलाच्या धमक्या, मोर्चे, हिंसाचार, सुवर्णमंदीर हे विषय आता जुने झाले. अकालींनाही त्याचा कंटाळा आलेला दिसतोय. आता त्यांनी घटनेचे २५ वे कलम जाळण्याची टूम काढलीय ! २७ फेब्रुवारी रोजी त्यांनी संसदेसमोर २५ व्या कलमाची प्रत जाळण्याचे जाहीर केले. मात्र प्रत्यक्ष काम संसदेपासून १ किं. मी. अंतरावरच्या गुरुद्वारा बांगलासाहिबमध्ये फाटक लावून त्यांनी प्रत जाळली. मग बाहेर येऊन अटक करवून घेतली. आता सर्वत्र हा कार्यक्रम नियमित होणार आणि अटकसत्र सुरू होणार आहे.

हे २५ वे कलम म्हणजे आपल्या 'शीख कौम'चा अपमान आहे असे त्यांना वाटते. त्या कलमाच्या १ ल्या विश्लेषणानुसार त्यांना हिंदू म्हणूनच गणले गेले व हिंदूंचे विवाह, वारसाविषयक कायदे शिखांनाही लागू होतात. याला अकालींचा विरोध आहे. चंदीगडच्या 'ट्रिब्यून' या दैनिकाने या संदर्भात अनेक कायदेतज्ज्ञांच्या मुलाखती घेतल्या. त्या वेळी मनजितसिंग खैरा (अकालीदलाचे कायदासल्लागार) यांनी अकालींची भूमिका स्पष्ट केली. ते म्हणतात, २५ व्या कलमातील क्र. २ च्या विश्लेषणात हिंदूंची (म्हणजे शिखांची) सर्व धार्मिक स्थाने सर्व जातींना खुली राहतील असा उल्लेख आहे. शीखधर्माच्या क्रांतिकारी कार्याचा हा अपमानच आहे.' शीखसमाजातील काही प्रथांमुळे मुलीला सासरच्या मिळकतीत वाटा मिळावा (माहेरच्या नव्हे.) अशी तरतूदही त्यांना पाहिजे. यासाठी वेगळा शीख व्यक्तिगत कायदा हवा आहे.

असा कायदा अकाल तख्तशी चर्चा करूनच बनविला पाहिजे आणि तख्तच्या आदेशांचे पालन व्हावेच लागेल असा खैरा यांचा आग्रह ! अकालीदलाचे एक समर्थक जी. एस. ग्रेवाल यांनी २५ व्या कलमात काही वावगे नसल्याचे स्पष्ट केले. हिंदू विवाहकायदा शिखांनाही लागू करण्याबाबत ते म्हणतात– शिखांसाठी वेगळा असा कोणताही व्यक्तिगत कायदा नाही, याबाबत धार्मिक नियंत्रण अनिष्ट आहे.

२५ व्या कलमामुळे शिखांना आयकर व व संपत्तीकरातील अनेक फायदे मिळतील. १९०९ च्या आनंद विवाह कायद्याचा अपवाद वगळता सर्व शिखांसाठी स्वतंत्र असा व्यक्तिगत कायदा कधीच नव्हता.

गुरुग्रंथसाहेबात किंवा दशमग्रंथातसुद्धा अशा प्रकारच्या नियमांचा काही उल्लेख नाही असे मत पंजाबचे अॅडव्होकेटजनरल भागवतसिंग सिधू यांनी व्यक्त केले. पंजाबमधील जुन्या प्रथांचे कायद्यात रूपांतर केल्यास ते मध्ययुगीन सरंजामशाहीचे पुनरुज्जीवन होईल असेही ते म्हणाले.

वस्तुतः शिखांमध्येही अनेक जातीय संघर्ष आहेत. त्यामुळे २५ व्या कलमाला दुसरे विश्लेषण जोडावे लागले असे अनुपम गुप्ता यांनी सांगितले. १९४९ मध्ये पूर्वपंजवातल्या काग्रेसमंडळाने प्रस्ताव पास करून शिखांमधल्या मजहबी, रामदासी, कबीरपंथी शिकलगार अशांसारख्या मागासवर्गीय अनुसूचित जातीत समाविष्ट करावे अशी शिफारस केली होती. त्यानुसारच २५ व्या कलमात तशी तरतूद केली आहे. ग्रामीण भागात जाटशीख आहेत. हिंदू व्यक्तिगत कायदा नसेल तर ते आपल्या स्त्रियांना कधीच समान हक्क देणार नाहीत असे श्री. गुप्ता यांनी म्हटले.

## □ अजून एक नवे खाते !

१९८४–८५ चे अंदाजपत्रक सादर झाले. या वर्षापासून सातव्या पंचवार्षिक योजनेवर विचारांना सुरुवातही झाली आहे. या योजनेचे एकंदर स्वरूप ठरविण्यात केंद्र सरकारच्या आर्थिक सल्लागार समितीच्या (इकॉनॉमिक अॅडव्हाइसरी कौन्सिल) शिफारशींचा बराच प्रभाव पडतो. समितीने नुकत्याच आपल्या काही शिफारशी केल्या. त्या राज्यसरकारे व निवडक संस्थांकडे विचारार्थ पाठविल्या आहेत.

विकासयोजनांसाठी जास्तीत जास्त विकेंद्रीकरण पाहिजे यासंबंधी समितीने एक महत्त्वाचा मुद्दा मांडला आहे. राज्यस्तरावरची योजना आखली तरी ती सफल होऊ शकत नाही. (विशेषतः शेतीच्या बाबतीत). कारण, प्रत्येक राज्यातील भिन्न विभागांची गरज व क्षमता वेगवेगळी असते. म्हणून शेती उत्पादन वाढविण्याच्या योजनेसाठी प्रत्येक विभागाची हवामान, पिके पाहून त्याची उद्दिष्टे ठरवावीत. इतर बाबतीतही हे लागू आहे. यासाठी समितीने राज्यसरकार व जिल्हा प्रशासन यांच्या दरम्यान अजून एक विभागीय खाते निर्माण करावे व त्याच्याकडे विभागाची योजना बनविण्याचे काम व त्याची अंमलबजावणी सोपवावी असे म्हटले आहे. (डिव्हिजनल डेव्हलपमेंट अॅथॉरिटी) या खात्याकडे राज्ययोजनेतील एकतृतीयांश पैसा दिला जावा अशी सूचना आहे.

यासंबंधी मद्रासमध्ये २० फेब्रुवारीला तज्ज्ञांचा एक परिसंवाद झाला. त्यात या नवीन खात्याच्या निर्मितीला विरोधच करण्यात आला. तज्ज्ञांचे म्हणणे असे की, आहे त्या परिस्थितीतच सत्तेचे विकेंद्रीकरण नीट झाले नाही. मग अजून एक मध्यस्थ संस्था स्थापून काय साधणार ? आधीच्या स्थानिक संस्थाच अधिक बळकट कराव्या. सध्याच्या प्रगत तंत्रज्ञानाच्या युगात स्थानिक नियोजनावर अधिक भर देणे कितपत योग्य आहे ? शेवटी योजनाप्रक्रियेमध्ये राजकीय हेतू, हस्तक्षेप व हितसंबंध यांचाही विचार आता केला पाहिजे !

## □ १९९० स्पेस–स्टेशन्स

अंतराळसंशोधनाच्याबाबत आपल्या कानावर जास्त करून वरवरच्या चमत्कृतियुक्त किंवा राजकीय–लष्करी हेतूने प्रेरित अशाच बातम्या येतात. अमेरिका व रशिया यांच्यात अंतराळ–संशोधनासंबंधी राजकीय–लष्करी वर्चस्व मिळवण्याच्या दृष्टीने स्पर्धा चालू आहेच. मात्र त्याचबरोबर शुद्ध वैज्ञानिक संशोधनाच्याबाबतही या दोन देशांत (किंवा पूर्व–पश्चिम यात) स्पर्धा चालू आहे !

येत्या दोन वर्षांत रशिया अवकाशात

अंतराळस्थानक उभारणार असून त्यात सहा तळ असतील. पृथ्वीच्या जैविक वातावरणाचा, खगोलशास्त्र व 'इतर' अभ्यास येथून केला जाईल. सॅल्यूत–७ हे अंतराळस्थानक दोन वर्षांपासून अवकाशात आहेच. अशा अवकाशस्थानकातून उपग्रहांची देखभाल व दुरुस्ती करता येईल. या अंतराळस्थानकामध्ये माणसेही असतील. सोयूझ यानाद्वारे दीर्घकालीन किंवा दर आठवड्याला एक चक्कर असा पृथ्वी व अंतराळस्थानकदरम्यान संपर्क राहील.

१९९० पर्यंत अमेरिकासुद्धा अशा प्रकारचे अंतराळस्थानक उभारणार आहे. पृथ्वीपासून ३०० कि. मी. अंतरावरील या स्थानकामध्ये दुरुस्ती, प्रयोगशाळा तसेच काही वस्तू तयार करणे यांचा समावेश आहे.

## □ सौरवाऱ्यांचा शोध

मात्र याहीपेक्षा वैज्ञानिकदृष्ट्या महत्त्वाचा प्रकल्प अमेरिका, युरोपीय राष्ट्रे व जपान यांच्या सहकार्याने १९९० पर्यंत चालू होईल. या योजनेनुसार पृथ्वीभोवतालच्या विद्युत्–चुंबकीय ( इलेक्ट्रोमॅग्नेटिक ) क्षेत्रासंबंधी ९ उपग्रहांद्वारे संशोधन होईल.

सूर्य आपल्या सरळ रेषेत सर्व ग्रहांना विद्युत्–चुंबकीय शक्तीने जोडून ठेवत आहे. पृथ्वी व सूर्य यांच्यातील पोकळी ही प्लड्मा द्रव्याने पूर्ण आहे. 'प्लड्मा' म्हणजे आयनभारयुक्त कण. यांच्यामुळे पृथ्वीवरील हवामानात बदल, भू–अवकाशावरील परिणाम होतात.

नऊ उपग्रहांपैकी ५ युरोपियन, ३ अमेरिकन व १ जपानी उपग्रह पृथ्वीभोवतालच्या अंतराळातील एक एक भाग वाटून घेऊन या प्लड्मा व त्याच्या परिणामांबद्दल माहिती जमा करतील. अमेरिकेची तीन प्रयोगयाने पृथ्वीच्या वरच्या टप्प्यावर दीड कि. मी. अंतरावर असतील. सूर्याकडून येणाऱ्या सौरवाऱ्यांचा ते अभ्यास करतील. ध्रुव व विषुववृत्त प्रदेशावरील अंतराळयाने या प्लड्माचा पृथ्वीच्या चुंबकीयक्षेत्रात किती प्रमाणात व कसा प्रवेश होतो याचा अभ्यास करतील. जपानचे यान खालच्या टप्प्यात राहून पृथ्वीच्या चुंबकीयक्षेत्राच्या 'शेपटा'चा अभ्यास करणार.

सौरवारे ( सोलार विंड ) कसे निर्माण होतात, त्यांच्या हालचाली कशाने नियंत्रित होतात यांची माहिती मिळविणे व सूर्याच्या प्रभावाने निर्माण होणाऱ्या दर ११ वर्षांच्या सौरचक्रासंबंधी काही थांग लागतो का हे पाहण्याचा या वेळी प्रयत्न होईल. अर्थशास्त्रातील तेजी–मंदीसारख्या घटनांचा सौरचक्राशी संबंध लावतात.

अमेरिकेच्या शास्त्रज्ञांचा याबाबत एक अभिमानाचा दावा आहे. रशियाचे अंतराळातील नवे प्रयोग हे आधीच्या प्रयोगांच्या अनुषंगानेच असतात, तर अमेरिका प्रत्येक नवीन प्रकल्प नव्या क्षेत्रातच सुरू करते !

## □ विक्रमासाठी खेळत नाही

फेब्रुवारीमध्ये कलकत्त्याला जी. डी. बिर्ला करंडक आंतरराष्ट्रीय डबल–विकेट क्रिकेटस्पर्धा झाल्या होत्या. मायकेल होल्डिंग व जोल गार्नर या वेस्ट इंडियन खेळाडूंनी करंडक जिंकला. या वेळी ऑस्ट्रेलियाचा शैलीदार व तुफान जलदगती गोलंदाज डेनिस लिलीसुद्धा आला होता. त्या वेळी दिलेल्या एका मुलाखतीत त्याने आपण क्रिकेटचा खेळ प्रत्येक पातळीवर एक सुखद अनुभव म्हणून खेळतो, विक्रम निर्माण करण्यासाठी कधीच खेळत नाही असे सांगितले. विसाव्या शतकातला सर्वांत जलदगती गोलंदाज असे आपले वर्णन केले जाते. याबद्दल बोलताना तो म्हणाला, 'मी नम्रतेने नाही–तर प्रामाणिकपणे सांगतो. मी सर्वोत्कृष्ट आहे असे मी कधीच समजत नाही.' मी प्रामाणिकपणे व कष्टपूर्वक प्रयत्न करतो. वृत्तपत्रांनीच मी जी गोलंदाजी टाकत नाही तशी करतो असे पसरविले.

गोलंदाजांमध्ये वेस्ली हॉल, ॲलन डेव्हिडसन, फरेड ट्रमन हे त्याचे आदर्श आहेत. सध्या रॉबर्टस्, होल्डिंग, गार्नर, थॉम्सन, इमरान, हॅडली, कपिलदेव व विलीस यांच्याने तो प्रभावित झाला आहे.

यष्टीरक्षक रॉडनी मार्शल व लिलीने मिळून कसोटीत १०० बळी घेतले. गेल्या चौदा वर्षांपासून ते एकत्र खेळताहेत. भारतीय क्रिकेटमध्ये गावस्कर व कपिल त्यांचे आवडते ! पहिल्या दर्जाच्या क्रिकेटमधून निवृत्त झाल्यावर पहिली दोन-तीन वर्षे जाहिरातीची कंत्राटे, व्यापार, लेखन करणार. नंतर काय करायचे ते ठरविले नसले तरी क्रिकेट प्रशिक्षण देण्याची त्याची इच्छा आहे.

## □ भटकणाऱ्या लोकांचा देश

गेल्या नऊ वर्षांपासून लेबाननमध्ये गृहयुद्धाची जखम विघळतच आहे. लेबाननचे अध्यक्ष, पंतप्रधान बिचारे सतत बदलत असतात. अमेरिका, इस्रायल, सीरिया या तीन राष्ट्रांच्या इशाऱ्यानुसार लेबाननला वागावे लागते. आंतरराष्ट्रीय, राजकीय परिस्थिती कशीही असली तरी लोकांची स्थिती फार दयनीय. सध्या हा भटक्यांचा देश झालाय ! नुकत्याच झालेल्या एका पाहणीनुसार १९७५ पासून लेबाननमधील सर्व लोकांना किमान एकदा तरी आपले राहते घर सोडावे लागले. गेल्या आठ महिन्यात ६ लाख जणांना ( लोकसंख्येच्या एकपंचमांश ) पळून जावे लागले. देशाचे एकही गाव यातून बचावलेले नाही !

गेल्या वर्षीच्या जुलैपासून १ लाख १५ हजार ख्रिश्चन बेरूतच्या पूर्वभागात आले, तर अडीच लाख ड्रूझ व ख्रिश्चन पश्चिम बेरूतमध्ये गेले. दीड लाख दक्षिण बेरूतमध्ये येऊन राहिले.

१९८३ च्या शेवटी पॅलेस्टिनी मुक्ति संघटनेचे नेते यासर अराफत यांना बंडखोरांनी उत्तर लेबाननमधील ट्रिपोली येथे जेरीस आणले. त्या वेळी तेथे राहणारे ५० हजार जण जिवाच्या धास्तीने निघून गेले. अशा युद्धांमध्ये संपूर्ण एक गाव दुसरीकडे हलत असल्याचे दृश्य दिसत असे.



# मुंबापुरी

## ☐ बजेटचा मस्का

गेला अख्खा आठवडा बजेटच्या धुळवडीत गेला. बजेट म्हटलं की, मुंबईकरांच्या पोटात गोळा उठतो. आधीच दुष्काळ त्यात तेरावा महिना अशी गत होते. आधीच मुंबईत राहायचं म्हणजे कोण कसरत करावी लागते ! आज काय पाणी नाही, उद्या काय बसची भाडी महागली, परवा काय रेल्वेच्या गाड्या कमी होणार. सगळीच बोंब ! त्यात त्यात जखमेवर मीठ चोळायला म्हणून की काय हे बजेटचं त्रांगडं येतं.

सुदैवाने या वर्षी कोणतेच कर नसल्यामुळे अन सगळ्यांना आवडेल–भावेल असा खेळ प्रणब मोशाय मुखर्जी यांनी खेळल्यामुळे मुंबईचे समस्त भोद्रोलोक खुष झाले आहेत.

बजेटच्या दिवशी शेअरबजारचा फेरफटका मारावा म्हणजे मुंबई काय आहे ते कळेल. गुजरातीत म्हण आहे की 'सुरतनूं जमण अनें काशीनूं मरण'– म्हणजे माणसानं सुरतेत जेवावं अन काशीक्षेत्री मरण यावं यापरती दुसरी पुण्यशील गोष्ट नाही.

परंतु त्याचबरोबर मुंबईच्या दलालस्ट्रीटवर शेअरची सौदेबाजी करावी असं जरी कुठे म्हटलं नसलं तरी मुंबईत गुजरात्यांची पुण्याभूमी म्हणजे मूळजीजेठा मार्केट आणि दलालस्ट्रीट !

बजेटच्या दिवशी तर विचारू नका. एकीकडे ट्रान्झिस्टरवर बजेट बुलेटिन ऐकायचं अन तुरंत दुसरीकडे बोली सुरू करायची असा तडाखेबाज मामला सुरू होता. खाली रस्त्यावर दहीवड्याच्या अन् पाणीपुरीच्या गाड्या होत्याच की पोटपूजेसाठी. खाली जमण वर तिसऱ्या मजल्यावर मरण !

बजेटवर 'फोरम ऑफ फ्री एंटरप्राईज' तर्फे दरवर्षी नानी पालखीवाला बोलतात. याहीवर्षी बोलले. हा सोहळा जरी 'नेमेचि येतो' या धर्तीचा असला तरी दरवर्षी ऐकणाऱ्यांची संख्या वाढतेय !

पालखीवाला सुरेख बोलतात. आपला मुद्दा प्रभावीपणे मांडण्याची उत्कट शैली त्यांच्याकडे उपजत आहे. त्यात पुन्हा विषय आवडीचा, त्यांनी हां हां म्हणता बजेटच्या चिंध्या उडवल्या !

'सगळ्यांना खुष करणारं बजेट' अशी त्यांनी बजेटची संभावना केली.

यावरून एका पोस्टरची आठवण झाली. चर्नीरोडच्या बालभवनपाशी अमूल बटरचं एक मोठालं पोस्टर लावलंय अन अमूल बटरची तारीफ करताना एक मजेदार कॉपीलाइन टाकलीये. 'लाईक द युनियन बजेट विच प्लीजस् एवरीबडी '

गड्यांनो, आता मस्का लावा. निवडणुका जवळ आल्या ना !

## ☐ निवडणुका–सुखथनकर

महापालिकेच्या या निवडणुका मात्र आता ठरल्याप्रमाणे मार्च महिन्यात होत नाहीत. पालिकेची एक वर्षाने वाढविलेली मुदत एकतीस मार्चला संपते. सर्वसाधरणत: या निवडणुका घेण्यास पंचावन्न दिवसांचा तरी अवधी हवा. याचा अर्थ मुदत संपण्यापूर्वी निवडणुका होणे अशक्य ! यामुळे नगरसेवकांच्या चेहेऱ्यावरही आता नवे तेज चढू लागले आहे आणि ते नव्या जोमाने अनधिकृत बांधकामे अधिकृत करण्याच्या कामास जुंपले आहेत.

बारा मार्चला सुरू होणाऱ्या उन्हाळी अधिवेशनात हृया निवडणुका अजूनही सहा महिने तरी पुढे ढकलल्या जातील असे दिसते.

द. म. सुखथनकरांची तीन वर्षांची मुदतही आठ 'मे'ला संपते. हृया तीन वर्षांत अमिताभ बच्चनलाही मिळाली नसेल एवढी प्रसिद्धी सुखथनकरांना वृत्तपत्रांनी दिली. (या काळात मुंबईत पडलेली प्रत्येक झोपडी ही वारा, पाऊस किंवा सुखथनकरांनी पाडली असे पीयुसिएलच्या लोकांचे ठाम मत आहे ! )

अनधिकृत झोपडपट्ट्या आणि फेरीवाले हृयांच्या विरुद्धच्या मोहिमेने जरी सुखथनकरांनी नगरसेवकांची झोप उडवलेली असली तरी गेल्या शुक्रवारी नगरपालिकेची एक खास सभा बोलवून नगरसेवकांनी राज्यसरकारकडे सुखथनकरांना मुदतवाढ द्यावी अशी गळ घातली. नगरसेवक आणि सुखथनकर यांची अशी ही दिलीपकुमार आणि सायराबानू यांच्यासारखी लव्ह–हेट रिलेशनशिप आहे.

कॉंग्रेस (आय) च्या नगरसेवकांनी आधी या मागणीला पाठिंबा दिला होता; परंतु ऐनवेळी त्यांनी 'हा निर्णय राज्यसरकारने घ्यावयाचा आहे. नगरसेवकांनी अशी मागणी केल्याने आपण आयुक्तांना राजकारणात आणू पाहात आहोत.' असा पवित्रा घेतला सुखथनकरांच्या मुदतवाढीच्या ठरावावर मतदान करायचे त्यांनी नाकारले.

कॉंग्रेस (आय) च्या नगरसेवकांनी घेतलेल्या हृया निर्णयावरून सुखथनकरांची या पदावरून निश्चित बदली होणार असे दिसते सुखथनकर गेल्याने पीयुसिएलचेहा अस्तित्व धोक्यात येईल असे आम्हाला वाटते.

## ☐ असे सिद्ध होते की ...

गेल्या मंगळवारी अचानक भरदुपारी चर्नीरोड स्थानकाजवळील रस्ता सहा फूट खोल खचला. त्यामुळे मरीनलाइन्स आणि चर्चगेटकडून येणारी सर्व वाहाने अडकून पडली. पूर्वी कुरुक्षेत्रावर ध्यानीमनी नसताना रथाचे चाक जमिनीत रुतल्याने कर्णाला आपले प्राण हकनाक गमवावे लागल्याचे आम्ही महाभारतात वाचले आहे; परंतु मुंबापुरीतील वाहनांना खड्डे चुकवून जाण्याची सवय असल्याने साधी टॅक्सीदेखील हृया खड्ड्यात रुतली नाही. असो.

आम्हाला ही बातमी सायंकाळी सात वाजता समजली तेव्हा आमचा असा समज झाला की, मुंबापुरीत पापाचे प्रमाण वाढले असल्यामळे हा रस्ता खचला असावा. पुढे असे समजले की, हृया रस्त्याखालून जाणारा पाण्याचा पाइप बरेच महिने गळत असल्याने त्यातील पाण्यामुळे रस्त्याखालची वाळू वाहून गेली आणि त्यामुळे रस्ता खचला.

यावरून असे सिद्ध होते की, हृया पाइपमधून चक्क पाणी वाहात होते !

–विष्णू जयदेव

# पुणे
## मोलकरीण संघटना

पुण्यात मध्यंतरी सामान्य माणसाला झळ पोचवणारे दोन संप झाले. एक रिक्षावाल्यांचा आणि दुसरा मोलकरणींचा. रिक्षावाल्यांचा संप संपूर्ण शहरात एकाच वेळी, संघटितरीत्या झालेला होता. मोलकरणींचा संप मात्र संपाची हाक वगैरे देऊन एकत्रितरीत्या झाला नाही. हा संप टोळी पद्धतीने झाला. तो वेगवेगळ्या भागात, वेगवेगळ्या वेळी सुरू झाला आणि प्रत्येक भागात वेगवेगळ्या मुदतीनंतर मिटला.

सुरुवातीला गोखलेनगर भागातल्या मोलकरणींनी उत्स्फूर्तपणे संपाला सुरुवात केली. एका पेपरवाल्या पोऱ्याने एक दिवस या बायकांना असं एकत्र बसून काही चर्चा करताना बघितलं आणि त्यानं त्यांना मोलकरीण संघटनेविषयी सांगितलं. त्यानंतर मग मोलकरीण संघटनेनं संपात लक्ष घातलं आणि तावडतोबीच्या मागण्या नीटपणे मांडून, त्यांची पत्रकं वगैरे छापून ती मोलकरणींकडे दिली.

१९८० साली झालेल्या मोलकरणींच्या अशाच एका उत्स्फूर्त संपानंतर 'पुणे शहर मोलकरीण संघटना' उभी राहिली. मोलकरणींना आपल्या तक्रारी मांडण्यासाठी एखादं हक्काचं स्थान असावं आणि वेळ पडल्यास त्यांना त्यांच्या मागण्यांबाबत योग्य ते मार्गदर्शन करून त्यांच्या पाठीशी उभं राहावं असं या संघटनेचं स्वरूप आहे. कारण मोलकरणींचं काम कोणत्याच कायद्याच्या कक्षेत येत नाही. दोन्ही बाजूंनी ठरवले जातील ते नियम, अशा परिस्थितीत मोलकरीण संघटना ही कायदेशीररीत्या नोंदवता येणं अशक्यच आहे.

१९८१ साली डॉ. बाबा आढावांनी असंघटित कामगारांची एक परिषद बोलावली होती. त्या वेळचे मजूरमंत्री त्याला उपस्थित होते. ही संधी बघून मोलकरीण संघटनेनं सरकारकडे आपल्या मागण्यांचं निवेदन सादर केलं होतं. त्यात पगारवाढ, बोनस इ. मागण्यांखेरीज, माथाडी कामगार कायद्याच्या धर्तीवर मोलकरणींनासुद्धा पुरेसे किमान वेतन, किमान रजा इ. सोयीची हमी देणारा कायदा तयार करावा अशीही मागणी केली होती. दिवसभरात साधारणपणे आठ तास काम केल्यावर मोलकरणींना महिन्याला किमान ३०० रु. मिळतील अशा तऱ्हेने त्यांच्या वेतनाची रचना करावी अशी मागणी करण्यात आली. याशिवाय मोलकरणींचे रजिस्ट्रेशन करून त्यांच्या मुलांना मोफत शिक्षण मिळावे, सरकारने छोटी घरे बांधून ती अल्प भाड्यात मोलकरणींना उपलब्ध करून द्यावीत, मोलकरणी व त्यांच्या मुलांसाठी मोफत वैद्यकीय सोयी द्याव्या अशा इतर मागण्या होत्या.

परंतु अजूनपर्यंत तरी मोलकरणींना कोणत्याही कायद्याचे संरक्षण मिळालेले नसून, त्यांना 'कामगार' म्हणून मान्यता मिळालेली नाही. अर्थात मोलकरीण संघटना कोणत्याही प्रकारे सरकारवर अवलंबून राहिलेली नाही. आहे त्या परिस्थितीतच तिने आपले काम चालू ठेवले आहे. संघटनेचे सभासदत्व, वर्गणी वगैरे काही नाही. खरं म्हणजे काही मोलकरणी अशी नियमित वर्गणी द्यायला तयार आहेत; परंतु संघटनेकडे कायमचा निधी नाही. वेळप्रसंगी जी काही आर्थिक मदत लागते ती, सर्व श्रमिक संघटना, त्याचप्रमाणे एल. आय. सी. कर्मचाऱ्यांनी उभारलेल्या असंघटित कामगार कृती समिती यांच्याकडून मिळते.

गरजू मोलकरणींचे नाव–पत्ते संघटनेकडे नोंदवलेले असतात. कोणी मोलकरीण हवी असल्याची विचारणा संघटनेकडे केल्यास गरजू मोलकरणींना अशा वेळेस काम मिळवून दिले जाते. मालकिणी-मोलकरणी असा काही वाद निर्माण झाल्यास मालकिणींची गाठ घेऊन तो परस्पर समजुतीने मिटवण्याचा प्रयत्न करणे, त्याचप्रमाणे स्त्री-अत्याचाराची प्रकरणे कुठे घडल्यास त्याविरुद्ध संघटितरीत्या तक्रारी नोंदवणे या प्रकारची कामे संघटना एरवी करते.

या वेळच्या उत्स्फूर्तपणे सुरू झालेल्या संपातही संघटनेने लक्ष घातल्यावर पत्रकं छापून ती मोलकरणींमार्फत घरोघरी देण्यात आली. त्यानुसार वाढलेली महागाई लक्षात घेऊन १० ते २५ रु. पगारवाढ, दिवाळीला एक महिन्याच्या पगाराइतका बोनस, महिन्यातून दोनदा पूर्ण पगारी सुट्ट्या, जादा कामाचे प्रमाणात जादा वेतन, दिवाळीसारख्या प्रमुख सणांच्या सुट्ट्या अशा मागण्या मांडण्यात आल्या.

त्यातल्या पगाराबद्दल; सर्वसाधारणपणे धुणं–भांडी या कामाचे माणशी १० रु. मिळावेत असं सूत्र संघटनेनं ठरवलं आहे. धुणं–भांडी याखेरीज इतरही विविध प्रकारची कामे मोलकरणी करतात, त्या प्रत्येक कामाचे वेगळे पैसे मिळावेत अशी संघटनेची मागणी आहे. दुसरी एक मागणी आहे ती म्हणजे जादा कामाचे जादा वेतन. जादा काम म्हणजे नेहमीच्या भांड्यांशिवाय इतर काही भांडी–मोठी पिंपे, बादल्या इ. स्वच्छ करून घेणे, तसेच सिल्क, सिंथेटिक अशा प्रकारचे कपडे धुऊन घेणे अशा कामाचे जादा वेतन.

सुट्ट्यांच्या मागणीबद्दल मात्र संघटनेनं अजून तरी फारसा आग्रह धरलेला नाही. याबद्दल मालकिणींची मुख्य तक्रार म्हणजे काही मोलकरणींची अधून-मधून न सांगता दांड्या मारण्याची सवय. याबद्दल संघटनेचं असं म्हणणं आहे की, एकदा जर त्यांना महिन्यातून दोन सुट्ट्या मान्य करून पद्धत लावून दिली, तर हे न सांगता सुट्ट्या घेण्याचं प्रमाण कमी होईल.

प्रत्येक ठिकाणचे संप साधारणपणे तीन ते चार दिवसांत मागे घेण्यात आले. कमीत कमी पगारवाढीची तरी मागणी मान्य व्हावी असा संघटनेचा आग्रह होता. अशा प्रकारचे संप फार काळ चालू शकत नाहीत याची संघटनेला जाणीव आहे. कारण कोणत्याच कायद्याचे संरक्षण नसल्याने, कायद्याच्या आधाराने तर मागण्या मान्य करून घेता येत नाहीत. शिवाय प्रत्येक ठिकाणी मालकिणी–मोलकरणी संबंध वेगवेगळे असल्याने फार दिवस सगळ्याजणी संघटितही राहू शकत नाहीत; पण त्या जे काय कमी-जास्त दिवस संघटित होऊ शकतील ते संघटनेच्या दृष्टीने महत्त्वाचं.

लीलाताई भोसले, सुधा चव्हाण, आशा मगर, पार्वती कोठारी, इंदुबाई बने या संघटनेच्या सुरुवातीपासून कार्यकर्त्या आहेत. त्यांनी आपलं कार्य फक्त मोलकरीण संघटनेपुरतंच मर्यादित ठेवलेलं नाही. एरवी स्त्रीविषयक प्रश्नांच्या शिबिरांना, चर्चासत्रांनाही त्या उपस्थित राहतात. मोलकरीण संघटनेच्या कामाला ते पूरकच ठरतं.

—मीरा जोशी

राजधानी दिल्ली

# महिला दक्षता समितीचा चांगला उपक्रम

बिचारी मीना पूरी हुंडा न दिल्यामुळे सासूकडून व नवऱ्याकडून होणाऱ्या शारिरीक व मानसिक त्रासाला कंटाळून आत्महत्या करण्यास प्रवृत्त झाली. कायद्याने ह्या त्रासातून आपली सोडवणूक होऊ शकेल ह्याची तिला कल्पनाच नव्हती.

गीता आपल्या नवऱ्याच्या तऱ्हेवाईक व संशयी स्वभावाला कंटाळून गेली होती. अशा जगण्यापेक्षा मरण बरं असं तिला वाटायला लागलं. घटस्फोट घ्यावा असं सारखं मनात येत होतं; पण कुणाला विचारायचं ? काहीच माहिती नाही.

प्रभातीला घटस्फोट मिळाला होता; पण तिची मुले नवऱ्याकडेच होती. नवऱ्याने दुसरं लग्न केलं होतं. ओळखीच्या लोकांकडून तिला मुलांना होणारा त्रास कळत होता. तो तिला आणखीनच काळजीत टाकत होता. कायद्याने ६ वर्षांवरील मुलांचा ताबा बापाकडे असतो. तिची मुलगी १२ वर्षांची व मुलगा १० वर्षांचा होता. मुलांचा ताबा मिळविण्यासाठी काय करायला हवं ते तिला माहित नव्हतं.

आज सामान्य स्त्रीची हीच अवस्था आहे. घटस्फोट, हुंडाविरोध, मुलांचा ताबा, वारसा हक्क, बलात्कार अशा अनेक बाबतीत स्त्रीला कायद्याचे प्राथमिक ज्ञानही नसते. कायद्याने स्त्रियांना मिळालेल्या अधिकारांचा योग्य उपयोग होऊन, कायद्याच्या कक्षेत त्यांचे संरक्षण होणं आवश्यक असेल, तर कायद्यासंबंधी किमान माहिती प्रत्येक स्त्रीला असणं तितकंच महत्त्वाचं आहे. निदान सामाजिक कार्यकर्त्यांच्या तरी ते असावं, म्हणजे गरजू स्त्रीला त्या मार्गदर्शन तरी करू शकतील.

हाच उद्देश समोर ठेवून दिल्ली येथील 'महिला दक्षता समितीने' समाजकार्य करणाऱ्या भगिनींसाठी पॅरा लीगल–एड ( Para legal Aid ) चा एक प्रशिक्षण अभ्यासक्रम १ जानेवारी ते २८ फेब्रुवारी पर्यंत चालविला होता.

ह्या अभ्यासक्रमात विशेषत: स्त्रियांसंबंधी विविध कायद्यांचे विश्लेषण करण्यात आले. अनेक महिला संघटनांच्या, काही कॉलेजच्या प्रतिनिधी, कायद्यासंबंधी माहिती जाणून घेण्यास उत्सुक असलेल्या भगिनी प्रशिक्षण घेण्यासाठी आल्या होत्या. प्रशिक्षणार्थींमध्ये पुरुषही होते. दिल्लीतील नामवंत कायदेपंडित, वकील, विधिमहाविद्यालयाचे प्राध्यापक, न्यायाधीश अशा तज्ज्ञ मंडळींना प्रशिक्षार्थींना मार्गदर्शन करण्यासाठी बोलाविले होते. ह्या अभ्यासक्रमाची पद्धत अशी होती की, प्रथम वक्ता प्रतिपादित विषयांवर विवेचन करायचा आणि मग प्रशिक्षार्थी त्यावर प्रश्न विचारायचे. प्रश्नोत्तरामुळे विषय समजणे सुलभ व्हायचे. प्रतिपादित विषयासंबंधी तयार विवेचनेही प्रशिक्षार्थींना दिली गेली.

ह्या पूर्ण अभ्यासक्रमातील विषय होते— हिंदु विवाह कायदा, मुस्लिम विवाह कायदा, ख्रिश्चन–पारसी विवाह कायदा, विशेष विवाह कायदा, हिंदु कायद्यात आणि विशेष विवाह कायद्यात घटस्फोटाच्या तरतुदी, हुंडाविरोधी विधेयक, बलात्कारासंबंधी विधेयक, पत्नी मुले व आईबाप ह्यांच्या जीवन पोषणादी खर्चासंबंधीचा कायदा, कायद्याने मुलाचा ताबा, स्त्रियांच्या पुनर्वसनासंबंधी कायदा व व्यवस्था वारसा हक्क व पोलिसयंत्रणा व स्त्री गुन्हेगार.

ह्या सर्व विषयांचे प्रतिपादन होत असताना कायद्यातही स्त्रीला कसे गौण मानले गेले आहे ते पुढे आले. विशेषत: जाणवले ते असे की, हिंदु विवाह कायद्यातही सुधारणा होणे आवश्यक आहे. आर्थिक बाबतीत नवऱ्यावर पूर्णपणे अवलंबून असणाऱ्या बाईला सोडून दिलं तर कायद्याने तिच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी पतीवर येत नाही; पण कोर्ट त्यालाही जबाबदारी उचलण्यासाठी बाध्य करू शकते. पत्नीने व्यभिचार केला तर पती त्या दुसऱ्या पुरुषावर खटला करू शकतो; पण पतीने व्यभिचार केला तर पत्नी मात्र दुसऱ्या बाईवर खटला करू शकत नाही. 'हिंदु विवाह कायदा.' हा विशेष 'विवाह कायद्या'पेक्षा जास्त पुरोगामी आहे. कारण पहिल्याप्रमाणे स्त्री व पुरुष दोघेही निर्वाहखर्चाची मागणी करू शकतात तर दुसऱ्यात फक्त बाईच करू शकते. मुस्लिम विवाह कायदा हा फार गुंतागुंतीचा आहे. भारतात अजून तो जुनाच कायदा चालू आहे; पण पाकिस्तान, इराण व ट्युनिशियामध्ये ह्या कायद्यात सुधारणा झाल्या आहेत. ह्या कायद्यानेही स्त्रीला अधिकार नाहीत. स्त्रीला घटस्फोट घ्यायचा असला तर ती 'खुल्ला' ( unilaternal ) आणि 'तलाक ए बिदात' ( religious conversion ह्या दोन बाबतीतच कोर्टात जाऊ शकते. पारसी विवाह कायदा हा १९३६ पासून तसाच आहे. परिस्थिती बदलली तरी त्यात सुधारणा झाली नाही. दुर्व्यवहार हे घटस्फोटाचे कारण होऊ शकत नाही. ख्रिश्चन कायद्याप्रमाणे अज्ञानांना (Minor) लग्न करण्यासाठी फक्त पित्याची परवानगी घेणेच पुरेसे आहे. तेथे मातेला काही महत्त्व नाही. स्त्रीला गौण स्थान आहे.

हुंडाविरोधी विधेयकातही मूलभूत सुधारणा होणे आवश्यक आहे. स्त्रीला आत्महत्या करण्यासाठी कारणीभूत होणाऱ्या मानसिक छळासंबंधीही कायद्यात तरतूद असायला हवी. हुंडा घेणे हा दखलपात्र अपघात समजला गेला पाहिजे. बलात्कारासंबंधी सुधारित विधेयकातही काही त्रुटी आहेतच. परित्यक्ता स्त्रियांचे पुनर्वसन ही एक मोठी समस्या आहे. आता कायद्यातील नव्या दुरुस्तीमुळे अशी स्त्री स्वत:च थेट नारीनिकेतनात जाऊ शकते. सहाजिकच यासाठी सामाजिक संस्थांनी मदतीचा हात पुढे करायला हवा. आता पैतृक संपत्तीत स्त्रीला समाज-अधिकार आहे; पण वडिलोपार्जित संपत्तीत स्त्रीला वारसा हक्क नाही.

## कायद्यातली विसंगती

हिंदू विवाह कायद्याच्या कलम २५ अन्वये एक चमत्कारिक विसंगती निर्माण झाली आहे: म्हणजे असे की, नवऱ्याने घटस्फोटासाठी अर्ज केला आणि त्यात बायकोविरुद्ध डिक्री निघाली तरी बायको पोटगीवर हक्क सांगू शकते; पण नवऱ्याचा हा अर्ज फेटाळला गेला तर मात्र बायकोला पोटगी मागण्याचा हक्क उरत नाही. डिक्री निघाली नसल्यामुळे नवरा दोषी ठरला तरी हा हक्क बायकोला नसतो. पोटगी मिळण्यासाठी तिला स्वतःच अर्ज करावा लागतो आणि तिला घटस्फोट नको असेल तर तो अर्ज तिच्याच हिताविरुद्ध जातो.

याउलट बायको दोषी ठरली आणि नवऱ्याला घटस्फोट मिळाला तर मात्र तिला पोटगी मिळते. त्याचप्रमाणे बायकोने केलेला घटस्फोट-अर्ज फेटाळण्यात आला तर, स्वतःला आणि आपल्या मुलाबाळांचा निर्वाह करण्यासाठी आवश्यक असूनही तिला पोटगी मिळत नाही. ही विसंगतीच आहे. ती दूर करण्यासाठी कायद्याच्या निदान या २५ व्या कलमात तरी योग्य दुरुस्ती आवश्यक ठरते असे या अभ्यासक्रमातून समजावून देण्यात आले.

दिल्लीचे पोलीसकमिशनर श्री. सुभाष टंडन व Dowry cell च्या पोलीसअधिकारी श्रीमती कंवलजीत देऊल ह्यांनीही 'स्त्रियांसंबंधी गुन्हे व पोलीसयंत्रणा' या विषयावर प्रशिक्षार्थींना माहिती दिली. स्त्रियांवर अत्याचार झाले तरी त्या तक्रार करण्यासाठी पोलीसठाण्यावर येत नाहीत कारण त्यांना समाजाची भीती वाटत असते. अशा वेळी महिला संघटनांनी पोलीसयंत्रणेला सहकार्य करावे असे श्री. टंडन म्हणाले. श्रीमती देऊल म्हणाल्या, नवऱ्याने स्त्रीला मारले तर गुन्हा मानला जात नाही, हे ऐकून मजाच वाटली. रस्त्यावर एका माणसाने दुसऱ्याला मारले तर गुन्हा व नवऱ्याने बायकोला मारले तर गुन्हा नाही हे अजबच आहे!

केंद्रीय विधि सहाय्यता समितीचे अधिकारी श्री. माथूर व श्री. गुप्ता ह्यांनी मोफत कायदाविषयक सहाय्यता समितीची आवश्यकता, कार्य व घडण ह्यासंबंधी माहिती सांगितली. दिल्लीत व अनेक राज्यांत अशा समित्या स्थापन झाल्याचे सांगितले. स्त्रियांनाच नव्हे तर गरजू आणि गरीब पुरुषांनाही अशा मदतीची गरज कशी असते ते त्यांनी विशद केले. गरीब माणूस कोर्ट-कचेऱ्यांसाठी पैसा खर्च करू शकत नाही. कोर्टात हेलपाटे घालायला त्याला वेळही नसतो. त्याला कायद्याचे थोडेही ज्ञान नसते. अशा वेळी त्याला योग्य मार्गदर्शन करणे तर दूर राहिले, त्याला चुकीची माहिती देऊन त्याचा गैरफायदा घेतल्याचे दिसून येते. गरीब आणि गरजू लोकांवर कोर्टात जायची पाळी येऊ नये म्हणून प्रशिक्षार्थींनी त्यांना मदत करणे किती आवश्यक आहे हे सांगताना श्री. माथूर ह्यांनी एक फार मार्मिक उदाहरण दिले.

एका गरीब पदवीधर तरुणाची एका चांगल्या कंपनीत चांगल्या पदावर निवड झाली. नियुक्ती होण्यापूर्वी होणाऱ्या वैद्यकीय तपासणीत कंपनीतील डॉक्टरांनी त्याला 'अॅपेंडिक्स आहे व ऑपरेशन करून घ्या व मगच रुजू व्हा!' असे सांगितले तो बिचारा दिल्लीतील मेडिकल इन्स्टिटयूटच्या नामवंत डॉक्टरांकडे तपासणीसाठी गेला. तेव्हा तुला काहीही रोग नाही असे तेथील डॉक्टरांनी सांगितले. त्यामुळे हा कंपनीत रुजू व्हायला गेला. कंपनीच्या डॉक्टरांनी पुन्हा आपले तेच मत सांगितले. हा मुलगा मोठ्या पेचात पडला. नोकरीची तर फार गरज होती. त्याला कुणी तरी 'दिल्ली विधि सहाय्यता समिती'कडे जाण्याचा सल्ला दिला. ह्या समितीने त्याला योग्य ती मदत व कारवाई केल्यामुळेच तो नोकरीवर रुजू होऊ शकला. या स्वरूपाचे कार्य महिला संस्थांनीही हाती घ्यावे व गरजू महिलांना मदत करावी असे त्यांनी सुचविले.

आधुनिक स्त्रीचे जीवन आज फार गुंतागुंतीचे झाले आहे. अनेक प्रकारच्या समस्यांना त्यांना जिकिरीने तोंड द्यावे लागते. त्यासाठी कायद्याची तोंडओळख व्हायला हवी, त्या दृष्टीने हा अभ्यासक्रम महत्त्वाचा आहे- असेच मत अनेकांनी दिले; पण फक्त दोन महिन्यांच्या अभ्यासक्रमाने काम होणार नाही असेही अनेकांना वाटले. एका प्रशिक्षार्थीने सांगितले की, 'ह्या दोन महिन्यात जे काही आकलन करता आले ते पुरेसे नाही. निदान ४-६ महिन्यांचा हा अभ्यासक्रम असावा.' ह्या अभ्यासक्रमात दिलेल्या माहितीची उजळणी करण्याकरता वेळोवेळी असे अभ्यासक्रम चालवायला हवेत, 'महिला दक्षता समितीने' हा फार चांगला उपक्रम केला असाच अभिप्राय अनेकांनी दिला. दिल्लीच्या वृत्तपत्रांनी या उपक्रमाला यथोचित प्रसिद्धी दिली. दिवसेंदिवस कार्यक्रमाला येणाऱ्यांची संख्या वाढतच होती.

ह्या उपक्रमात अनेक तज्ज्ञ व्यक्तींनी मार्गदर्शन केले. ते तज्ज्ञ म्हणजे न्यायमूर्ती श्री भगवती, देसाई, तारकुंडे, फाझलअली, विधिप्राध्यापक माधव मेनन, जाफर हुसेन, लोतिका सरकार व फुलचंद, न्यायाधीश सुश्री तनेजा गुप्ता, माथूर व जैन, सबजज्ज ए. के. श्रीवास्तव व ममता सहगल, तसेच वकील उर्मिला कपूर, सीता वैद्यलिंगम, राणी जेठमलानी, जोसेफ, गर्ग, बलराज सेठ, सिंघवी, कपिला हिंगोरानी. पूर्णिमा सेठी, लिली थॉमस, स्वराज्य कौशल व मॅथ्यु-किरणधिग्रा व सुशीला रोहतगी ह्या समाजकल्याण विभागाच्या अधिकारीवर्गाने मार्गदर्शन केले.

हा अभ्यासक्रम चालविणे, त्याची योजना करणे हे फार जिकिरीचे काम होते. ह्या जिकिरीच्या कामात महिला दक्षता समितीच्या सचिव श्रीमती सुमन कृष्णकांत ह्यांचा सिंहाचा वाटा आहे.

—सौ. प्रज्ञा तपस्वी

---

## लढते जाओ, बढते जाओ !

---

दिल्ली युनिव्हर्सिटीचा परिसर तसा खूप भव्य! गेटमधून आत शिरलो की, निरनिराळ्या शाखांच्या अनेक इमारती प्रशस्तपणे पसरलेल्या दिसतात. मध्यभागी असलेला विवेकानंदांचा पूर्णाकृती उभा पुतळा फार शोभून दिसतो. त्यांची निग्रही, पौरुषयुक्त कणखर वृत्ती त्यांच्या चेहऱ्यावर विराजमान आहे.

गेटच्या डाव्या अंगाला टयुटोरिअल बिल्डिंग आहे. संपूर्ण परिसर विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी फुललेला असतो. तिथे मी तासाला जाताना इतर विद्यार्थ्यांप्रमाणेच काही विद्यार्थी एकमेकांच्या हातात हात घालून किंवा धातूची लाल-पांढरी काठी हातात घेऊन झरझर जाताना नेहमी दिसत. त्यांच्याविषयी एक अपार कुतूहल माझ्या मनात निर्माण होई. या रंगीबेरंगी दुनियेची विविध रूपं दृश्य स्वरूपात पाहू न शकणारे हे दृष्टिहीन विद्यार्थी! तथापि आपल्या इतर संवेदनाशक्तींच्या सहाय्याने या जगाचा ते अनुभव घेत असतात. त्यांच्याही मनात इतर डोळस विद्यार्थ्यांप्रमाणेच ज्ञानाची अदम्य लालसा ते बाळगून असतात.

टयुटोरिअल बिल्डिंगमध्येच एका बाजूला या अंध विद्यार्थ्यांची 'ब्रेल लायब्ररी.' आहे. तिथे हे विद्यार्थी अभ्यासासाठी येतात. कुतूहलापोटी या लायब्ररीत जाऊन तेथील काही विद्यार्थ्यांची मी सहज भेट घेतली. एका वेगळयाच विश्वाची नव्याने जाणीव झाली.

दिल्ली युनिव्हर्सिटीच्या परिसरात अनेक कॉलेजे आहेत. तिथेच हे विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या बरोबरीनेच शिकत असतात. दृक्‌संवेदना गमावल्यामुळे त्यांच्या इतर संवेदना अतिशय तरल आणि तीव्र बनलेल्या. प्राध्यापकांचे व्याख्यान केवळ श्रवणभक्तीने ऐकून स्मृतीच्या कप्प्यात ते साठवून ठेवतात. त्या विषयावरील पुस्तके आणून, या लायब्ररीत बसून ते ती अभ्यासतात.

युनिव्हर्सिटी लेव्हलवरील ही ब्रेल लायब्ररी संपूर्ण भारतात फक्त दिल्ली येथेच आहे. ही लायब्ररी म्हणजे एक स्वतंत्र 'ब्रेल युनिट' आहे. येथे ब्रेल लिपीतील अनेक विषयांवरील पुस्तके तर आहेतच; परंतु या अंधांच्या अभ्यासासाठी येथे अनेक सोयी आहेत. या ठिकाणी विद्यार्थ्यांना कॅसेट रेकॉर्डर आणि १० ते २० कॅसेट्स वर्षभराच्या अभ्यासासाठी दिली जातात. ज्या वर्गात प्लग पॉइंटची सोय असेल तिथे हे विद्यार्थी प्राध्यापकांचे व्याख्यान टेप करून घेऊ शकतात.

या लायब्ररीतील दुसरी महत्त्वाची सोय म्हणजे या ठिकाणी अभ्यासाची पुस्तके वाचून दाखविण्यासाठी ५–६ रीडर्स (वाचक) असतात. ज्या विषयातील जी पुस्तके ब्रेल लिपीत उपलब्ध नसतील ती पुस्तके (साध्या लिपीतील) इतर लायब्ररीतून आणून ती या वाचकांकडून ते वाचून घेतात. हे वाचक दिवसातून ५ ते ६ तास वाचन करतात. आवश्यकता असेल त्या ठिकाणी हे वाचन 'टेप' केले जाते. विशेष म्हणजे या ठिकाणी असलेले हे सर्व वाचक पोस्ट ग्रॅज्युएटपर्यंत शिकलेले, दर्दी आहेत. परीक्षेच्या वेळेस या अंधांना एक एक लेखनिक पुरविला जातो आणि त्यांच्या पेपरसाठी एक तास जादा देण्यात येतो.

हिंदी, इतिहास, संस्कृत, पाली, संगीत, तत्त्वज्ञान, पोलिटिकल सायन्स इत्यादी अनेक विषयांमध्ये एम. ए., पीएच. डी. पर्यंतच्या अभ्यासाची येथे सोय आहे. शालेय शिक्षण येथील 'किंग्ज वे कॅंप'च्या परिसरात 'ब्लाइंड स्कूल'मध्ये घेता येते. याच परिसरात महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी होस्टेल आहे.

'ब्रेल युनिट' हो दिल्लीतील अंधांच्या शिक्षणाची एक विशेष सोय आहे. सुमारे २०० विद्यार्थी या ठिकाणी अभ्यासाचा लाभ घेतात. युनिव्हर्सिटीच्या परिसरातच असलेल्या 'सेंट्रल लायब्ररी'चाही यांना फार उपयोग होतो. अंधांच्या अभ्यासाच्या अनेक सोयी असल्या तरीही त्यांच्या आयुष्याला त्या खात्रीलायक आधार देऊ शकत नाहीत, हे कटुसत्य आहे. आज शिक्षणक्रम पूर्ण करणाऱ्या हजारो धडधाकट विद्यार्थ्यांचीही आपल्या देशात हीच अवस्था आहे, तर बिचाऱ्या अंधांची काय कथा? अंधांची असमर्थता पाहिली की, मन त्यांच्या बाजूने सहानुभूतीचे काहीसे झुकते माप टाकून जाते. त्यांचे भवितव्य निराशेच्या अंधारात बुडणारे आहे, हे दाखविणारी दोनच उदाहरणे पुरेशी बोलकी आहेत–

श्रीकृष्ण भारद्वाज हा येथील एक विद्यार्थी. १९७६ साली तो हरियाणातून येथे आला. वडील एक गरीब शेतकरी. तो १॥ वर्षांचा असताना त्याला पोलिओ झाला. घरचे कुटुंब अज्ञानी असल्यामुळे मुलाकडे दुर्लक्ष झाले. पोलिओमुळे उजव्या डोळयाची दृष्टी हळूहळू गेली. पुढे डावा डोळाही हळूहळू अधू होत चाललेला. तसेच ८ वीपर्यंतचे शिक्षण झाले नंतर मात्र दिल्लीला अंध विद्यार्थ्यांच्या होस्टेलमध्ये राहून त्याने नववी ते बी. ए. पर्यंतचे शिक्षण घेतले. शालेय शिक्षण 'गव्हर्न्मेंट सिनिअर सेकंडरी को–एज्युकेशन स्कूल' मधून झाले. अंधांच्या खेळांच्या अनेक प्रकारच्या स्पर्धांमधून तो भाग घेतो. स्नायूंना विशेष मालिश केल्यामुळे तो पळूही शकतो. भविष्यकाळाविषयी मात्र तो आशादायक काही सांगू शकत नाही.

दुसरा विद्यार्थी येथील हिंदु कॉलेजमधील राम सेवक काश्यप. तो संस्कृत विषय घेऊन एम. ए. करीत आहे. तो म्हणतो की, 'सरकार आम्हाला शिष्यवृत्ती देते; पण ती फार अपुरी असते. बी. ए. पर्यंत दरमहा १७० रु. आणि एम्. ए. साठी दरमहा २७० रुपये. त्यातून ७० रु. होस्टेलफंड काटला जातो. अभ्यासाठी होस्टेलवर 'खाजगी वाचक' ('पेड रीडर') ठेवला तर तो एका तासासाठी दरमहा ३०० रु. घेतो. तो तीन–चार विद्यार्थ्यांत मिळून ठेवता येतो. तरी इतर खर्चही असतोच. होस्टेलफंड वाढतो; पण शिष्यवृत्ती वाढत नाही.'

हा विद्यार्थी ब्रेल लिपीतील पुस्तकं तयार करण्यात प्रुफं तपासण्याची मदत करतो. होस्टेलची व्यवस्था समाधानकारक नाही आणि केवळ अव्यवस्थेमुळे तीन विद्यार्थ्यांना आपले प्राण गमवावे लागले असे तो सांगत होता. 'आम्हाला कुठलेही काम द्या. चौथ्या श्रेणीतील काम दिले तरी आम्ही करू; पण सरकार नुसती आश्वासाने देते, काम देत नाही!'असे तो दुःखाने सांगत होता. दिल्लीतील 'ब्लाइंड रिलीफ असोसिएशन' या संस्थेत अंधशिक्षकांचे प्रशिक्षण, तांत्रिक शिक्षण, ऑपरेटर, रिसेप्शनिस्ट वगैरे अनेक प्रकारचे शिक्षण दिले जाते. अपंग-वर्ष साजरे झाले त्या वेळेस मंत्रालयातील ४८ खात्यांमधून अंधांसाठी एक टक्का राखीव जागा ठेवण्यात येईल असे जाहीर केले गेले. तथापि त्याप्रमाणे अंधांना नोकऱ्या दिल्या नाहीत याची खंत त्याने व्यक्त केली. संपूर्णपणे स्वावलंबी बनणे हे त्याच्या आयुष्याचे ध्येय आहे. वडील ओखला येथे शेतमजूर आहेत. घरचे दारिद्र्य आणि अज्ञान, कुपोषण यामुळे दृष्टी गेली असे त्याने सांगितले. किंबहुना देशातील ९९ टक्के अंधत्व हे कुपोषण आणि अंधश्रद्धा यामुळे आलेले आहे, असे तो ठामपणे सांगतो. 'आम्ही शाळेत डोळस मुलांना शिकवण्याच्या कामापासून शिपायाच्या कामापर्यंत सर्व प्रकारचे काम करू शकतो; परंतु आमच्यावर तशी जबाबदारी टाकली जात नाही' असे तो आवेशाने सांगत होता. हास्टेलवर रेडिओ पळवून नेणाऱ्या चोराचा पाठलाग करून त्याला पकडल्याचे धाडसी कृत्यही तो अभिमानाने वर्णन करून सांगत होता.

आयुष्याच्या भवितव्याबद्दल मात्र तो अत्यंत निराश वाटला. 'कदाचित हे शिक्षणही मी बहुधा सोडून देईन. कारण या शिक्षणानंतर नोकरीची शाश्वती नाही' अशा त्याच्या बोलण्यातून त्याच्या भविष्याच्या भयाण भीषणतेची तीव्र जाणीव होत होती. 'आपल्या मागण्यांसाठी सरकारकडे आम्ही अर्ज करीत राहातो, लोकसभेचे कामकाज सुरू झाले की, पुन्हा पुन्हा आमचे म्हणणे मांडत राहातो, आमचे प्रयत्न चालूच असतात. 'लढते जाओ, बढते जाओ' 'स्ट्रगल इज लाइफ' असे जिद्दीने बोलणाऱ्या या विद्यार्थ्यांच्या अंतर्मनात मात्र विषण्णता भरून राहिलेली जाणवत होती.

–ललिता मिरजकर

## पंजाबमधील वाढता हिंसाचार

# पंजाब बहुतेक आसामच्या मार्गानेच जाणार !

अभय गोखले

पंजाबमधील अकाली आंदोलनाने हिंसाचाराची परिसीमा गाठली असून त्याची प्रतिक्रिया शेजारच्या हिंदू बहुसंख्य असलेल्या हरयाणात जोरात उमटत आहे. पंजाबमधील अमृतसर, गुरुदासपूर इत्यादि शहरांतील अकाली अतिरेक्यांच्या हल्ल्यांमध्ये किमान तीस माणसे ठार झाली असून ती कोणत्या जमातीची आहेत, हे सर्वांना माहीत आहेच. त्याची प्रतिक्रिया म्हणून हरयाणात यमुनानगर वगैरे भागात शिखांवर वाढत्या प्रमाणात हल्ले झाले, त्यांच्या प्रार्थनामंदिरांवर तुफान दगडफेक झाली, पंजाबमधून हरयाणात येणाऱ्या बसेसवर हल्ले चढवण्यात आले. त्यात काही शिखांना आपले प्राण गमवावे लागले. हे सर्व शीख निरपराध होते; पण पंजाबमध्ये अकाली अतिरेक्यांनी हिंदूंविरुद्ध जी मोहीम उघडली आहे त्याचा बदला म्हणून हरयाणात हे हिंसक प्रकार घडले व त्याची शिक्षा निरपराध लोकांना भोगावी लागली ! पंजाबमध्ये हिंदू व अकाली अतिरेकी यांच्यात असाच हिंसाचार चालू राहिला तर हे हिंसाचाराचे लोण देशाच्या इतर भागात पसरण्यास वेळ लागणार नाही व त्रास शेवटी निरपराध अशा देशाच्या कानाकोपऱ्यांत राहाणाऱ्या शीख बांधवांनाच सोसावा लागेल !

अकालींच्या धार्मिक मागण्या सरकारने जवळजवळ मान्य केल्या आहेत. अकालींकरिता (शिखांकरिता) वेगळा पर्सनल लॉ हवा ही त्यांची मागणी सरकार मान्य करेल असे वाटत नाही. अकालींच्या ज्या राजकीय मागण्या आहेत त्या केवळ त्यांच्यापुरत्या मर्यादित ठेवून भागणार नाही. म्हणजेच *अकालींच्या राजकीय मागण्यांना सर्व* शिखांच्या आणि पंजाबमध्ये ४७ टक्के इतकी लोकसंख्या असणाऱ्या हिंदूंचा पाठिंबा आहे की नाही हे पहावे लागेल.

चंदिगड हे पंजाबला द्यावे अशी जेव्हा अकाली मागणी करतात तेव्हा त्याबाबतीत हरयाणात अन्याय तर होणार नाही ना हे केंद्र सरकारला बघावे लागेल, याचा विचार अकाली करत नाहीत. चंदिगडच्या मोबदल्यात अबोहर व फाजिल्का हे भाग हरयाणाला देण्यास अकाली काचकूच करतात. त्याचप्रमाणे नद्यांच्या पाणीवाटपाच्या बाबतीतील अकालींची भूमिकाही आडमुठी आहे. रावी, बियास या नद्यांचे पाणी राजस्थानला देण्यात येऊ नये व हरयाणालाही ठराविक वाटा देण्यात यावा ही अकालींची मागणी म्हणजे त्यांच्या कोतेपणाचे द्योतक आहे. त्याचप्रमाणे हरयाणाबरोबरच त्यांनी राजस्थान व हिमाचलप्रदेशमधील काही प्रदेशांवर हक्क सांगितलाय. हा सर्व प्रकार केवळ हास्यास्पदच नव्हे तर आडमुठेपणाचा कळस आहे !

### विरोधकांची विधायकता

आसामप्रमाणे केंद्रसरकारला पंजाबचा प्रश्नही लोंबकळत ठेवायचा आहे. आतापर्यंत कित्येक वेळी अकालींबरोबर बोलणी करण्याचे नाटक झाले, त्रिपक्षीय बैठका झाल्या; पण त्यातून काहीच निष्पन्न झाले नाही. या बाबतीतील अपयशाचे खापर केंद्राला विरोधी पक्षीयांवर पण फोडता येणार नाही. कारण कधी नव्हे ती विरोधीपक्षीयांनी अकाली आंदोलनाबाबत सामंजस्याची भूमिका घेतली आहे व वेळोवेळी अकालींच्या हिंसाचाराचा, त्यांच्या आडमुठेपणाचा निषेध केला आहे. अकाल्यांना तडजोडीचे धोरण स्वीकारण्याचे व शांतता प्रस्थापित करण्याचे आवाहन करताना विरोधीपक्षीयांनी (जनता, लोकदल, भाजप वगैरे) राजकारण बाजूला ठेवून केवळ राष्ट्रीय भूमिकेतून सरकारला त्याबाबतीत विधायक सल्ला दिलाय. भिंद्रनवाल्यांचे भूत कॉंग्रेसवाल्यांनीच निर्माण केले व आता ते त्यांच्याच मानगुटीस बसावे, हा काळाने *त्यांच्यावर उगवलेला* सूडच म्हणावयास हवा. भिंद्रनवाल्यांनी सुवर्णमंदिराचा आश्रय घेऊन तेथून प्रक्षोभक भाषणे केली, शीख तरुणांना चिथावणी देणारी भाषणे करून त्याच्या टेप्स तयार करण्यात आल्या व पंजाबभर वाटण्यात आल्या. आज भिंद्रनवाले सुवर्णमंदिरात बसून वाटेल त्या देशविरोधी कारवाया करत आहेत; परंतु शिखांच्या धार्मिक स्थानात पोलीस न घुसवण्याची प्रतिज्ञा केलेले केंद्रसरकार त्यांची ही सर्व कृत्ये हताशपणे पहात आहे. अशा प्रकारची समस्या हिंदूमंदिराच्या बाबतीत घडली असती तर सरकारने त्या मंदिरात केव्हाच पोलीस बिनदिक्कतपणे घुसवले असते !

भारतात हिंदू बहुसंख्य आहेत हे त्यांना वरदान न ठरता शाप ठरत आहे हे हिंदूंचे दुर्दैव ! नेहमीच हिंदूंच्या तुलनेत इतर जमातींना झुकते माप देऊन सरकार आपला निधार्मिकपणा दाखवून देत असते. सुवर्णमंदिराच्या परिसरात आतापर्यंत शेकडो वेळा गोळीबार झाला, अनेक हत्या घडवण्यात आल्या, तेथील गुरुनानक-निवासात व अकालतख्तामध्ये अनेक खुनी, दरोडेखोर, गुन्हेगार यांना भिंद्रनवाल्यांनी संरक्षण दिले आहे. हे सर्व गुंड, गुन्हेगार, खुनी आपापली कामगिरी करून आरामात भिंद्रनवाल्यांच्या आश्रयाला येतात. मग त्यांना पोलीस कसे पकडू शकणार ? त्यांच्या देशविरोधी कार्यात पैशाची मदत म्हणून बँकांवर दरोडे घालण्यात येतात, दुकाने लुटण्यात येतात व हे सर्व भरदिवसा चालते तरी हे खुनी, दरोडेखोर क्वचितच मिळतात. पुष्कळ वेळा पेपरात आपण वाचतो की, पंजाबमध्ये अमुक एका ठिकाणी अकाली अतिरेकी मोटारसायकलवरून आले व दोन-चार निरपराध नागरिकांना गोळ्या घालून आरामात पळून गेले ! हे सर्व दिवसा करणे त्यांना शक्य होते. बँकांवर दरोडे दिवसा पडतात. मग एखाद्या वाचकाला असा प्रश्न पडेल की, पंजाबमध्ये कायदा व सुव्यवस्था नावाची चीज अस्तित्वात आहे की नाही ? पंजाबमधील पोलीस काय करतात ? त्यासाठी पंजाबपोलीसदलाबद्दल काही माहिती द्यावी लागेल.

### पंजाबातील पोलीस-दल

पंजाबमधील पोलीसदल हे राजकारण्यांचा अड्डा बनलंय ! प्रतापसिंग कैरों, बादल, झैलसिंग, दरबारासिंग या सर्वच मुख्यमंत्र्यांनी आपल्या कारकीर्दीत पोलीसदलाचे पोलिटिसायझेशन करण्याचा प्रयत्न केला. पोलीस-अधिकाऱ्यांपासून ते कॉन्स्टेबलपर्यंत नेमणु-

कांच्या बाबतीत व बदल्यांच्या बाबतीत राजकारण आणण्यात आले. त्यांच्या नेमणुकांच्या वेळेस जातीयता व राजकीय विचारसरणी या बाबींना प्राधान्य देण्यात आले. या सर्वच मुख्यमंत्र्यांनी आपल्या राजकीय विरोधकांना जरब बसवण्याकरिता व आपली महत्त्वाकांक्षा पुरी करण्यासाठी पोलीस. दलाचा वापर केलाय. याची परिणती म्हणजे पोलीसदलातील नि:पक्षपातीपणा जाऊन प्रत्येकाच्या राजकीय विचारसरणीला महत्त्व प्राप्त झाले व सत्तेवरील राजकारण्यांना खूष करण्याचे उद्योग सुरू झाले. यातून अकार्यक्षमता वाढली. आमदारही पोलिसांच्या नेमणुकांत व बदल्यांत हस्तक्षेप करू लागले. आज भारताच्या राष्ट्रपतीपदी असलेले झैलसिंग हे अकल्यांना सबुरीने घेण्याचा व शांतता राखण्याचा सल्ला देत आहेत; परंतु ते पंजाबच्या मुख्यमंत्रीपदी असताना काय स्थिती होती? भिंद्रनवाल्यांना झैलसिंगांच्याच राजवटीत महत्त्व प्राप्त झाले, ते त्यांच्या राजवटीतच मुजोर बनले! भिंद्रनवाल्यांचा शिखांवर प्रभाव असल्याने अकालींशी मुकाबला करण्यासाठी त्यांनी (काँग्रेसने) भिंद्रनवाल्यांचा उपयोग करून घेतला व त्यांना अकारण मोठेपण मिळवून दिले. त्यांना सवलती देण्यात आल्या व त्यांच्या आततायीपणाकडे सोयिस्करपणे दुर्लक्ष करण्यात आले. १९७९ मध्ये अकाली जनता सरकार पंजाबात सत्तेवर असताना पंजाबमध्ये पोलिसांचा संप झाला. संपातील काही पोलिसांना नोकरीतून कमी करण्यात आले तेव्हा पंजाबचे माजी मुख्यमंत्री झैलसिंग यांनी १९८० च्या निवडणुकांत या नोकरीतून काढलेल्या पोलिसांना असे आश्वासन दिले की, जर निवडणुकांनंतर काँग्रेस सत्तेवर आली तर काढून टाकलेल्या पोलिसांना पुन्हा कामावर घेण्यात येईल. नंतर काँग्रेस सत्तेवर आल्यावर या आश्वासनाची पूर्ती करण्यात आली. अशाने पोलीसदलाकडून कसली अपेक्षा करता येणार?

पंजाब पोलीसदलातील शिखांची मोठी टक्केवारी लक्षात घेता त्यातील काही जणांना अकाली अतिरेक्यांबद्दल सहानुभूती वाटली तर त्यांना दोष देता येणार नाही. अकाली अतिरेक्यांनी पंजाबमध्ये एवढा हिंसाचार माजवूनही त्यातील थोडेच अतिरेकी पकडले जातात व बाकीचे मनमोकळेपणे हैदोस घालतात याचा अर्थ काय? शीख पोलिसांना व सैनिकांना भिंद्रनवाले सतत चिथावणी देत असतातच. पंजाबमध्ये राष्ट्रपति-राजवट जारी करण्यात आल्यावरही परिस्थितीत फारसा फरक पडलेला नाही. पंजाब लष्कराच्या ताब्यात द्यावे ही हिमाचलप्रदेशच्या माजी मुख्यमंत्र्यांची (शांताकुमार) मागणी नक्कीच विचारात घेण्यासारखी आहे!

भिंद्रनवालांच्या आततायी व उग्रवादी भूमिकेकडे ते तरुणांना जास्तीत जास्त संख्येने आकर्षित करत आहेत. याचा परिणाम म्हणजे अकालीदलातील मवाळ नेते माजी मुख्यमंत्री प्रकाशसिंग बादल, सुरजितसिंग बर्नाला, गुरुचरणसिंग तोहरा, लोंगोवाल यांना आपले अकालींमधील नेतृत्व टिकविण्यासाठी आक्रमक भूमिका घ्यावी लागत आहे मात्र अकालींतील अतिरेक्यांवर आता लोंगोवालगटाचे नियंत्रण राहिलेले नाही. भिंद्रनवाले हिंदुद्वेष्टे असल्याने त्यांच्या चिथावणीने हिंदूंवर व त्यांच्या मंदिरांवर हल्ले होत आहेत मात्र याचा बदला इतरत्र घेण्यात आला तर अकाली-नेते त्याविरुद्ध कांगावा करतात; पण पंजाबमधील हिंदूंच्या सुरक्षिततेची काळजी घेत नाहीत! जोपर्यंत सरकार भिंद्रनवाले व त्यांच्या सहकाऱ्यांना पकडत नाही तोपर्यंत पंजाबची समस्या आसामप्रमाणेच लोंबकळत राहणार व त्यांत हिंदू व शीख या दोन्ही जमातींच्या निरपराध माणसांचे बळी पडणार! हिंदू व शीख यांच्यातील बंधुत्वाची भावना नाहीशी होणार! **भिंद्रनवाल्यांना पकडले तर लोंगोवाल, बादल, तोहरा या मवाळ नेत्यांचा शिखांवरील प्रभाव वाढू शकेल व वाटाघाटी सुलभपणे होऊ शकतील; पण त्यामुळे अकाली दलाची शक्ती वाढेल त्याचे काय? इंदिरा काँग्रेसला, अकालींना मजबूत होऊ द्यायचे नाही.** आसामसारखा पंजाबचा प्रश्नही केंद्रसरकार कुजवू पाहत आहे. परंतु याचा परिणाम फार वाईट होईल याची जाणीव केंद्र सरकारला जेवढ्या लवकर होईल तो सुदिनच म्हणावा लागेल! आसामप्रमाणे पंजाबचे आंदोलन दडपता येईल या संभ्रमात केंद्रसरकारने न राहिलेले बरे. पंजाब हा भारताच्या सीमेवरील भाग आहे व सैन्याच्या तिन्ही दलांतील शिखांचे प्राबल्य लक्षात घेता पंजाबचे आंदोलन शांततापूर्ण वाटाघाटीने संपवणे हेच देशाच्या हिताचे आहे. या प्रश्नात केंद्रसरकार मतांचे राजकारण करणार असेल तर मग हा प्रश्न चिघळल्याशिवाय राहणार नाही व सर्व देशात त्याची प्रतिक्रिया उमटेल व त्याची सर्व जबाबदारी केंद्रसरकारवर राहील! हा प्रश्न अजून हाताबाहेर गेलेला नाही तोच त्या बाबतीत खंबीर पावले उचलून, वेळप्रसंगी सुवर्णमंदिरात पोलीस घुसवून, भिंद्रनवाले व त्यांचे सहकारी यांना अटक करणे हे काम ताबडतोब सरकारने करायला हवे! त्यामुळे काही जणांच्या भावना दुखावतील; परंतु मांजराच्या गळयात घंटा बांधण्याचे काम सरकारने ताबडतोब करायला हवे. शिखांमध्ये जो समजूतदारवर्ग मोठ्या संख्येने आहे तो, सुवर्णमंदिरात पोलीस घुसवणे कसे अपरिहार्य होऊन बसले होते, ही वस्तुस्थिती समजून घेईल व अतिरेक्यांना पायबंद घालणे सरकारला सहज शक्य होईल.

शीख अतिरेक्यांशी मुकाबला करण्यासाठी व हिंदूंचे संरक्षण करण्याचा ठेका घेतलेल्या हिंदू सुरक्षा समिती व पंजाब शिवसेना या संघटना हा प्रश्न आणखी बिकट करून ठेवत आहेत. अकाली अतिरेक्यांच्या हिंसाचारास जशास तसे उत्तर देण्याचा या संघटनांनी निर्धार केल्याने हिंदू व शीख या जमातींतील शत्रुत्व अकारण वाढीस लागेल. दिल्लीमध्ये संसदभवनासमोर घटनेच्या २५ व्या कलमाची होळी करण्याचा कार्यक्रम सरकारच्या दक्षतेमुळे फसला; परंतु तो कार्यक्रम प्रकाशसिंग बादल यांच्या नेतृत्वाखाली गुरुद्वाराच्या आवारात उरकण्यात आला. अशा प्रकारे घटनाविरोधी, घटनेचा अपमान करणारे कृत्य सरकारने खपवून घेता कामा नये! असे कृत्य करणाऱ्यांना सरकारने जबर शिक्षा द्यावयास हवी. शिखांकरिता वेगळ्या पर्सनल लॉची मागणी सरकारने मान्य करणे म्हणजे मोठे संकट अंगावर ओढवून घेण्यासारखे आहे. कारण ही मागणी मान्य झाली तर मग बौद्ध व जैन धर्मीयही अशीच मागणी करतील व त्याला अंतच राहणार नाही! **अकालींची ही मागणी सर्व शिखांकडून होत आहे का हेही पाहायला हवे. कारण अकाली हे सर्व शीखजमातीचे प्रतिनिधित्व करत नाहीत.**

आता बैठकींचा घोळ न घालता काही तरी निश्चित निर्णय, मग तो कठोर असला तरी चालेल; पण केंद्रसरकारने घ्यायला हवा. त्याबाबतीत विरोधी पक्ष केंद्रसरकारला पाठिंबा देतील अशी आशा आहे. पंजाबमध्ये कायदा व सुव्यवस्था पूर्वीप्रमाणे कायम करण्यासाठी आता कोणत्याही परिस्थितीत तेथे शांतता प्रस्थापित करून वाटाघाटी यशस्वी करणे हे पंजाबच्याच नव्हे तर देशाच्या हिताचे आहे. नाही तर पंजाब झपाट्याने आसामच्या मार्गाने जाण्यास वेळ लागणार नाही! हा लेख पुरा करत असतानाच पंजाबमधील निरनिराळ्या ठिकाणच्या हिंसाचारातील बळींची संख्या चाळीसच्यावर एका आठवड्यातच जाऊन पोचली आहे! □





'शरच्चंद्रांच्या कादंबऱ्या' ही लेखमाला या अंकापासून सुरू होत आहे. ज्या जीवनमूल्यांना आणि कलामूल्यांना शरच्चंद्रांनी आपल्या साहित्यात वैशिष्टयपूर्ण स्थान दिलं त्याची अभ्यासपूर्ण चिकित्सा पहिल्या लेखात केली आहे. पहिल्या प्रास्ताविक लेखानंतर 'चरित्रहीन', 'विप्रदास', 'श्रीकांत', 'गृहदाह', 'शेषप्रश्न' 'शेषेरपरिचय' या त्यांच्या काही महत्त्वाच्या कादंबऱ्यांवरील रसग्रहणात्मक लेख या मालेत क्रमशः प्रसिद्ध होतील.

# शरच्चंद्रांची कला व मूल्ये

**प्रा. बा. वि. पोतदार**

१९४२ च्या सुमारास 'विप्रदास' या कादंबरीच्या वाचनाने माझा शरत्‌साहित्याशी प्रथम परिचय झाला. त्यानंतर 'श्रीकांत' वाचनात आली. त्यामुळे शरदबाबूंच्या जीवन–दर्शनाविषयी व कलागुणांविषयी एक दृष्टिकोन माझ्या मनात नकळत तयार झाला. 'शुभदा' 'विराजबहू' 'देवदास, 'माधवी' इत्यादि लोकप्रिय छोट्या कादंबऱ्या प्रथम वाचनात आल्या असल्या तर शरदबाबू हे एक भावनाविवशतेने लिहिणारे, क्वचित 'मेलोड्रॅमॅटिक पद्धतीचा वापर करणारे साहित्यिक आहेत असा माझा समज होऊ शकला असता. शरदबाबूंचे देशप्रेम, पीडितांविषयीचा कळवळा, 'बांधिलकी' या गोष्टी महाराष्ट्रीय वाचकांच्या प्रथम डोळ्यांत भरल्या व त्या वेळच्या तरुण पिढीने त्यांच्या मिळतील त्या कादंबऱ्या आधाशासारख्या वाचून काढल्या. मी पुढेही वारंवार वाचत राहिलो. शरत्‌साहित्याच्या कलागुणांमुळेही भारला गेलो. अर्थात कुणाच्याही साहित्याचा विचार व मूल्यमापन करताना त्या लेखकाच्या चांगल्या निर्मितीचाच विचार प्रामुख्याने करायचा असतो.

त्या काळच्या मराठी साहित्यिकात शरच्चंद्रांसारखा कोणी कादंबरीकार आम्हाला आढळत नसे. शिवाय त्यांच्या जीवनाभोवती एक अद्‌भुतरम्यतेचे वलय होते. त्यांचे हळवे मन, बालपणापासून झालेला दारिद्र्याशी झगडा, त्यांची भटकंती, ब्रह्मदेशातील अनुभव त्यांच्या सहवासात आलेल्या स्त्रिया यासंबंधी जी काही माहिती मिळे त्यामुळे रम्याद्‌भुततेची ओढ असलेले वाचक शरत्–साहित्याकडे सहज आकृष्ट होत. पुढेही मी हे साहित्य वारंवार वाचत राहिलो. काही सवड मिळाल्यास एखादी कादंबरी, पूर्वी वाचलेली असली तरी, सहजपणे उचलावी; पण ती संपेपर्यंत खाली ठेवली जाऊ नये, असे वारंवार होई. कारण झपाटून टाकण्याचो, मन भारावून सोडण्याची शक्ती या साहित्यात आहे. शरदबाबूंचे कथाविश्व हे आज तरी काही वाचकांना एक वेगळे, भारलेले विश्व भासते. कारण आज आपण शहरी मंडळी आपल्या अवतीभवती पाहातो त्यापेक्षा ते थोडे वेगळे आहे. त्यात माणुसकी, उदात्तता, मनाचा मोठेपणा, वात्सल्य, निःस्वार्थीपणा या गुणांचे व त्या वेळच्या विशिष्ट जमीनदारी समाजरचनेचे, एकत्र कुटुंबपद्धतीच्या जीवनसरणीचे मनोज्ञ चित्रण आहे. वर उल्लेखिलेले गुण असलेल्या आणि स्वतःला समाजसेवेत, निःस्वार्थी व निरपेक्ष प्रेमभावनेत, वात्सल्यात, ईश्वरभक्तीत वा तत्सम जीवनमूल्यांत हरवून बसलेल्या माणसांचे हे विश्व आहे आणि तरीही ते अतिशय वास्तव आहे. कारण आजही अशी माणसे आपल्या दृष्टीला पडतातच. वरवर सामान्य दिसणारी, चुका करणारी, असंयमी अशी माणसेही वरील गुणांमुळे त्या विश्वात उन्नत झालेली दिसतात. या व्यक्तींचा मुख्य गुण म्हणजे 'माणुसकी'. म्हणूनच, जीवनातील वास्तवाशी हे चित्रण सुसंगत आहे काय, हे चित्रण एकांगी नाही काय, असा प्रश्न गंगाधर गाडगिळांसारख्या आधुनिक टीकाकारांनी उपस्थित केलेला आहे. अमाप



**प्रा. बा. वि. पोतदार**

शरच्चंद्रांच्या कादंबऱ्यांवरील या लेखमालेची प्रसिद्धीकडे वाटचाल होत असतानाच प्रा. बा. वि. पोतदार यांना अकाली मृत्यू आला. (२ फेब्रुवारी १९८४). त्यांचा जन्म १९२६ मध्ये पंढरपूर येथे झाला. १९४९ मध्ये मुंबई विश्वविद्यालयाची इंग्रजीची एम्. ए. पदवी घेतल्यानंतर त्यांनी अनेक महाविद्यालयांतून इंग्रजीचे प्राध्यापक व प्राचार्य म्हणून काम केले. १९५९ व १९६१ मध्ये त्यांनी लंडन व बर्मिंगहॅम विश्वविद्यालयांच्या, इंग्रजीचे अध्यापन व शिक्षणशास्त्र यांच्या पदव्या मिळवल्या व या विषयांवर पुढील आयुष्यात व्यासंग व लेखन केले. गेली अकरा वर्षे ते उदगीरच्या महाविद्यालयात प्राध्यापक होते. बुद्धिमान, रसिक, नाट्य व चित्रकला यांचे भोक्ते व विद्यार्थीप्रिय म्हणून त्यांचा लौकिक होता. सामाजिक व वैयक्तिक वागणुकीतले दंभ, असत्याचरण व हीनता यांच्याशी त्यांनी सततचा, मनस्वी सामना केला. त्यांनी जन्मभर जोपासलेल्या अनेक आवडीच्या गोष्टींपैकी, शरद्साहित्य ही एक होती. □

पैसा वा सत्ता मिळविण्याची तीव्र इच्छा, स्त्रीला भोगण्याची वासना, अशा उत्कट अनुभवांचे चित्रण या विश्वात नाही म्हणून ते अपुरे आहे असे गाडगिळांचे म्हणणे दिसते; परंतु एक तर लेखकाने कोणत्या अनुभवांवर लिहावे, त्याचे जीवनदर्शन कशा प्रकारचे असावे, हे सांगण्यापेक्षा, जे त्याचे दर्शन आहे ते त्याने वाचकांना कशा प्रकारे घडविले आहे, त्याच्या विश्वात अंतर्गत सुसंगती आहे की नाही हे टीकाकाराने पाहाणे बरे. दुसरे असे की, वास्तवावरची शरदबाबूंची पकड अतिशय पक्की होती असे बहुतेक सर्व टीकाकारांनी म्हटलेले आहे. वास्तवता हा त्यांचा एक मोठा गुण समजला जातो.

वाईट माणसे, इयागोसारखे व्हिलन शरदबाबूंच्या विश्वात सापडत नाहीत, अशीही एक उणीव गंगाधर गाडगिळांनी दाखवलेली आहे. शरदबाबूंची जीवनदृष्टीच करुणापूर्ण आहे हे खरे. जे वाईट किंवा पाप, त्याचा तिरस्कार केला पाहिजे, परंतु तो वाइटाचा व पापाचा, त्या त्या व्यक्तीचा नव्हे असे शरदबाबूंचे जीवितविषयक तत्त्वज्ञान आहे. माणसे अनेक प्रकारची असतात. त्यांच्यात जे वाईट असते ते पुष्कळदा अज्ञानातून, परिस्थितीतून, संस्कारातून उद्भवलेले असते. त्यामागील कारणे शोधून काढून ते वाईट नाहीसे करता येणे शक्य असते. त्यामुळे सहिष्णु आणि सहानुभूतीच्या दृष्टिकोनातून वाईट माणसांकडेही पाहाण्यास शिकले पाहिजे, या भूमिकेतून शरदबाबू जीवनाकडे पाहाताना दिसतात.

## पात्रांचे अचूक विश्लेषण

अर्थात वाईट माणसे त्यांच्या विश्वात आहेतच. 'विप्रदास'मधील विप्रदासकडून फार मोठी रक्कम उसनी घेऊन, नंतर बहुधा त्याची खोटी सही करून 'शहा चौधरी आणि कंपनी' दिवाळखोर ठरवून, विप्रदासच्या सर्वस्वाच्या अपहारास कारणीभूत झालेला त्याचा मेहुणा शशधर येथे आहे. 'दत्ता' कादंबरीमधला विजयेचे पालकत्व आग्रहाने स्वतःकडे ठेवून, तिने आपला मुलगा विलास याच्याशी लग्न करावे या हेतूने तिच्यावर प्रचंड मानसिक दडपण आणणारा व ब्राह्मणसमाजाची तत्त्वे ढोंगीपणाने बडबडत राहणारा म्हातारा रासविहारी या विश्वात आहे व शरदबाबूंनी एक कलाकृती रेखाटावी तसा त्याचा ढोंगीपणा व कावेबाजपणा मोठ्या चवीने, तपशील भरून रेखाटला आहे. 'श्रीकांत'मध्ये एका तरुण बंगाली बाबूची एक छोटी कथा आहे. तो ब्रह्मदेशात येऊन एका ब्राह्मी मुलीशी विवाह करून रहातो त्याची पत्नी त्याच्यावर मनापासून प्रेम करते, दासीप्रमाणे त्याची सेवा करते; परंतु त्याचा वडील भाऊ त्याला परत भारतात घेऊन जाण्यासाठी येतो. ब्राह्मी स्त्रीशी विवाह हा खरा विवाहच नव्हे असे त्याला पटवून देतो. तंबाखूच्या खरेदीसाठी एका गावी चाललो आहोत असे भासवून हे दोघे भाऊ भारताकडे पोबारा करतात. जाताना हा तरुण पत्नीकडून भांडवलासाठी मोठी रक्कम घेतो, तिची अंगठीही काढून घेतो. बोटीच्या धक्क्यावर ती पोहोचविण्यासाठी आलेली असताना तिला न कळणाऱ्या बंगाली भाषेत तिची टिंगल करून भोवती जमलेल्या मंडळींना हसवितो. अशी हृदयहीनता हाच शरदबाबूंच्या मते सर्वात मोठा 'व्हिलन'. 'श्रीकांत'मधील अभयेचा पती हाही एक हृदयहीन व कावेबाज दुर्जन आहे. त्याच्या पानतंबाखूने पिवळ्या-तांबड्या झालेल्या दातांचा व ओठांचा उल्लेख करून शरच्चंद्रांनी आपल्या डोळ्यांपुढे एक घृणास्पद प्रतिमा उभी केलेली आहे. भारतातून तो नशीब काढण्यासाठी ब्रह्मदेशात आलेला होता व पत्नीला विसरून तिकडेच रमला होता. त्याचा पत्ता काढण्यासाठी रोहिणीबाबू नामक तरुणाबरोबर अभया ब्रह्मदेशात येते. पतीच्या ब्रह्मी स्त्रीवरोबर राहाण्याचीही तिची तयारी असते; परंतु पती तिचा छळ करून काठीच्या जोरावर तिला हाकलून देतो. या गृहस्थाने एका कंपनीतील काही मालही पळविलेला होता व तो पकडलाही गेला होता. इंद्रनाथचा एक दूरचा शहरी भाऊ बेफाम स्वार्थीपणामुळे इंद्रनाथ व श्रीकांतकडून जो कामे करून घेतो तिचे चित्र श्रीकांतने अशा पद्धतीने रंगविले आहे की, हा गृहस्थ शेवटी हास्यास्पद बनतो. 'ब्राह्मणाची मुलगी' मधील रासमणी ही एक गरीब व स्वार्थी म्हातारी. धार्मिकतेचे ढोंग करणाऱ्या जमीनदाराशी लागून राहून ती आपला

क्षुद्र स्वार्थ साधत राहाते व त्यासाठी दुष्टपणेही वागते. ' रामेर. सुमति ' या प्रसिद्ध गोष्टीमधील दिगंबरी ही आपल्या संकुचित मनामुळे आपल्या मुलीच्या वेगळ्या स्वार्थाचा व सुखाचा हिशेब करते व मुलीच्या छोट्या चुलत दिरावर सतत राग धरते.

शरद्‌बाबूंना वाइटाची पुरती ओळख होती. जगात वाईट लोक पुष्कळ असतात; परंतु अभयेलाच नव्हे तर सर्वांनाच मदत करणारी श्रीकांतसारखी माणसे सतीशसारखी, इंद्रनाथसारखी माणसेही असतात अशा चांगल्या माणसांना आपण सक्रिय पाठिंबा द्यावा, स्वत: थोडे नि:स्वार्थी व थोडे निर्भय बनावे, म्हणजे जग नीटपणे चालण्यास मदत होते अशी शरद्‌बाबूंची भूमिका आहे व तीत काही चूक आहे असे म्हणता येणार नाही.

शरद्‌साहित्यात त्या काळच्या मानाने कलागुण फार मोठ्या प्रमाणात आहेत. वाचकाचे मन गुंतविणारी कथारचना, प्रासादिक, रोजच्या व्यवहारातील परंतु सूचक भाषेचा वापर, पार्श्वभूमीत तत्त्वचिंतकाची मूल्याधिष्ठित भूमिका, तपशिलाचे सूक्ष्म निरीक्षण व सुयोग्य वापर हे त्यांचे काही गुण. मानवी मनातील प्रेरणा व कल्लोळ सूचित करण्यासाठी ते तपशिलाचा वापर करतात, तपशिलासाठी तपशिलाचा उपयोग करणे हा गुण म्हणता येणार नाही. त्यांच्या बऱ्याचशा कथानकांना सुरुवात, मध्य व शेवट आहे. कादंबरीत नाट्यात्मक प्रसंग असावेत, वाचकाचे चित्त गुंतविणारे कथानक असावे, कथनपद्धती सुटसुटीत असावी, याचे भान ते नेहमी ठेवतात व हेही त्यांच्या अमाप लोकप्रियतेचे एक कारण असावे. ' चरित्रहीन ', ' विराजबहू ', ' शुभदा ' इत्यादि कादंबऱ्यांच्या रचनेत विस्कळितपणा जाणवतो; पण या त्यांच्या सुरुवातीच्या कादंबऱ्या. शिवाय मासिकांतून त्यांच्या कथा क्रमश: प्रसिद्ध होत असत व संपादकांची पत्रे आल्यावर शरद्‌बाबू पुष्कळदा पुढील भाग लिहिण्यासाठी बसत असत, हेही लक्षात घेतले पाहिजे.

शरद्‌बाबूंच्या कादंबरीत व्यक्तिचित्रण, संवाद, कथासूत्र हे सर्व घटक एकरूप होऊन जातात. त्यामुळेही त्यांना ' नाट्यात्म ' हे विशेषण लावता येईल. ' विप्रदास ', ' दत्ता ' ( विजया ) ' देना पावना ' ( भैरवी ) या कादंबऱ्या या दृष्टीने तपासून पाहाण्यासारख्या आहेत. ' दत्ता 'मध्ये एक प्रकारचे प्रसन्न वातावरणही आढळेल. वरील अर्थाने एडविन म्यूर या टीकाकाराने ' नाट्यात्म ' हा शब्द वापरलेला आहे आणि उदाहरण म्हणून जेन ऑस्टेनच्या ' प्राईड अ‍ॅण्ड प्रेज्युडिस ' या कादंबरीचा त्याने उल्लेख केलेला आहे. साध्या सामान्य प्रसंगांना नाट्यात्म व धक्कादायक पद्धतीने चित्रित करून त्यात विशेष अर्थ भरण्याचे कौशल्य शरच्चंद्र वारंवार दर्शवितात. एक अगदी साधे उदाहरण ' दत्ता ' मधून घेता येईल. विजयेला नरेन्द्रबद्दल आकर्षण वाटू लागलेले आहे; परंतु पूर्वीपासून रासबिहारी व त्याचा मुलगा विलास यांनी तिचे मन नरेन्द्रविरुद्ध कलुषित करून दिलेले आहे. नरेन्द्र प्रथमपासूनच अशक्त व आजारी असून काही दिवसांचा सोबती होता असे विलासने तिला भासविलेले असते. एक दिवस नरेन्द्र तिला भेटायला येतो. तो बाहेरच्या हॉलमध्ये वाट पाहात बसलेला असताना हवा जरा कोंदट वाटल्याने तिथली एक खिडकी तो उघडून ठेवतो. विजया माडीवरून खाली येताच ते पाहून चकित होते. कारण ते दार फारच घट्ट बसलेले असल्याने नोकरांनाही ते उघडणे शक्य झालेले नव्हते. ती काहीच बोलत नाही; परंतु नरेन्द्रच्या उंच, किडकिडीत शरीरयष्टीत किती सामर्थ्य होते हे तिच्या लक्षात अशा प्रकारे येते. विलासने तिला खोटेच सांगितले होते हे अशा प्रकारे तिच्या लक्षात येऊन, त्या दिवसापासून ती विलास व रासबिहारी यांच्यापासून सावध राहू लागते.

शेक्सपिअर व अन्य मोठ्या नामवंतांत दिसणारा एक गुण शरच्चंद्रांत वारंवार दिसतो. योगायोगाचा उपयोग ते सहजपणे करून घेतात ' चरित्रहीन ' मध्ये मोक्षदा ही जुनी दासी सतीशला रस्त्यात सहज भेटते व तिच्या कामासाठी तिच्या खोलीवर सतीश गेल्यामुळे शेजारच्याच खोलीत राहाणाऱ्या सावित्रीच्या खोलीत तो येऊन पोहोचणे हा योगायोग लेखकाने घडवून आणलेलाच आहे. विशिष्ट मनोवृत्तीत सतीश व सावित्री असताना झालेल्या या भेटीमुळे सावित्री व सतीश यांच्या मनातील भावनांचा कल्लोळ, करावा लागलेला संयम, गैरसमज, मनावरचे ताण या गोष्टींच्या दर्शनासाठी या भेटीचा उपयोग होतो.

लहान लहान प्रसंग व संवाद यात सूचक अर्थ भरण्याचे व त्या अर्थाचे अनेक पदर उलगडून दाखविण्याचे कार्य शरद्‌बाबू सहज मार्मिकतेने करू शकतात. ' तुम्हीही आमच्याबरोबर जबलपूरला चला ' असे ' गृहदाह ' मध्ये अचलेने सुरेशला विशिष्ट परिस्थितीत म्हणणे; ' शेषेर परिचय ' मध्ये तारकच्या निमंत्रणाबरोबर सवितेने हरिणपूरला जाण्यास निघणे व त्यामुळे राखाल डिवचला जाणे, ही काही उत्कृष्ट उदाहरणे. त्यांचा विचार अन्यत्र केलेलाच आहे. अशा प्रसंगावर विविध दृष्टिकोनांतून भाष्य करता येते व प्रत्येक भाष्य आपापल्या परीने समर्थनीय असते. पात्रांचे मनोविश्लेषण स्वत: शरद्‌बाबू कथनाद्वारे करीत नाहीत. काही स्पष्टीकरणे देत नाहीत. सुयोग्य व सूचक तपशिलाची निवड करून व्यक्तींच्या हालचालींचं चित्रण करून, सूचक संवाद वापरून ते वाचकांच्या हातून पात्रांचे मनोविश्लेषण घडवून आणतात. ते साधण्यासाठी पात्रांच्या बारीकसारिक क्रिया, अन्य तपशील व संवाद या सर्वांवर लेखकाचे कुशल नियंत्रण असावे लागते.

## मानवतावाद हीच बांधिलकी

बंकिमचंद्रांकडून शरच्चंद्रांनी कथानकप्रधान कादंबरीचा वारसा घेतला होता; परंतु शरच्चंद्रांच्या हाती आल्यावर कादंबरी ही मूलत: माणसांची, त्यांच्या अंतरंगांची, त्यांच्या मूल्यांची कथा झाली. पात्रांच्या मनोवस्था विविध प्रकारे सूचित करणे, त्या सूचनांद्वारे मागचे-पुढचे प्रसंग एकमेकांशी जोडणे, त्यावर प्रकाश टाकणे व त्या योगे व्यक्तींच्या जीवनावर व मूल्यांवर काही भाष्य सूचित करणे, अशा प्रकारचे आधुनिक तंत्र शरद्‌बाबूंनी वापरलेले आहे ते उत्तम कथनकार तर आहेतच; परंतु श्रीकांत व राजलक्ष्मी यामधील भावानुबंध व त्यात घडून येणारे सूक्ष्म बदल, राजलक्ष्मीच्या मनाची कुचंबणा व तिला वारंवार जाणवलेले वैफल्य, सावित्री व सतीश यांच्या मनातील भावनिक कल्लोळ व त्यांच्या मनाची तगमग, वंदनेचे अंतर्निरीक्षण, अचलेच्या मनाची दोलायमान वृत्ति, पश्चात्ताप पावूनही प्रेमशोधनाचे कार्य सोडून न देण्याचा सवितेच्या मनाचा

हट्ट, स्वार्थी इष्टमित्रांच्या तावडीत सापडलेल्या विजयेची 'दत्ता 'मध्ये दिसणारी कुचंबणा अशा भाववृत्तींच्या सूक्ष्म व सूचकतेने केलेल्या चित्रणातून शरद्बाबू त्या त्या व्यक्तीचे मनात जपलेल्या काही मूल्यांवर प्रकाश टाकीत जातात. व्यक्तीच्या वरवर दिसणाऱ्या वर्तनाखाली तिच्या अंतरंगात दडलेले काही हेतू व जाणिवा असतात. त्या त्यांच्या वर्तनाद्वारे उलगडून दाखविताना शरद्बाबू त्या व्यक्तीच्या अंतरंगातील मूल्यावर प्रकाश टाकतात. व त्यामुळे सामान्य वाटणाऱ्या व्यक्तीही उदात्त बनतात.

चित्रण रेंगाळणाऱ्या पद्धतीने न करता ते द्रुतगतीने करीत जाण्याची शरदबाबूंची पद्धत आहे. त्यामुळे एखाद-दुसऱ्या प्रसंगीही कादंबरी वाचताना कंटाळा येत नाही. 'श्रीकांत 'मध्ये वापरलेली पद्धत अर्थात थोडी विलंबित आहे. कारण चार भागांची ही विस्तृत कादंबरी म्हणजे नायकाच्या भटकेगिरीची कथा आहे. श्रीकांत या नायकाची भूमिका प्रेक्षकाची व तत्त्वचिंतकाची आहे. श्रीकांत जिथे जिथे जातो व जे जे प्रसंग घडत जातात त्यांना बांधणारे सूत्र म्हणजे श्रीकांतचे अस्तित्व. इंग्रजीत अशा कादंबऱ्यांना 'पिकॅरस्क ' कादंबऱ्या म्हणतात. आपल्या कादंबऱ्यांत शरदबाबूंनी वापरलेले संवाद मोठे सूचक, द्रुतगतीचे, क्वचित नर्मविनोदाने युक्त, पण नेहमीच मनाचा ठाव घेणारे असतात. अर्थात असे बोलणारी माणसे बुद्धिमान व संवेदनाक्षम असली पाहिजेत. शरच्चंद्रांच्या लेखनाचा हा एक दोष म्हणूनही सांगता येईल की नोकरचाकर व समाजातील खालच्या स्तरातील माणसे सोडली तर त्यांची पात्रे, विशेषत: नायक-नायिका, बुद्धिमान व संवेदनाक्षम असतात. या व्यक्ती एकमेकांशी थोडक्यात व सूचक शब्दांत बोलल्या तरी संभाषणाचा अर्थ एकमेकांना चटकन् समजू शकतो. मनातले विचार वा भावना योग्य प्रकारे व्यक्त करण्याचे सामर्थ्य त्यांच्यात असते. जगाच्या प्रत्यक्ष व्यवहारात नेहमीच असे घडत नाही. अर्थात या उत्कट व्यक्तींच्या जोडीला मनात फारशी गुंतागुंत नसलेली व साध्या सरळ भाषेत बोलणारी माणसेही या विश्वात पुष्कळ आहेत. त्यामुळे हे विश्व जगावेगळे वाटत नाही, वास्तव वाटते. शरदबाबूंच्या मनातले विश्व व बाहेरचे विश्व यांचा समतोल या साध्या व सामान्य माणसामुळे साधला जातो. त्यांच्या वास्तव तपशिलाचाही असाच उपयोग होतो. त्यांच्या बाह्य विश्वातील तपशील अगदी वास्तव असतो; परंतु बऱ्याचशा पात्रांचे अंतरंग मात्र काही मूल्यांनी भारले गेलेले असते.

शरद्साहित्याचे विश्व फार विस्तृत आहे. कारण शरदबाबूंचा जीवनानुभव फार विस्तृत होता. मुद्दाम पाहू लागलो तर विविध स्तरांतील व्यक्ती या विश्वात वावरताना दिसतील व त्यामुळे एक वैचित्र्यपूर्ण व म्हणून रोमॅन्टिक अनुभव या विश्वाकडून संक्रांत होती असे दिसून येईल. सुशिक्षित व अशिक्षित, भिकारी, गोसावी, वैरागी, गारुडी, स्वार्थी व ध्येयवादी, उदार व कंजूष, ढोंगी आणि प्रामाणिक, दांभिक आणि लब्धप्रतिष्ठित, प्रांजळ व निष्पाप, व्यसनी व ईश्वरनिष्ठ, कर्मठ व धर्मभिरू, गावगुंड व समाजसेवक, इमानी व फसवे, जमीनदार व सरकारी कर्मचारी, भटके, मजूर व शेतकरी, आश्रित व परिजन, माता व मुले, विधवा व परित्यक्ता, कर्मठ परंपरावादी स्त्रिया, पतिता व सती, वत्सल अन्नपूर्णा; सुशिक्षित व स्वतंत्र बाण्याच्या स्त्रिया, स्वार्थी व कजाग स्त्रिया अशी अनंत पात्रे त्यांनी जगाच्या रंगभूमीवर पाहिली, हृदयात साठवली व आपल्या कथाविश्वात सहजपणे वापरली. चार-दोन तपशिलात दुय्यम पात्रे रेखाटून शरदबाबू त्यांना जिवंत ठेवू शकतात. व्यक्तीच्या बाह्य स्वरूपाच्या वर्णनावर त्यांचा मुळीच भर नाही. व्यक्तीच्या मनोव्यापारांच्या सूक्ष्म तपशिलामुळे त्यांची पात्रे जिवंत राहतात.

माणसाच्या मनाची संस्कृती समाजाने त्याला दिलेल्या दर्जावर अवलंबून नसते हे शरदबाबूंनी लहानपणापासून ओळखले होते, व्यक्तीचे दुःख समाजामुळे निर्माण झालेले असो वा त्या व्यक्तीच्या दोषामुळे निर्माण झालेले असो; शरदबाबूंना त्या व्यक्तीविषयी सहानुभूती वाटते. दुर्बल इच्छाशक्तीची, आळशी माणसे अंगी धाडस नसल्याने ज्यांच्या जीवनात दुःख निर्माण झालेले आहे अशा सर्वांबद्दल शरदबाबूंना सहानुभूति आहे. घरातून पळून गेलेली मुले, जिप्सी वृत्तीने भटकणाऱ्या व्यक्ती, क्षणिक मोहामुळे कायम परागंदा व तिरस्कृत झालेल्या स्त्रिया, उदार मनाचे परंतु दारूसारख्या व्यसनातून मुक्त न होऊ शकणारे पुरुष या सर्वांबद्दल शरदबाबूंच्या मनात करुणा आहे. अर्थात अशा व्यक्तींच्या मूढतेची व दोषांची जबाबदारी सोयिस्करपणे समाजाच्या माथी मारून ते मोकळे होत नाहीत. या व्यक्तींतील दोषांचे दर्शन शरदबाबू आपल्याला घडवितातच; पण त्यांचा न्याय करण्याची या लेखकाची वृत्ती दिसत नाही. केवळ अज्ञानामुळे माणसे अशी वागतात असेही नाही; माणसाला कळते पण वळत नाही हे शरदबाबूंना माहीत आहे. 'गृहदाह' मधील अचला याचे एक उदाहरण आहे; पण ही माणसेच आहेत. त्यामुळे आपण त्यांच्याशी कठोर होता कामा नये अशी शरदबाबूंची धारणा आहे. म्हणूनच, 'चरित्रहीन 'मध्ये सतीशला किरणमयीसारख्या स्त्रीविषयीही सहानुभूति वाटते; म्हणूनच श्रीकांतच्या आत्याबाई निरूआक्काला चोरून मदत करीत राहतात. जीवनाकडे पाहताना कर्मठ दृष्टिकोन ठेवून चालत नाही. मानवतावादी दृष्टिकोन ठेवावा लागतो याची जाणीव हीच शरदबाबूंची खरी 'बांधिलकी '.

शरदबाबूंना प्रिय असलेल्या गुणांचा उत्कर्ष त्यांच्या सर्व नायकांत दिसून येतो; परंतु केवळ सद्गुणांनी वा दुर्गुणांनी भरलेल्या व्यक्ती त्यांनी केव्हाच निर्माण केल्या नाहीत. 'चरित्रहीन ' मधील सतीश व 'गृहदाह' मधील सुरेश अनावर व असंयमी स्वभावाचे असल्याने दुर्बल आहेत; परंतु ते उदार मनाचे आहेत, धाडसी आहेत, परोपकारी आहेत. देवदास व्यसनामुळे दुर्बल आहे; परंतु त्यात भावनेची उत्कटता आहे. 'बरा दीदी ' (माधवी) मधील सुरेंद्र खूपच दुर्बल आहे; परंतु त्यात भावनेची निष्पापता आहे. जीवनात स्थिर राहाण्यासाठी सतीश, सुरेश, सुरेंद्र, देवदास यांना स्त्रीप्रेमाची आवश्यकता भासते; परंतु दुसऱ्यास मदत करण्यासाठी सतीश वा सुरेंद्र स्वतःला सहज संकटात झोकून देऊ शकतात. सरळपणे वागणे, परोपकारी

**माणसाच्या मनाची संस्कृती समाजाने दिलेल्या दर्जावर अवलंबून नसते हे शरदबाबूंनी ओळखलं होतं.**

वृत्ती हे गुण वरील नायकांशिवाय रमेश (पल्लीसमाज) श्रीकांत, इंद्रनाथ, विप्रदास, राखालराज, नरेंद्र, उपेंद्र या सर्वच पुरुष-पात्रांत दिसून येतात. शेवटचा परिचयमधील व्रजबाबू हे व्यवहारी जगाच्या दृष्टीने फार दुर्बल आहेत; परंतु ईश्वरनिष्ठा, सत्यनिष्ठा, निष्पापता, निःस्पृहता या गुणांमुळे ते नैतिकदृष्टचा सबल आहेत. ज्यांची मने खंबीर वा स्थिर आहेत अशा व्यक्तींच्या गटात विप्रदास, उपेंद्र, डॉक्टरबाबू, श्रीकांत, रमेश, नरेंद्र, गुणींद्र यांचा समावेश होतो. यांनीही नैतिकता, चांगुलपणा, माणुसकी अशा गुणांनाच प्राधान्य दिलेले आहे. 'पंडित मशाय' मधील वृंदावनप्रमाणे शरदबाबूंच्या सर्व नायकांना एक प्रकारची सामाजिक जाणीव आहे.

शरदबाबूंनी स्त्रियाही विविध प्रकारच्या रंगविल्या. संसार, गृहिणीपद, मातृत्व यांना मुकलेल्या व त्यामुळे ज्यांच्या जीवनदुःखाने व वैफल्याने ग्रासलेले आहे अशा स्त्रियांच्या गटात माधवी, सावित्री, राजलक्ष्मी, शारदा, रमा, अन्नदा, कमललता इत्यादींचा समावेश होतो. मोहामुळे फसलेल्या व नंतर पश्चात्तापाने पोळत राहाणाऱ्या सविता, अचला, किरणमयी, 'स्वामी' या कथेतली सौदामिनी यांचा दुसरा एक गट. तिसऱ्या प्रकारात सुनंदा, अभाया, वंदना, भारती, कमल अशा स्वयंप्रज्ञ स्त्रिया येतात. सेवाभाव, वात्सल्य हे या सर्वच स्त्रियांचे स्थायीभाव. 'शेष प्रश्न' मधील बंडखोर कमललासुद्धा पुरुषाला समोर बसवून जेवायला घालण्यात व पंख्याने वारा घालण्यात आनंद लाभतो. त्यागी वृत्तीमुळे, आंतरिक मूल्यांमुळे, सेवाभावामुळे या स्त्रियांची मने माधुर्याने भरलेली आहेत. रूढी व परंपरा यांचा बळी झालेल्या राजलक्ष्मी, सावित्री, शारदा यांना बंड करणे शक्य होते; परंतु या स्त्रियाही रूढी व परंपरा नाकारताना दिसत नाहीत; परंतु परिस्थितीमुळे प्रचंड दुःख जरी त्यांच्या वाट्याला आलेले असले तरी पारंपारिक मूल्येच त्यांना मुळात मान्य आहेत. कारण एक तर दुःख ही गोष्ट भारतीय धारणेप्रमाणे नकारात्मक नाही. समर्पणवृत्तीमुळे त्यांचे दुःखही सौंदर्य व माधुर्य प्राप्त करू शकते. आत्मसमर्पणवृत्तीमुळे त्या उदात्त होतात. आपल्या वाट्याला आलेले भोग शरदबाबूंच्या स्त्रिया मुकाट्याने भोगत राहातात. त्यांनी परिस्थितीविरुद्ध बंड केलेच तर ते एखाद्या तपशिलाविरुद्ध असते. संपूर्ण परंपरावादाविरुद्ध असत नाही आणि त्यामुळे ते परिणामकारक होत नाही. दुसरे असे की, बंड केल्यास व्यक्ती समाजाबाहेर फेकली जाते, बहिष्कृत होते व ते या स्त्रियांना नको आहे. त्या व्यक्तिवादी नाहीत. तडजोड स्वीकारून, रोजच्या जीवनात कडवटपणा येऊ न देता सेवाभावाने जगात राहाण्याचे धैर्य मात्र त्या दाखवतात. यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वास प्रगल्भता व सौंदर्य प्राप्त होते. शारीरिक प्रेमाने सुख मिळेल; परंतु मनाचे समाधान प्राप्त होणार नाही अशी माधवी, सावित्री आदि स्त्रियांची धारणा आहे. गृहिणीपदातून जे पवित्र प्रेम स्फुरते तेच त्यांना मान्य आहे व गृहिणीपदाची सांगता मातृत्वात होणे हेच त्या स्वाभाविक समजतात. शरदबाबूंची प्रातिनिधिक स्त्री सुखी संसार हे ध्येय मानणारी, मुलेबाळे व पति यांचे सुख पाहाणारी, अतिथि-अभ्यागताचे मनापासून स्वागत करणारी, दिवसभर सांसारिक कामात व्यग्र राहून त्यात परम सौख्याचा लाभ पाहाणारी अशी आहे. हे सुख विधवा, पतिता, परित्यक्ता यांना मिळत नव्हते ही त्यांची व शरदबाबूंची खरी तक्रार होती. ते आजच्या अर्थाने स्त्रीस्वातंत्र्यवादी नव्हते, 'सफ्रेजिस्ट' नव्हते.

## सूक्ष्म, तरल प्रीतिभावना

पण विशिष्ट प्रकारची पीडित, सतत अश्रू गाळणारी. दयनीय अशी स्त्रीच शरदबाबूंनी रंगविली, असा समज त्यांची एखाद-दुसरी कादंबरी वाचून होणे शक्य असले तरी स्त्रीचित्रण इतके एकसुरी नाही हे सहज लक्षात यावे. रमेची कजाग मावशी, आडमुठेपणाने व संशयी स्वभावामुळे पतीचे जीवन असह्य करून सोडणारी 'सती', वात्सल्यभावनेच्या अतिरेकाने उन्मनी झालेली बिंदू, ब्राह्मण पतीवर निष्ठायुक्त प्रेम करणारी गारुडी विलासी, ध्येयवादी सुनंदा, आधुनिक वंदना, बंडखोर अभया, बुद्धिवादी कमल, मानवतावादी भारती, पोरक्या दिरावर पुत्रवत् प्रेम करणारी 'रामेर सुमती'-मधील नारायणी व तिची कजाग आई, हृदयाशी धरून वाढविलेल्या विप्रदासबरोबर शेवटी आंधळेपणाने भांडणारी, दयामयी, सख्ख्या मुलापेक्षा सावत्र मुलावर अधिक विश्वास ठेवणारी 'वैकुंठचे मृत्युपत्र' मधील भवानी, अतीव दारिद्र्यामुळे व मुलाच्या आजारामुळे सुनेच्या व्यभिचाराकडे दुर्लक्ष करणारी 'चरित्रहीन' मधील अघोरमयी, प्रेमभावनेमुळे भैरवीच्या आदर्शापासून ढळलेली; परंतु गरीब रयतेला बंडखोरीचा आदेश देणारी 'देना पावना' मधील षोडशी, मुळात नवऱ्याला सोडून देशकार्यासाठी आलेली, मग एका भोळ्या कवीला नादी लावून शेवटी एका मुसलमानाबरोबर विवाह करणारी 'पथेर दाबी' मधील नवतारा, शिवाय मोहामुळे स्खलनशील झालेल्या स्त्रिया अशा विविध प्रकारच्या बऱ्यावाईट स्त्रिया शरदबाबूंनी रंगविल्या आहेत व प्रेमभावनेचे व स्त्रीस्वभावाचे दर्शन विविध अंगांनी आपल्याला घडविले आहे.




संसार करीत असतानाच संसाराच्या ठराविक चाकोरीबाहेरचा विचार जिने केलेला आहे अशी एक स्त्री 'श्रीकांत'मध्ये आहे. ती म्हणजे यदु तर्कालंकार याची आदर्शवादी पत्नी सुनंदा. ही एक विद्वान ब्राह्मणी. बापाकडे म्हणजे तर्कालंकाराच्या गुरूकडे ती धर्मशास्त्र व नीतिशास्त्र शिकली होती. मोठा दीर व जाऊ यांना ती मातापित्यासमान मानते; पण एका गरीब विधवेची जमीन आपल्या मोठया दिराने गिळंकृत केलेली होती हे कळल्यावर ते पापाचे अन्न तिच्या घशाखाली जात नाही. पती व मुलगा यांना घेऊन ती घराबाहेर पडते व अतीव हालअपेष्टात दिवस काढते. दारिद्रयाचे दुःख तिला मुळीच जाणवत नाही, इतकी ती आपल्या धर्मशास्त्राशी समरस झालेली आहे. अशाच प्रकारे बापाकडे शास्त्रे शिकलेल्या मैत्रेयीचे चित्रण 'विप्रदास'मध्ये शेवटी शेवटी आहे. द्विजदासला ती सांगून आलेली होती. केवळ शास्त्रात पारंगत झाल्याने मन मोठे होत नाही हे दर्शविण्यासाठी लेखकाने तिचा उपयोग करून घेतलेला आहे. तिची मोठी बहीण वारल्यावर तिच्या मेहुण्याने तिला मागणी घातलेली होती. 'पुन्हा हा विषय काढाल तर जीव देईन!' असे उत्तर तिने आई-बापांना दिले होते. कारण सावत्र मुलांना प्रेमाने वाढविण्याची कल्पनाच तिला दुःसह होत होती. द्विजदासाला तिची ही भूमिका समजू शकत नाही. कारण त्याची आई दयामयी हिनेच त्याचा मोठा सावत्र भाऊ विप्रदास याला मोठ्या प्रेमाने वाढविलेले असते. 'चरित्रहीन'मधील सौंदर्यवती विधवा किरणमयी हीही फार विद्वान आहे; परंतु तिचा कोणत्याच मूल्यावर विश्वास नाही. तिच्या पतीने तिला तत्त्वज्ञान व शास्त्रे शिकविली होती; परंतु स्वार्थ व ऐहिक सुख यापलीकडे काहीच महत्त्वाचे नाही व म्हणून काहीच आदरणीय नाही अशी तिची धारणा शास्त्रे वाचून झालेली आहे. अर्थात याला तिची विशिष्ट परिस्थिती कारणीभूत होती. पतीचा ब्रह्मदेशापर्यंत शोध घेऊन त्याने छळ करून लाथाडल्यावर रोहिणीबाबूबरोबर उघडपणे राहाणारी अभया ही एक स्वयंप्रज्ञ बंडखोर स्त्री 'श्रीकांत'मध्ये शरच्चंद्रांनी रंगविली आहे, तर 'शेषप्रश्न'मधील कमल सर्वार्थाने बंडखोर आहे. उद्याची स्त्री कशी निर्भय व सामाजिक जाणीव असलेली होऊ शकेल हे शरच्चंद्रांनी कमल व 'पथेर दाबी'मधील भारतीच्या रूपाने दर्शविले आहे.

विफल प्रीतिभावनेची उत्कट वेदना जशी शरदबाबूंनी रंगविली, तद्वतच सफल होणाऱ्या वा होऊ शकणाऱ्या प्रेमातील प्रसन्नताही रंगविली. 'विप्रदास'मधील वंदना द्विजदास यांचे संबंध व 'दत्ता'मधील विजया आणि नरेन्द्र यांचे संबंध खेळीमेळीचे आहेत. 'परिणीता'मध्ये मुग्ध प्रेमाचे मनोज्ञ चित्रण ललितेच्या रूपाने झालेले आहे. 'दत्ता'च्या सबंध वातावरणातच एक प्रकारची प्रसन्नता आहे. त्यामुळे रासबिहारी व विलास यांच्या विळख्यातून विजया शेवटी बाहेर पडणारच याची आपल्याला खात्री वाटत राहाते व तसेच होते. प्रेमभावनेचे हळुवारपणे केलेले चित्रण हा विषय कुणाही कादंबरीकारास मोह घालील असाच आहे. कारण कमल म्हणते त्याप्रमाणे, स्त्री-पुरुषांचे संबंध व त्या संबंधांचे स्वरूप हे मानवाच्या त्या त्या काळच्या संस्कृतीचे निदर्शक आहे. शरदबाबूंनी ज्या सूक्ष्मतेने व ज्या सातत्याने हा विषय हाताळलेला आहे त्याकडे पाहाता असे म्हणावेसे वाटते की, त्यांचा प्रेमाचा शोध हे त्यांच्या जीवनाचा अर्थ शोधण्याच्या प्रयत्नाचे एक महत्त्वाचे माध्यम आहे.

प्रीतिभावनेच्या व स्त्रीमनाच्या सूक्ष्म चित्रणाइतकेच शरदबाबू त्यांच्या सामाजिक जाणिवेमुळे प्रसिद्ध व लोकप्रिय आहेत. अज्ञान, स्वार्थ, संकुचितपणा, दंभ, अंधश्रद्धा, परंपराप्रियता इत्यादी दोषांनी या वेळच्या समाजजीवनाची अंगे किती ग्रासली होती हे आपल्या सर्वच कादंबऱ्यांत शरदबाबूंनी दर्शविले असले तरी त्यांच्या 'पल्ली समाज' (गावगंगा), 'पंडित मशाय', 'बामुनेर मेये' (ब्राह्मणाची मुलगी), श्रीकांत इत्यादी कादंबऱ्यात हे दर्शन अधिक टोकदार होते. कोणताच मोठा कलावंत प्रचारकी दृष्टिकोणातून लिहू शकत नाही हे जितके खरे तितकेच हेही खरे की कोणताच मोठा कलावंत समोर दिसणाऱ्या जीवनाकडे पाठ फिरवून लिहू शकत नाही. त्यामुळे या सहृदय व देशभक्त कलावंताच्या कलादृष्टीइतकेच सामाजिक जाणिवांना व मूल्यांना महत्त्व प्राप्त होते. बंगाली लोकांची भावनाशीलता, सनातनी जीवनपद्धती, जमीनदारी पद्धत, संयुक्त कुटुंबाची पद्धत, यामुळे तिथल्या समाजाला लागलेले विशिष्ट चाकोरीचे वळण. धर्मसुधारणेसाठी तिथे उदयास आलेला ब्राह्म समाज व त्याचे खरे-खोटे अनुयायी, यांचे दर्शन शरच्चंद्रांच्या अनेक कादंबऱ्यांत घडते. अर्थात ब्राह्मसमाजातील बऱ्याच सुशिक्षितांच्या इंग्रजधार्जिणेपणामुळे व स्वकीयांसंबंधीच्या तिरस्कारवृत्तीमुळे या पंथाची एक वेगळी जात बनली व ब्राह्मसमाजी आणि हिंदू यांत रोटीबेटीव्यवहार अशक्य झाला. ब्राह्मसमाजाची तत्त्वे उदार असली तरी अन्य कोणत्याही समाजाप्रमाणे या समाजाच्या अनुयायांतही उथळ व स्वार्थी व्यक्ती होत्याच. उलट, आचारविचार कर्मठ असूनही, अफाट पसरलेल्या हिंदु समाजजीवनात मानवतावादी मूल्ये प्रकर्षाने दिसून येत होती. 'परिणीता'मध्ये आपत्काली ललितेच्या कुटुंबाला मदत करणारा व नंतर उदार मनाने तिच्यापासून दूर राहाणारा तरुण ब्राह्म आहे. उलट 'दत्ता'मधील विजयेच्या दिवंगत वडिलांचा मित्र रासबिहारी हा ब्राह्मसमाजाची तत्त्वे बडबडणारा एक ढोंगी व स्वार्थी माणूस आहे. 'गृहदाह'मधील अचलतेचे वडील ब्राह्म असले तरी ते एक सामान्य सुखवस्तु गृहस्थ आहेत, तत्त्वचिंतक वृत्तीचे नाहीत. दोन्ही समाजात बऱ्यावाईट व्यक्ती असतात याचे भान शरच्चंद्रांनी कटाक्षाने ठेवले आहे, मात्र कोणत्या समाजाची तत्त्वे अधिक चांगली याची तात्त्विक चर्चा त्यांनी कुठेही केलेली नाही. बहुजनसमाजाचा तिरस्कार करणारे शिष्ट बहुजन समाजाची सुधारणा कधीच करू शकणार नाहीत हे त्यांचे मत मात्र ठिकठिकाणी प्रत्यक्षाप्रत्यक्षरीत्या दिसून येते.

'श्रीकांत'मध्ये श्रीकांत-राजलक्ष्मी यांच्या प्रेमभावनेला जितके

**प्रेमाचा शोध हे जीवनाचा अर्थ शोधण्याच्या प्रयत्नाचे शरच्चंद्रांचे एक महत्त्वाचे माध्यम आहे.**

त्व आहे तितकेच श्रीकांतला समाजाचे जे दर्शन घडत जाते त्याला आहे. राजलक्ष्मीने विकत घेतलेल्या गंगामाही व पोडामाही या खेड्यांच्या निमित्ताने शहरापासून दूर असलेल्या अतिग्रामीण जीवनाचे व तेथील दारिद्र्याचे दर्शन आपल्याला होते. तिथल्या रेल्वेलाइन टाकणाऱ्या मजुरांचे हाल, एका दुर्लक्षित हॉस्पिटलचे वर्णन, किरकोळ कारणासाठी वाळीत टाकल्या गेलेल्या एका ब्राह्मण कुटुंबाची दयनीय स्थिती, वज्रानंदाने चालविलेली समाजसेवा, जातिनिर्बंधामुळे दूर बिहारमध्ये विवाह करून दिलेली एक अल्पवयी बंगाली मुलगी व तिने केलेली आत्महत्या, श्रीकांतच्या स्वतःच्या गावच्या लोकांच्या मनातील स्वार्थ व संकुचितपणा, श्रीकांतला आलेले ब्रह्मदेशातले अनुभव, अशा किती तरी तपशिलातून शरदबाबूंच्या मनातील सामाजिक जाणीव प्रगट होते. साईथिया स्टेशनजवळ रेल्वेलाइन टाकणारे मजूर डबक्यातले पाणी पिऊन कॉलऱ्याने पटापटा मरत होते याची कुणालाच खंत नव्हती, त्यांची त्यांनाही नव्हती. रोजची खडी फोडायची, दिवसाची मजुरी घ्यायची व रात्री ताडी पिऊन पडायचे, हे या मजुरांचे जीवन व प्लेग-कॉलऱ्याच्या साथीत मरून जाणे हा त्या जीवनाचा स्वाभाविक शेवट. 'शेष प्रश्न'मध्ये राजेन्द्रलाही साथीच्या वेळी चांभारवाड्यात हाच अनुभव येतो. म्हणून मृत्यू ही भारताच्या मागासलेल्या व दरिद्री जनतेवर होणारी अक्षरशः कृपाच होय असे उद्गार राजेन्द्रने काढलेले आहेत.

## सामाजिक जाणिवेचा आविष्कार

दलित व पीडितवर्ग हा खालच्या जातीचाच असतो अशीही बाबूंची कल्पना नव्हती. जमीनदार, सावकार व व्यापारी सोडले, तर दारिद्र्य हे त्या वेळी बंगालमधील सर्व जनतेच्याच पाचवीला पूजले होते. शरदबाबूंनी 'श्रीकांत'मध्ये सहजपणे रेखाटलेले हे कनिष्ट-मध्यमवर्गाचे चित्र पाहा : श्रीकांत व राजलक्ष्मी एकदा रेल्वेने प्रवासास निघालेले असताना फलाटावर जी गर्दी दिसते तीत कलकत्त्याच्या विविध ऑफिसात काम करणाऱ्या व रविवारची सुट्टी मुलाबाळात घालविण्यासाठी जवळपासच्या आपल्या गावाकडे निघालेल्या कनिष्ट नोकरवर्गाचा भरणा असतो. गाडी येते व घाईने गाडीकडे धावणाऱ्या एका म्हाताऱ्या कारकुनाची राजलक्ष्मीशी टक्कर होऊन त्याच्या हातातील मातीचे खेळणे खाली पडून ते फुटते. बिचारा ते तुकडे गोळा करू लागतो. एक नमुना म्हणून खाली थोडे दीर्घ अवतरण दिलेले आहे.

> भीतीने व लाजेने गारद झालेला तो म्हातारा एकसारखा पुटपुटत होता, 'गडबडीत पाहिलं नाही मी हो बाई ! माझ्याकडून मोठाच अन्याय झाला!'
>
> लगबगीनं, त्याची सुटका करण्यासाठी मी म्हटलं, 'ज व्हायचं ते होऊन गेलं. आता त्वरा करून मार्गाला लागा-नाही तर गाडी चुकायची. चला!'
>
> तरीही तो म्हातारा खेळण्याचे इतस्ततः पसरलेले तुकडे गोळा करीत राहिला. शेवटी उठून तो एकदाचा गाडीकडे धावू लागला; परंतु त्याला फार वेळ धावण्याची शर्यत चालू ठेवावी लागली नाही. गाडी निघून गेली होती !
>
> नंतर मागे येऊन त्याने पुन्हा एक बार क्षमा मागितली व पुनश्च उरले-सुरले तुकडे जमा करण्याच्या उद्योगास तो लागला. मला त्याचं हसू येऊन मी म्हटलं, आता त्यांचा काय उपयोग ?'
>
> 'काही उपयोग नाही महाशय', तो म्हातारा म्हणाला, 'पण माझी मुलगी की नाही, फार आजारी आहे. गेल्या सोमवारी घरून निघताना तिनं आपल्यासाठी एक मातीचं खेळणं विकत आणायला सांगितलं होतं मला. बाजारात विकत घ्यायला गेलो त्या वेळी माझी गरज लक्षात घेऊन त्या बेट्या दुकानदारानं दर वाढवला. दोन आण्यात एक दिडकी कमी घेणार नाही म्हणून सांगू लागला; पण काय करणार ? मग कसंही करून आठ पैसे ठेवले त्याच्या हातावर मोजून व ते खेळणं विकत घेतलं एकदाचं; पण नशीब कसं सिकंदर ते पाहिलंत ना तुम्ही ? गाडीपर्यंत येऊन त्या बेट्या खेळण्यानं शेवटी असा घात केला! आजारी मुलीच्या हाती देण्याचा योग काही आला नाही. घरी गेल्यावर ती रडून रडून आकांत करील व म्हणेल, 'बाबा, घेतलंच नाही तुम्ही खेळणं माझ्यासाठी !' एवढ्याचसाठी काही नाही तर विकत घेतलेल्या खेळण्याचे तुकडे तिच्यापुढे हजर करीन व सांगेन, 'बाळा, या महिन्याचा पगार हाती आला म्हणजे प्रथम तुझ्यासाठी खेळणं घेईन, मग बाकीचे व्यवहार !'
>
> असं बोलून सर्व तुकडे उपरण्याच्या शेवात काळजीपूर्वक बांधून घेऊन तो म्हणाला, 'आपल्या बायकोला बरंच लागलं असावं — मला पाहाता आलं नाही—नुकसानी परी नुकसान झालं, गाडीही मिळाली नाही. ती आजारी मुलीला अर्धा तास अगोदर पाहाण्याचं भाग्य तरी लाभलं असतं!'

हे झालं कारकुनाच्या दारिद्र्याचं चित्र; पण बंगालचा ग्रामीण समाज तर शरदबाबूंना स्वतःच्या तळहातावरच्या रेषांइतका सुस्पष्टपणे माहीत होता. काही सारवासारव वा आदर्शीकरण न करता त्यांनी 'पल्ली समाज' मध्ये खेड्यातील जनतेचे चित्र उभे केले आहे. आजही त्यात फारसा बदल झालेला नाही. गुंडगिरीचे प्रकार बदलले असतील इतकेच. तरुण व ध्येयवादी जमीनदार रमेश याला आलेला भाऊबंदकीचा व गुंडगिरीचा अनुभव, गावात काही सुधारणा करण्याच्या त्याच्या प्रयत्नात आलेले अडथळे; खेड्यातल्या निष्पाप समजल्या जाणाऱ्या जनतेच्या मनाचा कोतेपणा, लाचारी, स्वार्थ, फसवेगिरी यांचे दर्शन या कादंबरीत होते. मलेरियाच्या साथीत गावची डबकी बुजविण्याची कल्पना रमेश आखतो; पण दुसऱ्याच्या जागेतली डबकी बुजवायची व झुडुपं छाटायची या उपद्व्यापाला कुणीच तयार नसते. ज्यांच्या स्वतःच्या जागेत डबकी व जंगल होते ते म्हणाले की, 'ही काही आपण घडविलेली नाहीत.

वाडवडिलांच्या वेळेपासून ती आहेत. ज्या कुणाला जरूर वाटेल त्याने ही साफसफाई करावी. आपली हरकत नाही; पण त्यासाठी पैसा वा परिश्रम खर्चायची आपली तयारी नाही.' मुसलमानांच्या मुलांसाठी रमेशने वेगळी शाळा काढायला मदत केली तेव्हा त्याचा चुलतभाऊ वेणी घोषाल म्हणाला, 'असली रयत सुशिक्षित झाली तर आमच्या ताब्यात कशी राहील ?'

ग्रामीण जीवन शिक्षणाद्वारे सुधारण्यासाठी बैरागी समाजाच्या वृन्दावनने केलेले प्रयत्न हा 'पंडित मशाय' या कादंबरीचा प्रमुख विषय. महामारीच्या साथीत आपल्या मालकीचा तलाव सर्वांना पाणी पिण्यासाठी स्वच्छ राहावा म्हणून तो कपडे धुणे इत्यादीसाठी तलाव बंद करतो; परंतु त्यामुळे गावातली प्रतिष्ठित मंडळी चिडून जातात. त्याचा मुलगा आजारी पडतो त्या वेळी गावचे डॉक्टर त्याच्या मदतीला येत नाहीत व मुलगा साथीला बळी पडतो!

भारतात समाजवादाचा बोलबाला फारसा झालेला नव्हता त्या काळात शरदबाबूंनी 'देना पावना' या कादंबरीत जुलमी जमीनदाराविरुद्ध रयतेने केलेल्या उठावाचे चित्र रेखाटले आहे. आपल्या गरीब रयतेच्या कल्याणासाठी देवळाच्या भैरवीचे केलेले प्रयत्न, जमीनदार जीवानंदापुढे तिने दाखवलेला बाणेदारपणा, तिच्या निःस्वार्थीपणामुळे जीवानन्दाचे झालेले हृदयपरिवर्तन व या दोघांच्या आळीपाळीने मिळालेल्या प्रोत्साहनामुळे रयतेत झालेली जागृती या कादंबरीत दृष्टीस पडते. गांधीवादी पद्धतीच्या सत्याग्रही वृत्तीचे दर्शनही या कादंबरीत भैरवी व जीवानन्द या व्यक्तिरेखांद्वारे घडते. *अर्थात् एकमेकांवरील नवजात प्रेमामुळे या दोघांमध्ये सर्वस्वाचा* त्याग करण्याची मनोवृत्ती निर्माण होते हे खरे. 'पल्ली समाज' मधील रमेशने जसा एक आदर्श जमीनदार होण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला तसा जीवानंदाने कादंबरीच्या अखेरीस केलेला आहे. रमेशमध्ये सामाजिक जाणीव प्रथमपासून आहे तर जीवानंदामध्ये ती भैरवीच्या त्यागवृत्तीच्या दर्शनाने निर्माण झालेली आहे.

## सनातनवाद ते नवमतवाद

आमच्या परिस्थितीस जसे आमचे अज्ञान व दौर्बल्य कारणीभूत होते तसे परकीयांचे राज्यही या परिस्थितीस कारणीभूत होते याची जाणीव शरत्-साहित्यात वारंवार दिसते. कोणत्याही मार्गाने देशासाठी स्वातंत्र्य मिळविले पाहिजे या भावनेने झपाटलेला एक अद्वितीय क्रांतिकारक डॉक्टर सव्यसाचीच्या रूपाने शरदबाबूंनी 'पथेर दाबी' या कादंबरीत निर्माण केलेला आहे. त्याच्या देशभक्तीतील धैर्यास व स्वार्थत्यागास सीमा नाही! त्याच्या किडकिडीत देहयष्टीत असामान्य सामर्थ्य आहे. त्याचे मन कठोरतेने तर हृदय कारुण्याने भरलेले आहे. इंग्रजांच्या राज्यामुळे आपल्या देशाची झालेली अवनती पाहून त्याचे मन कळवळते. डॉक्टर एकदा भारतीला म्हणतात, 'हिंदुस्थानात दर साल लाखो माणसे मलेरियासारख्या रोगाने औषधपाण्याविना मरतात. ब्रिटिशांच्या एका जहाजाच्या किमतीत या मरणाऱ्या लाखो डोळ्यांतील अश्रू पुसता येतील. काय उरले आहे या देशात ? या मातृभूमीची मूर्ती तू कधी निरखून पाहिली आहेस ? शिल्प गेले, व्यापार संपला; धर्म गेला, ज्ञान विराम पावले. वाहाणाऱ्या नद्यांचे पाणी आटून वाळवंटे निर्माण झाली. किसानांना पोटभर खायला मिळत नाही. शिल्पकार परदेशात जाऊन मोलमजुरी करू लागले आहेत. या देशात अन्न नाही, पाणी नाही. गृहस्थाघरची सर्वोत्तम शोभा शोधन ही होती, पण आज तान्ह्या पोरास देखील दूध मिळणे कठीण होऊन बसले आहे!'

भारताला स्वातंत्र्य मिळण्याच्या दृष्टीने अनेक जण अनेक मार्ग सुचवीत होते. 'पथेर दाबी'ची नायिका भारती हिने रक्तपाती क्रांतीचा मार्ग सोडून डॉक्टरांनी शांततेच्या मार्गाचा अवलंब करावा असे त्यांना वारंवार आवाहन केलेले आहे. डॉक्टरांना ते पटत नाही; पण अमुकच मार्ग स्वीकारा अशी त्यांची कुणावर सक्ती नाही. ज्याला जे पटत नाही ते त्याने करू नये असेच त्यांनी सांगितलेले आहे. त्यांची दृष्टी विशाल व करुणापूर्ण आहे. त्यांची दृष्टी केवळ क्रांतीकडे नाही, क्रांतीनंतरचा प्रगत व सुखी भारत त्यांच्या मनःचक्षूपुढे त्यांना दिसतो आहे. भारतीला ते म्हणतात, 'स्वातंत्र्यप्राप्ती म्हणजेच काही शेवट नव्हे. धर्म, शांतता, काव्य, आनंद या गोष्टीही आपापल्या परीने श्रेष्ठ आहेत. त्यांनाही महत्त्वाचं स्थान आहे. त्यांच्या आत्यंतिक विकासासाठी आपल्याला स्वातंत्र्याची आवश्यकता आहे. नाहीपेक्षा त्याला कसलं आलं आहे महत्त्व ?' भारताचा निरोप घेताना ते शशिपद या कवीला म्हणतात, 'तू कवी आहेस, देशातील तू एक महान कलावंत आहेस, राजनीतीपेक्षा तू श्रेष्ठ आहेस, हे *कधी विसरू नकोस... कधी तरी एक दिवस या स्वातंत्र्य*-पारतंत्र्याच्या झगड्याचा निकाल लागून जाईलच. सध्याच्या काळात आम्हाला जे दुःख-दैन्य भोगावं लागलं त्याची कहाणी म्हणजे पुढील पिढ्यांना सांगण्यासारखी एक ऐतिहासिक घटना, यापलीकडे तिला महत्त्व राहाणार नाही; पण तुमच्यासारख्यांच्या कार्याचं कुणालाच मोल ठरवता येणार नाही.'

माणसाची दुःखे कोणत्या बाह्य व आंतरिक दौर्बल्यातून निर्माण होतात याची जशी शरदबाबूंना जाणीव होती, तद्वतच सुधारणा व्हायची ती व्यक्ती व समाज या दोहोंमध्ये एकाच वेळी झाली पाहिजे याचीही त्यांना जाणीव होती. म्हणून 'पल्ली समाज' मध्ये रमेशच्या परिवर्तनाबरोबरच गावच्या लोकांच्या रमेशबद्दलच्या मनपरिवर्तनाचेही चित्रण त्यांनी केले आहे. 'देना पावना' मध्ये विविध कारणांमुळे जीवानन्दाचे हृदयपरिवर्तन होते, तसेच रयतेचेही मतपरिवर्तन एकदा त्याच्याविरुद्ध व एकदा त्याच्या बाजूने झालेले आहे. दुसरे असे की समाजकार्य, देशकार्य करणाऱ्या अनेक व्यक्ती शरतचंद्राच्या विश्वात आपल्याला आढळत असल्या, तरी समाजकार्य व देशकार्य करताना ईश्वरावर, धर्मकल्पनेवर, नीतिमूल्यांवर विश्वास ठेवला नाही, तर जनतेचा विश्वास संपादन करता येणार नाही असा त्यांचा दृष्टिकोण आहे. तसा उपदेश विश्वेश्वरीने रमेशला व वृंदावनने आपल्या मित्राला केलेला आहे.

*गांधीजींच्या विचारसरणीशी समांतर अशी आणखी एक विचार-*

**व्यक्ती व समाज या दोहोंमध्ये एकाच वेळी सुधारणा झाली पाहिजे याची त्यांना जाणीव होती.**

सरणी वृंदावनच्या शब्दातून जाणवते. लोक काय करतात हे पाहण्याआधी आपण काय करतो, कसे वागतो, आपण आपले कर्तव्य करतो की नाही हे प्रत्येकाने पाहिले पाहिजे, अशी त्याची धारणा आहे. देशातल्या सर्व लोकांना शिक्षण देणे हे सरकारचे कर्तव्य आहे, या केशवच्या मुद्द्याला उत्तर देताना वृंदावन म्हणतो, 'देशभर पसरलेल्या या मूर्खपणाचं प्रायश्चित्त आधी आपण स्वत:वर करू भैय्या. सरकार आपलं कर्तव्य करतं की नाही ते मग पुढं पाहू. स्वत:चं कर्तव्य पार पाडण्यापूर्वी दुसऱ्याच्या कर्तव्याची चर्चा करणं माझ्या दृष्टीनं पाप आहे' शरदबाबूंनी ब्रह्मदेशच्या वास्तव्यात चौफेर वाचन केलेले होते. त्यांच्या कथालेखनास अनुभव व निरीक्षणाबरोबरच योग्य त्या प्रकारच्या चिंतनाची अप्रत्यक्ष पार्श्वभूमी होती. आयुष्याच्या शेवटच्या कालखंडात त्यांचा भर विज्ञानाच्या वाचनावर होता. त्यामुळे सनातनवाद, सुधारणावाद, साम्यवाद, नवमतवाद अशा अनेक अंगांनी त्यांनी समाजधारणेचा विचार केलेला होता असे दिसून येते. अर्थात ते एक कलावंत असल्यामुळे विशिष्ट वादाच्या वा तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोणातून त्यांनी आपली मते कधी मांडली नाहीत. ब्रह्मदेशात असताना 'नारीचे मूल्य' या नावाचा एक मोठा प्रबंध त्यांनी तयार केलेला होता, तो दुर्दैवाने एका अपघातात आगीच्या भक्ष्यस्थानी पडला. नंतर भारतात आल्यावर त्यांनी या विषयावर एक निबंध लिहिला तो सर्वांना आवडला. बंगाली नाटककार द्विजेंद्रनाथ रॉय यांनी असे म्हटले आहे की, बंगली भाषेत एवढा तत्त्व-विवेचक, मूलगामी विचार करणारा लेख यापूर्वी कुणी लिहिलेला नव्हता, शरदबाबूंना अध्ययनाची व तत्त्वचिंतनाची इतकी आवड होती, त्यांचे वाचन इतके विस्तृत होते की, अशा प्रकारे चौदा मूल्यांवर निबंध लिहिण्याचा त्यांचा विचार होता. प्रेमाचे मूल्य, धर्माचे मूल्य, समाजाचे मूल्य, आत्म्याचे मूल्य, सांख्याचे मूल्य, वेदान्ताचे मूल्य, ईश्वराचे मूल्य इत्यादी निबंध लिहिण्याची त्यांची मनीषा होती. समाजधर्माचे मूल्य हा निबंध तयारही झालेला होता.

'प्रचारकी कलेचा उत्कृष्ट नमुना' असे मामा वरेरकरांनी शरद-साहित्याचे वर्णन केलेले आहे. शरदबाबूंच्या तीव्र सामाजिक जाणिवांमुळे व कलादृष्टीमुळे हे वर्णन बरोबर आहे असे म्हणता येईल; परंतु शरदबाबूंनी स्वत: एका भाषणात असे सांगितले होते की, ते मुख्यत: एक कलावंत होते. त्यांची सामाजिक जाणीव तीव्र परंतु तितकीच प्रगल्भ असल्यामुळे तीत कोणत्याही प्रकारचा ठोकळेबाजपणा किंवा ढोबळपणा नव्हता. ग्रामीण बंगाली समाजाचे सूक्ष्म निरीक्षण व चिंतन यावर व विस्तृत वाचनाने व चिंतनाने निर्माण झालेल्या उदार दृष्टिकोणावर त्यांची सामाजिक जाणीव अधिष्ठित होती. खेड्यातले जीवन चांगले, शहरातले वाईट असा ढोबळ दृष्टिकोण त्यांनी कधी मांडलेला दिसत नाही. भारतीय परंपरेचा खरा अर्थच सामान्य माणसाला आकलन न झाल्याने ज्या अंध परंपरा निर्माण झाल्या त्यांच्याविरुद्ध त्यांनी उत्कटतेने लिहिले; परंतु भारतीय परंपरेत जे चांगले होते त्यावर त्यांचे प्रेम असल्याचे स्पष्ट दिसते. हे प्रेम बरेचसे देशप्रेमाच्या व समाजप्रेमाच्या भावनेतून स्फुरते. त्यांची भूमिका बरीचशी 'शेषप्रश्न' मधील आशुबाबूंच्या भूमिकेसारखी आहे. ज्या परंपराप्रिय समाजाची ही मूल्ये होती तो


"लीना मोहाडीकर या डॉक्टरच्या आत एक समाजसेविका दडली आहे आणि तिनेच डॉ. मोहाडीकरांना या विषयाला हात घालण्यास भाग पाडलेलं आहे."  –वसुंधरा पटवर्धन

सेक्सविषयक गैरसमज दूर करणारे आणि निरोगी जीवनदृष्टी निर्माण करणारे उपयुक्त पुस्तक..

**कामरंग** डॉ. लीना मोहाडीकर

**कथारूप सेक्स एज्युकेशन**

पृष्ठे : २०६ । मूल्य : फक्त २० रुपये

केवळ २० रु. मनीऑर्डरने अथवा डिमांड ड्राफ्टने पुढील पत्त्यावर पाठवा आणि घरपोच पुस्तक मिळवा.

**ग्रंथाली**

३४।९०२, नेहरूनगर, कुर्ला (पूर्व) मुंबई ४०० ०२४

समाज त्यांचा म्हणून त्यांना प्रिय होता. म्हणून शरदबाबू केवळ नवमतवादाचे प्रचारक झाले नाहीत तर माणुसकी, बंधुभाव, त्याग सहिष्णुता, परोपकार, वात्सल्य अशा शाश्वत मूल्याचे उद्गाते बनले. विशिष्ट सामाजिक दोषासाठी अमुक सामाजिक सुधारणा आवश्यक आहे असे सांगण्यापेक्षा श्रेष्ठ कलावंताने अंतिम व शाश्वत मूल्यांना आवाहन करणेच श्रेयस्कर. समाजरचना बदलत जाते; परंतु अंतिम व मानवी मूल्ये बदलत नाहीत. अशा मूल्यांना आवाहन करणारा लेखक केवळ एक प्रचारक न बनता कलात्मक अलिप्तता साधू शकतो. सामाजिक जाणिवेमुळे शरदबाबू एक थोर कलावंत बनले खरे; परंतु नवमतवादी दृष्टिकोणाचे स्वागत करताना त्यांनी तारतम्य वापरले व वास्तवाशी संबंध राखला यामुळेही ते एक थोर कलावंत ठरतात.

## सहिष्णुतावादी दृष्टिकोण

जमीदारी पद्धतीच्या समाजरचनेचे, एकत्रकुटुंबपद्धतीचे, मध्ययुगीन धाटणीच्या जीवनाचे चित्रण शरदबाबूंनी केले म्हणू ते 'जुनाट व मध्ययुगीन' आहेत असा आरोप काही साम्यवादी टीकाकारांकडून केला गेला आहे. त्याला उत्तर एवढेच आहे की, त्यांना जे जीवन बंगालमध्ये व इतरत्र प्रत्यक्षात दिसले ते त्यांनी रंगविले. भारतात औद्योगीकरण झालेले नव्हते. यंत्रयुग लवकर यावे व आपल्याला लाल बावटयाचे निशाण लवकर फडकवता यावे अशी घाई अर्थात शरदबाबूंना झालेली दिसत नाही. तरीही 'पथेर दावी'मध्ये गिरणीमजुरांच्या हालाखीच्या जीवनाचे चित्रण आहे. रयतेने जमीनदाराविरुद्ध केलेल्या उठावाचे चित्रण 'देना पावना' मध्ये आहे. 'पल्ली समाज'मध्ये दुष्ट व उचापत्या जमीनदार वेणी घोषाल याजकडून सत्प्रवृत्त जमीनदार रमेश याला अतोनात त्रास झाल्यावर एक दिवस एका सत्प्रवृत्त रयतेकडून वेणी घोषालवर हल्ला होतो; पण वर्गविग्रहाचे तत्त्वज्ञान शरदबाबूंना त्या काळच्या भारतीय वास्तवात दिसले नाही त्यामुळे त्याचे आधुनिक प्रकारचे चित्रण त्यांच्या कादंबऱ्यांत नाही. एकत्रकुटुंब ही त्या वेळी सामान्य रीत होती. अशा कुटुंबातील व्यक्तींच्या एकमेकांविषयीच्या संबंधाचे, भावनांचे व त्यातून उद्भवणाऱ्या समस्यांचे वास्तव चित्रण त्यांच्या अनेक कथांत आढळते. भाऊबंदकीची क्षुद्र कारणे, संकुचित मनाच्या स्त्रियांमुळे वाढत जाणाऱ्या कलागती, अशा बायकांच्या आहारी जाऊन पतिराजांनी घेतलेले चुकीचे निर्णय व त्यामुळे वाढत जाणारे संघर्ष, यांचे मनोज्ञ चित्रण शरद्साहित्यात आढळते. पुतण्याबद्दल गंगामणीला वाटणाऱ्या अनावर वात्सल्यामुळे 'मामलार फल' या कथेतील समस्या सुटते. 'निष्कृती' मध्ये तीन भावांपैकी मधल्या भावास व त्याच्या बायकोस धाकटया चुलत भावाच्या कुटुंबाची, तो कर्तबगार असल्याने अडचण वाटू लागते; परंतु त्याची पत्नी हुशार असते व तिनेच संसाराची सर्व जबाबदारी आतापर्यंत सांभाळलेली असते. सर्वांत मोठ्या भावाच्या सरळ, ममत्वपूर्ण व उदार दृष्टिकोणामुळे 'निष्कृती' मधील समस्या सुटते. मोठ्या भावाने धाकटया जावेकडे सून म्हणून पाहावे, सुनेने धाकटया दिराकडे अपत्य किंवा धाकटा भाऊ म्हणून पाहावे, अशी बंगालमध्ये प्रथा होती. या नात्यातील माधुर्याचेही चित्रण शरदसाहित्यात पदोपदी आढळते.

सुसंस्कृत समाजातील विधवा पुनर्विवाह करताना शरदबाबूंना आढळल्या नाहीत त्यामुळे त्यांनी विधवाविवाहाचे चित्रण केले नाही; परंतु त्यांच्या कुचंबणेचे उत्कट सहृदयतेने चित्रण करून विधवा विवाहाचा अप्रत्यक्षरीत्या प्रचार केला. बालविधवांच्या समग्र जीवनाची वाताहत झालेली त्यांना प्रत्यक्षात दिसली. जातिनिर्बंधामुळे विजोड जोडपी निर्माण झालेली दिसली. 'ब्राह्मणाची मुलगी' या कथेतल्यासारखी हास्यास्पद परिस्थितीही क्वचित निर्माण झालेली दिसली. इतकेच नव्हे तर अशिक्षित व आडमुठ्या स्त्रियांमुळे पुरुषांचीही कुचंबणा झालेली त्यांना दिसली. या गोष्टी त्यांनी रंगविल्या. उलट भारतीय स्त्रिया म्हणजे अंतःपुरात कोंडलेल्या दासी हे चित्र त्या वेळीही पूर्णतया खरे नव्हते म्हणून विप्रदासने विचारले आहे, 'घरच्या चाकरनोकरांच्यासुद्धा सेवेला वाहिलेली अन्नपूर्णेची ही राजेश्वरी मूर्ती परक्यांना दिसत नसली तरी तुम्हा लोकांना कशी दिसत नाही?' स्त्रियांकडे भारतातले पुरुष दासी म्हणून पाहात होते या गैरसमजाचे खंडन 'दर्पचूर्ण' या कथेतही अप्रत्यक्षरीत्या होऊन गेलेले आहे. आधुनिक, गर्विष्ठ अशा एका मैत्रिणीचे गर्वहरण एका नम्र गृहिणीकडून या कथेत होते कारण ती खरोखरच एक गृहस्वामिनी आहे. स्त्रीला दोन किंवा अधिक पुरुषांबद्दल आकर्षण वाटू शकेल हे शरदबाबूंना माहीत होते. त्यामुळे ते अचला किंवा सविता यांचे चित्रण करू शकले; परंतु ममता, सतीत्व, सेवाभाव हे भारतीय स्त्रियांच्या मनोवृत्तीचे स्थायी भाव आहेत असे त्यांना प्रत्यक्ष अनुभवावरून जाणवले म्हणून त्यांच्या बहुतेक स्त्रियांत हे भाव दिसतात. कल्पनाशक्तीला थोडासा ताण देऊन आपण विधवाविवाह व त्यातून उद्भवणाऱ्या समस्या रंगवू, 'सफ्रेजिस्ट' स्त्रिया रंगवू, म्हणजे पुढील पिढ्या आपल्याला पुरोगामी, क्रांतिवादी इत्यादी समजतील, असा विचार त्यांच्या मनात आल्याचे दिसत नाही. पुरुषांप्रमाणे आम्हालाही थोडे व्यक्तिगत स्वातंत्र्य असावे असे म्हणणारी स्त्री त्यांच्या किंवा टागोरांच्या कल्पनेत वसत होती. परंतु पुरुषाला अनैतिकपणे व बेछूटपणे वागण्याचे स्वातंत्र्य आहे तसे आम्हालाही असावे असे म्हणणारी स्त्री शरच्चंद्रांच्या किंवा टागोरांच्याही कल्पनेत वसत नव्हती. स्त्री व पुरुष एकमेकांना पूरक आहेत, त्यांची कार्ये थोडी वेगळ्या प्रकारची आहेत, असा या दोघांचाही दृष्टिकोन असतो, तो वास्तवाला धरून होता व कलात्मकही होता.

बंकिमचंद्रांच्या नीतिकल्पनेत एक प्रकारचा ढोबळपणा होता, म्हणूनच 'कृष्णकांताचे मृत्युपत्र' या कथेतील रोहिणीला ते क्षमा करू शकले नाहीत. तो विधवा असून तिने प्रेम केले. त्यामुळे बंकिमचंद्रांच्या दृष्टीने तिचा मृत्यू अटळ झाला. बंकिमचंद्र स्वतः सनातनी मताचे होते. शरदबाबू सुधारणावादी होते. त्यांच्या 'देना पावना'

**शरदबाबू नवमतवादाचे प्रचारक झाले नाहीत तर माणुसकी, सहिष्णुता या शाश्वत मूल्यांचे उद्गाते बनले!**

मधील बोडशीने देवळाच्या भैरवीचे सन्यस्त व्रत सोडून पुन्हा संसारात पडण्याचा निर्णय घेतलेला आहे. तिचे जीवानन्दावरचे प्रेम, त्याच्या हृदयात निर्माण झालेल्या त्यागवृत्तीचा आनंद, रयतेविषयी वाटणारी जबाबदारी अशा अनेक कारणांमुळे तिने हा निर्णय घेतलेला आहे. अभयेने रोहिणीबाबूबरोबर पत्नी म्हणून राहाण्याचा निर्णय घेतलेला आहे. टागोर आणि शरच्चंद्र यांच्यामध्ये बंकिमचंद्रात नसलेली कलात्मक अलिप्तता आहे. अशा अलिप्ततेसाठी शरच्चंद्रांनी परंपरा व बंडखोरी यांचा समतोल साधलेला आहे. टागोरांना मात्र सौंदर्य-जाणिवेखेरीज अन्य काही आवश्यकता कलात्मक अलिप्ततेसाठी भासली नसावी.

जीवन ज्या पद्धतीने प्रत्यक्षात जगले जाते त्या पद्धतीची जाणीव शरदबाबू टागोरांपेक्षा अधिक ठेवताना दिसतात. 'घरे बाइरे' व 'गृहदाह' यांची तुलना केल्यास हे स्पष्ट व्हावे. खेड्यातील जनता व शहरातील कनिष्ठ मध्यमवर्ग यांच्याशी शरदबाबूंचा परिचय टागोरांपेक्षा अधिक घनिष्ठ प्रकारचा आहे. गारुडी, कोळी, बैरागी, मिस्त्री, अशा प्रकारची पात्रे शरदविश्वात अधिक सहजपणे वावरतात. ते सुधारणावादी असल्याने टागोरांपेक्षा अधिक जहाल आहेत असा समज त्या वेळी सर्वत्र पसरलेला होता. सामाजिक जुलूमजबरदस्तीचा व दबावांचा वास्तव तपशील शरत्साहित्यात फार मोठ्या प्रमाणावर येतो. जमीनदाराच्या गुमास्त्याने रयतेच्या हिशेबात मुद्दाम केलेली गल्लत, गरिबांवर दबाव आणण्याच्या पद्धती, धर्माच्या व जातीपातीच्या भावनांना केले गेलेले आवाहन, भाऊबंदकी, अंधश्रद्धांचा तपशील, दरिद्री राहाणीचा तपशील या गोष्टी शरदबाबूंच्या अगदी हाताशी असतात. हृदयांतर्गत संघर्ष व ज्यांना सामाजिक म्हणता येईल अशा प्रकारचे संघर्ष शरदबाबू समर्थपणे चित्रित करतात; पण या सर्व प्रकारच्या संघर्षाला सामाजिक प्रक्रियेचे भान असते व या संघर्षाच्या सामाजिक प्रतिक्रियांचे भानही शरदबाबू अधिक प्रमाणात ठेवताना दिसतात; पण समाजाने निर्माण केलेल्या दुःखाच्या चित्रणातही, वेदनेमुळे व्यक्तीच्या मनातील मूल्यांना मिळालेल्या उजळ्याचे व त्यामुळे निर्माण झालेल्या उदात्ततेचे चित्रण करण्याकडे त्यांच्या रोमँटिक मनाचा ओढा अधिक दिसतो.

सामाजिक रुढींच्या निर्घृणतेवर प्रहार करणे हे शरदबाबूंचे ध्येय होते व या अर्थाने ते 'प्रचारक' होते. कलात्मक आविष्कारासाठी त्यांनी जो तपशील वापरला तो संपूर्णपणे वास्तव होता म्हणून ते वास्तववादी होते; परंतु वृत्तीने ते रोमँटिक व आदर्शवादी होते. त्यामुळे राजलक्ष्मी किंवा सावित्रीसारख्या स्त्रियांनी संयमाने व स्वार्थत्यागाने आपल्या प्रेमभावनेचे उदात्तीकरण करण्याचे जे प्रयत्न केले आहेत ते शरदबाबूंना गौरवास्पद वाटतात. या स्त्रियांच्या वेदनेत एक प्रकारचे सौंदर्य आहे. कारण इब्सेन किंवा बर्नार्ड शॉ यांच्या जातीचे प्रचारक शरदबाबू नाहीत. त्यामुळे त्यांची पात्रे विशिष्ट मतांची प्रतीके बनत नाहीत. राजलक्ष्मी, सावित्री, अभया, सुनंदा या व्यक्ती म्हणून वाचकाचे मन गुंतवून ठेवतात व नंतर कायम स्मरणात रहातात त्याही व्यक्ती म्हणूनच. 'पथेर दावी' व 'शेष प्रश्न' यामध्ये बर्नार्ड शॉमध्ये ज्या प्रकारची चर्चा असते तशा चर्चेला महत्त्व आहे; पण तिथेही डॉक्टरबाबू, भारती कमल, बाशुबाबू या व्यक्ती म्हणूनच लक्षात राहातात. शरदबाबूंची मनोवृत्ती रोमँटिक आहे व प्रत्येक व्यक्तीकडे ते एक गूढ म्हणून पाहातात. 'पथेर दावी'मध्ये डॉक्टरांना विविध देशात आलेले अनुभव व त्यांनी केलेली धाडसे यांच्या उल्लेखामुळे आपोआपच एक रोमँटिक वातावरण निर्माण होते. पार्वती, रमा, राजलक्ष्मी या नायिकांचे संबंध नायकांशी लहानपणीच आलेले आहेत. भूतकाळातल्या त्या प्रेमाच्या आठवणी या नायिकांच्या मनात ताज्या असल्यामुळे त्यांच्या प्रेमभावनेला एक रोमँटिक ताज आहे. काही ठिकाणी प्रेमभावनेला साथ देणारे निसर्गवर्णन शरदबाबूंनी थोडक्यात प्रतीकात्म पद्धतीने वापरल्यामुळेही रोमँटिक वातावरण तयार होते. सामाजिक प्रश्नामुळे निर्माण झालेल्या दुःखामुळे शरदबाबूंचे हृदय हेलावते. समाजाच्या विस्तीर्ण चौकटीतून पूर्वी सूक्ष्मपणे निरीक्षिलेला तपशील वापरला जातो व एखादी कथा वा कादंबरी तयार होते. तिचा केन्द्रबिंदू स्त्रीमनाचे गूढ व अनाकलनीय रहस्य हाच पुष्कळदा असतो.

इलाचंद्र जोशी यांच्याबरोबर गप्पा करताना शरच्चंद्र एकदा म्हणाले होते की, कोणत्याही मनाचे रहस्य उलगडून घेण्यासाठी प्रेम हेच एक साधन आहे. म्हणूनच शरदबाबूंनी निर्माण केलेल्या व्यक्तींवर त्यांचे प्रेम आहे असे जाणवते. ते जेव्हा एखादी भूमिका घेतात तेव्हा विरुद्ध बाजूच्या भूमिकेचासुद्धा त्यांनी विचार केलेला आहे, असेही जाणवत राहाते. जीवनाबद्दल तुच्छतोबुद्धी वा उदासीनता स्वीकारल्यास काहीच हाती लागत नाही; जीवनाचा सहिष्णुवृत्तीने स्वीकार करावा, समाजजीवनातील वा व्यक्तिजीवनातील दुःखद वा वाईट गोष्टी बदलण्याचा प्रयत्न करीत राहावे व मधल्या काळात एकमेकांना जितकी मदत करता येईल तितकी करीत राहावे. एकमेकांना जितके प्रेम देता येईल तितके द्यावे. आपण जी मूल्ये म्हणून स्वीकारलेली असतात त्यासाठी स्वार्थत्यागास तयार असावे असे शरत्साहित्याचे साध्या व सरळ माणुसकीचे तत्त्वज्ञान आहे. शरद्‌बाबू समाजसुधारक तर होतेच, पण त्याहीपेक्षा अधिक ते समाजप्रेमी होते. वाचकांनीही त्यांच्या प्रेमाची उत्कटतेने फेड केली. महिना–दोन महिन्यात एखाद्या कादंबरीच्या चार-पाच हजार प्रती खपून जाण्याचे किंवा लेखकाच्या हयातीतच कादंबरीच्या वीस–बावीस आवृत्त्या निघण्याचे भाग्य किती भारतीय लेखकांच्या वाट्याला आले असेल? शरद्‌बाबू बंगालचेच नव्हे तर भारताचे एक थोर लेखक आहेत. आजपर्यंत त्यांच्या बावीसपेक्षा अधिक कादंबऱ्यांची व अठरापेक्षा अधिक कथांची सर्व महत्त्वाच्या भारतीय भाषांत व काहींची इंग्रजीत भाषांतरे झालेली आहेत. त्यांची माहिती परिशिष्टात दिलेली आहे. असे म्हणतात की त्यांच्या 'श्रीकांत'चे पहिले दोन भाग भाषांतरित स्वरूपात रोमाँरोला यांच्या वाचनात आले तेव्हा शरद्‌बाबू हे जगातल्या थोर कलावंतांपैकी एक आहेत, असे त्यांनी बोलून दाखविले होते.

ज्यांच्या कलादृष्टीमुळे व जीवनमूल्यांमुळे मानवाच्या संस्कृतीत भर पडलेली आहे अशा लेखकांपैकी शरच्चंद्र चतर्जी हे एक आहेत, परंतु त्यांच्या साहित्याचे सूक्ष्म व तपशीलवार परीक्षण करून केलेली फार थोडी टीका आज उपलब्ध आहे. साहित्यअकादमीनेही म्हटले आहे, 'Unfortunately very little is known about the life of this great novelist and not many critical app-

reciations of his works have yet come out.'

शरद्बाबू आपल्या पूर्वायुष्याबद्दल कधी बोलत नसत. तथापि त्यांचे पूर्वायुष्य बंगाल व ब्रह्मदेश इथे भटकंती करण्यात गेलेले होते हे सर्वश्रुत होते. त्यांच्या कथाविश्वातील पात्रे त्यांना प्रत्यक्ष जीवनात भेटलेल्या व्यक्तीच होत्या व त्यांच्यात फार थोडा बदल करून शरद्बाबूंनी त्यांचा समावेश आपल्या कथाविश्वात केलेला होता असाही अंदाज शरद्बाबूंच्या काही उद्गारांवरून त्यांच्या मित्रमंडळींनी बांधलेला होता. तरुणपणी खूप भटकंती केलेला, संवेदनाक्षम मनाचा, कधीकधी व्यवसनाधीन झालेला, अनेक स्त्रियांशी परिचय झालेला एक लेखक अशी त्यांची प्रतिमा जनमानसात होती. त्यामुळे त्यांच्या रम्याद्भुत चरित्राविषयीच पुष्कळांना आकर्षण होते व त्यांच्या चारित्र्यासंबंधी माहिती मिळवून त्यांचे चरित्र किंवा 'व्यक्ति व कला' या स्वरूपाची पुस्तके लिहिली गेली. अलीकडचे 'आवारा मसीहा' हेही अभ्यासपूर्वक लिहिलेले चरित्र आहे; त्यात त्यांच्या साहित्यावर भाष्य नाही. 'व्यक्ती व वाङ्मय' या स्वरूपाच्या पुस्तकात साहित्यचर्चा सर्वसाधारण व ढोबळ स्वरूपाची असणे अपरिहार्य असते.

त्यांचे चरित्र आता बहुतेक वाचकांना माहीत असल्याने त्याबद्दल न लिहिता केवळ त्यांच्या साहित्यावर लिहावे असा जो निर्णय घेतला व त्यांची पद्धती व जीवनमूल्ये यांकडे सूक्ष्मतेने पाहायचे तर काही कादंबऱ्यांवर तरी स्वतंत्र प्रकरणे लिहिणे भाग आहे असे माझ्या लक्षात आले. पुढील सहा प्रकरणात मी सहा कादंबऱ्यांवर भाष्य केले आहे. एखाद्या कादंबरीवर मांडण्यासारखे सर्वच्या सर्व मुद्दे त्या कादंबरीवरच्या प्रकरणात सापडतीलच असे नाही; त्यात पुनरावृत्ती पुष्कळच झाली असती. काही प्रकरणात मी काही मुद्द्यांवर भर दिलेला आहे तर अन्य प्रकरणात अन्य मुद्द्यांवर भर दिलेला आहे. या सहा प्रकरणात न आलेल्या मुद्द्यांवर भर देण्यासाठी व शरद्चंद्रांच्या एकूण कथाविश्वाची कल्पना देण्यासाठी हे प्रास्ताविक प्रकरण लिहून त्यात सर्वसाधारण चर्चा सोदाहरण केलेली आहे.

या सहा कादंबऱ्या निवडण्यातही काही हेतू आहेत. विधवा व 'पतित' स्त्रियांच्या भावनांची कुचंबणा हा शरद्साहित्यातील एक प्रभावी विषय व तो सावित्रीच्या रूपाने शरद्बाबूंनी 'चरित्रहीन' या सुरुवातीच्या कादंबरीत प्रभावीपणे मांडला, परंतु त्याचे अधिक सूक्ष्म व संमिश्र स्वरूप 'श्रीकांत'मधील राजलक्ष्मीत दिसते व त्यासाठी शरद्बाबूंनी 'श्रीकांत'मध्ये वेगळ्या प्रकारचा नायक निवडला आहे. किरणमयीच्या निमित्ताने एक नैतिक दृष्टिकोन जरा ठोकळेबाजपणे शरद्बाबूंनी 'चरित्रहीन'मध्ये मांडला होता. पुढील साहित्यात हा ठोकळेबाजपणा कमी होऊन या प्रश्नाची संमिश्रता वाढत गेलेली आहे. ज्याप्रमाणे 'श्रीकांत'मधील राजलक्ष्मीत सावित्रीच्या समस्येला अधिक सखोलता व गूढरम्यता प्राप्त होते, त्याप्रमाणे किरणमयीची समस्या अचल व सविता या व्यक्तीमत्त्वात अधिक सखोल व गूढ बनते. 'श्रीकांत'मध्ये शरद्बाबूंची सामाजिक जाणीवही उठून दिसते. तथापी ती त्यांच्या अन्य साहित्यातही दिसत असल्याने तिचा विचार मी या प्रास्ताविक प्रकरणात केलेला आहे. शिवाय एखाद्या कादंबरीवरील प्रकरण किती वाढू द्यावे यालाही मर्यादा असतेच. प्रेमभावनेची चर्चा अन्य सामाजिक व नैतिक मूल्यांच्या पार्श्वभूमीवर 'विप्रदास'मध्येही आलेली आहे व प्रेमभावनेचे महत्त्व मान्य करूनही विप्रदासने समाजधारणेसाठी व धर्मकल्पनेसाठी प्रेमभावनेचे उदात्तीकरण होणे आवश्यक आहे असे सुचविलेले आहे; परंतु व्यक्तीच्या कुचंबणेचा शेवट होण्यासाठी अधिक बुद्धिप्रामाण्यवादी मूल्यांचा आश्रय घेऊन परंपरावादी समाजाची चौकटच बदलली पाहिजे असे कमलने 'शेषप्रश्न'मध्ये सुचविलेले असल्याने त्या कादंबरीचा विचार अपरिहार्यच होता. व्यक्तीचे स्वातंत्र्य, व्यक्तिवाद यामुळे काही समस्या सुटू शकतात; पण एकूण समाजावर त्याचा काय परिणाम होतो हे पाहिले पाहिजे असा सूर शरद्साहित्यात दिसतो; परंतु स्त्रियांच्या व दुर्बळांच्या कुचंबणेचे चित्र जे अवतीभवती दिसत होते त्यामुळेही शरच्चंद्रांच्या हृदयात वेदना निर्माण होत होती. या दोहोंचा मेळ साधण्याच्या प्रयत्नात त्यांना मानवी हृदयाचे जे सौंदर्य दिसून आले, मानवी हृदयातली जी उदात्तता दिसून आली, तिनेही ते मोहित झाले. त्यांच्या साहित्यांतील ही महत्त्वाची सूत्रे पुढील सहा कादंबऱ्यांत व्यवस्थितपणे विशद होतात म्हणून मी या सहा कादंबऱ्यांची निवड केली.

त्यांच्या अन्य कादंबऱ्यांवरही या प्रकारे लिहिता आले असते. 'पथेर दाबी', 'दत्ता', 'देना पावना' या कादंबऱ्यांवर स्वतंत्रपणे लिहिण्याचा माझा मानस होता; परंतु त्यांच्या त्रोटक उल्लेखांवर मी समाधान मानले आहे. शेवटी लेखनाच्या आकारालाही मर्यादा असतेच. दुसरे असे की, अशा कितीही कादंबऱ्यांचे स्वतंत्रपणे रसग्रहण केले तरी त्यातून शरच्चंद्रांच्या श्रेष्ठ कलेबद्दल व श्रेष्ठ जीवनमूल्यांबद्दल जे निष्कर्ष निघतात ते या सात प्रकरणांत थोडी पुनरावृत्ती पत्करूनही, मांडले गेलेलेच आहेत. यातील कोणतेही प्रकरण वाचले तर ते स्वतंत्र लेखन म्हणून वाचता यावे असा शक्य तेवढा प्रयत्न मी केलेला आहे; परंतु प्रथमपासून शेवटपर्यंत हे लेख वाचत गेल्यास माझा स्वतःचा जीवनाबद्दलचा आणि कलेबद्दलचा दृष्टिकोणही वाचकाच्या लक्षात येईल असे वाटते. □


" एका वेगळ्या विषयावर भर देणारी ही कादंबरी. स्त्री-बुवाबाजीच्या प्रकारांमागचे मर्म उलगडून सांगणारी. कुठलंही भाष्य न करता एक सत्यघटना जशीच्या तशी मांडल्याने झपाटून टाकण्याचे चांगलेच सामर्थ्य या कादंबरीला लाभलंय. त्याच त्या प्रेमाच्या त्रिकोणकथांपेक्षा एक महत्त्वाचा सामाजिक विचार लालित्यपूर्णतेने या नवोदित लेखकाने घडवलाय, त्यामुळे बुवाबाजीसारख्या गोष्टींबाबत वाचक अधिक जागरूक बनतील."


**पुस्तक पंढरी : ऑगस्ट १९८२ अंक**
**बॉंबे बुक क्लब–ऑगस्ट निवड**

# स ब ला

लेखक : माधव शिरवळकर.
राजहंस प्रकाशन, पुणे ३०
मूल्य : रुपये बारा

# कुंपण आणि आकाश

मंगला गोडबोले



माझ्या जवळच्या एका उच्चभ्रू वसाहतीतल्या दहा–पंधरा सुखवस्तू गृहिणी गेले काही महिने एकत्र येत होत्या. गट...मंडळ...क्लब...नाव नक्की काय दिलं होतं ते आठवत नाही; पण महिन्यातून दोन वेळा त्या आळीपाळीने एकेकीच्या घरी जमायच्या आणि ताज्या घडामोडींबद्दल, पुस्तकांबद्दल, सिनेमा-नाटकांबद्दल बोलायच्या एवढं खरं. दर वेळी संबंधित विषयाच्या एखाद्या व्यक्तीला बोलवण्याचाही त्यांचा प्रयत्न असायचा. त्याने त्यांच्या बोलण्याला अधिक दिशा, नेमकेपणा द्यावा अशी त्यांची अपेक्षा असायची. एकदा त्या मलाही बोलवायला आल्या होत्या; पण घरगुती अडचणींमुळे मी जाऊ शकले नव्हते. इकडून तिकडून त्यांच्याविषयीच्या बातम्या मात्र कानांवर येतच होत्या. एकदा काय तर म्हणे त्यांनी दिवाळीमध्ये अनाथाश्रमात जाऊन फराळाचे पदार्थ दिले. आणखी एकदा मूकबधिरशाळेला भेट दिली. मग झोपडपट्टीत साक्षरताप्रसार, मोलकरणींसाठी बँकांमध्ये खाती उघडणं, मग रक्तदान...सगळं कसं ठराविक होतं. तरी पण ते 'होतं' वेगवेगळ्या पातळ्यांवर. निष्क्रिय, आत्मकेंद्रित बनवणाऱ्या आजच्या काळात या गटाचं 'असणं' हासुद्धा मला एक आधारच वाटायचा. अचानक गटाचं कामकाज थंडावलं. संख्या रोडावत चालली. मग कधी तरी गटच नाहीसा झाला. अर्थात त्यामुळे त्या अंध किंवा मूकबधिरांच्या शाळांचं, झोपडपट्ट्यांचं, मोलकरणींचं काही अडलं अशातला भाग नाही. समाजसेवेचा असा तात्कालिक झटका सतत कोणत्या ना कोणत्या गटाला येत असतोच. त्यामुळे हा नव्हे तर दुसरा गट त्यांच्या मदतीला गेला असताच; पण हा गट बंद का पडला हे जाणून घेण्यास मी फार उत्सुक झाले. वेगवेगळ्या संदर्भात सुट्यासुट्या भेटणाऱ्या त्या गटातल्या बायकांना वरचेवर त्याबद्दल टोकत राहिले. बहुतेकींनी टाळाटाळच केली; पण त्यातील एकजण तेवढी वैतागून पण मनापासून म्हणाली,

'काय करायचं हो नसती धडपड करून? शेवटी आम्ही काही केलं तरी लोक त्याच्याकडे संशयानंच बघणार. श्रीमंतांच्या बायकांचे वेळ घालवण्याचे धंदे, अशीच संभावना करणार. नवऱ्यांच्या जीवावर फुशारक्या करतो म्हणणार. शेवटी एक–दोन नामवंत वक्तेसुद्धा 'तुमच्यासमोर काय बोलायचं' असं म्हणाले तेव्हा मात्र आमची चिकाटी संपली!'

ऐकूनसुद्धा मला वाईट वाटलं. वास्तविक ऐकलं ते काही नवीन नव्हतं. सुखवस्तु स्त्रियांची छानछोकी. दिशाहीनपणा, समाजकार्याचा उमाळा, प्रसिद्धीची हाव, नवऱ्यांच्या पदांचा कमी-अधिक फायदा घेण्याची प्रवृत्ती हे सगळं पार पुलंच्या 'अतिविशाल महिलामंडळा'पासून आजपर्यंत आपण ऐकतो, बघतो आहोतच. हे सगळं खोटं अजिबात नाही; पण अतिरंजित नक्कीच आहे आणि ही अतिरंजितता पूर्वी कधी नव्हती इतकी या आजच्या काळाला धोक्याची आहे. एक तर काळाच्या रेट्यामुळे आपण सगळेच दिवसेंदिवस इहवादी, सुखवादी, क्षणवादी बनत चाललो आहोत. आपल्या व्यक्तीगत उत्कर्षापलीकडे कोणत्याही सामाजिक सांस्कृतिक समस्येकडे बघायला आपल्याला वेळ नाही. मग ज्याच्यापाशी तो आहे त्यांची 'रिकामटेकडे' म्हणून संभावना करून आपण काय मिळवणार आहोत?

नेहमीप्रमाणेच याही बाबतीत पुरुषांपेक्षा स्त्रियांचा बळी जास्त जातो कारण पुरुषाचं कोणतंच काम त्याच्या आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक स्तराच्या पार्श्वभूमीवर तोललं जात नाही. तसं असतं तर रोटरी, लायन, जायंट यासारख्या सुखवस्तू पुरुषांच्या आंतरराष्ट्रीय संघटना इतक्या मानानं वाढूच शकल्या नसत्या. आज करताहेत ती कामं करू शकल्या नसत्या. बाईच्या बाबतीत मात्र श्रीमंताची बायको, हे सर्वात मोठं दूषण. मग ती मूर्ख, मठ्ठ, दांभिक, परभृत इत्यादी असणं हे गृहीतच धरलेलं. ताज्या प्रश्नांचं भान तिला काय असणार? आणि तिचं आकलन? ते तर पारच वर्गीय चौकटीत डांबलेलं असणार! सारांश, तिचं कुठलंही काम गंभीरपणे घेण्याची गरज नाही हे आपण एकदाच, कायमचं, ठरवून टाकलेलं आहे.

ज्या देशात बहुसंख्य लोक दारिद्र्यरेषेखाली जगतात तेथे श्रीमंती हा गुन्हा ठरावा हे समजण्यासारखं आहे; पण बाईच्या बाबतीत मात्र तो तीव्र ठरावा याला पूर्वग्रहाशिवाय दुसरं उत्तर नाही. वास्तविक त्या पहिल्या गटातल्या बायकांनाच दुपारची रमी खेळता आली असती, किटी पार्टी–हेल्थ क्लब–कॉकटेल यातल्या कशातही वेळ आणि पैसा घालवता आला असता. लोळून मासिकं किंवा मिल्स आणि बूनची पुस्तकं वाचता आली असती. त्यापलीकडे जाऊन त्यांना काही तरी करावंसं वाटलं असेल तर तो स्फुलिंग कितीही छोटा असला तरी मोलाचा आहे. त्यांचे सगळेच प्रयत्न बरोबर ठरतील असा माझा दावा नाही. कामाची दिशा कोणाचीही चुकू शकते. दंभ, स्वार्थ, पोकळपणा हा कोणत्याही कामामध्ये येऊ शकतो. (आज अगदी दलितांनी दलितांसाठी केलेल्या कामांमध्येसुद्धा हे दोष कुठेच नाहीत असं आपण खात्रीनं म्हणू शकू का?) पण हे सगळे मानवी मनोवृत्तीचे भाग आहेत. त्याचं सगळं ओझं आर्थिक स्थितीवर टाकण्याचं काही कारण नाही आणि आकलनाच्या मर्यादेबद्दल बोलायचं तर आजच्या आपल्या एकूण समाजाच्या किंवा स्त्रियांच्या प्रश्नांचा आवाका इतका मोठा आहे आणि स्वरूप इतकं व्यामिश्र आहे की कोणाही एका वर्गीय जाणिवेतून त्या सगळ्याचं एकदम आकलन होईल अशी शक्यता फारशी नाही. याचं भान आलेले सुज्ञ कार्यकर्ते म्हणूनच बहुधा आपल्या कामाचं क्षेत्र, कक्षा आधीच नक्की करून घेतात. सगळ्यांच्या सगळ्या प्रश्नांचं अगडबंब शिवधनुष्य पेलायला एखादी व्यक्ती किंवा संघटना धजावत नाही. खरं म्हणजे या प्रश्नांच्या गदारोळात कुठल्याही कोप-

त्यात कुठलंही छोटंसं काम झालं तरी ते आज आपल्या समाजाला हवं आहे. कामा-ऐवजी, ते कोण करतंय याला इतकं महत्त्व देण्याचं कारण काय ? त्या बायका आहेत एवढंच ?

ही समस्या अगदी अल्पसंख्यांची आहे याची मला जाणीव आहे; पण स्त्रियांच्या काही समस्या फार मोठ्या संख्येच्या, अवाढव्य आहेत म्हणून आपण त्यांना हात घालू शकणार नाही. आणि काही सूक्ष्म, फारच मोजक्यांच्या आहेत म्हणून त्याकडे दुर्लक्ष करणार असं म्हणून कसं चालेल ? ज्या स्त्रियांकडे किमान सुविधा आहेत, फावला वेळ आणि पैसा आहे त्यांचा थोडाही कल सामाजिक प्रश्नांकडे असला तर तो फार जबाबदारीनं, सहानुभूतीनं जोपासला पाहिजे. सुरुवातीची त्यांची पावलं फारच रूढ आणि रुळलेल्या वाटेवरून पडत असली तरी, न जाणो, पुढेमागे त्यांनाही दिशा सापडेल असा आशावाद त्यामागे पाहिजे. कधी यापलीकडे जाऊन, प्रत्यक्ष कार्यासाठी नव्हे तरी वैचारिक पार्श्वभूमी तयार करण्यासाठी त्यांचा उपयोग करून घेता येणं शक्य असेल तर तोही प्रयत्न झाला पाहिजे. कृतीचं बीज हे अखेर विचारामध्येच असतं आणि विचाराला जातपात, लिंग, वर्ग असलं काही नसतं.


या सगळ्या शक्यता नाकारून आज आपण काय करतो ? तर वरच्या आर्थिक गटातल्या स्त्रियांच्या प्रयत्नांचा उपहास करण, त्याकडे संशयानं बघणं किंवा अनुल्लेखानं मारणं. त्यांना सल्ला, मार्गदर्शन मिळणं तर दूरच राहातं. त्यामुळं पुष्कळदा त्यांच्या पहिल्या उत्साहावर पाणी पडतं आणि त्या कधी नाइलाजानं, कधी अगतिकतेनं क्लब, रमी, पार्ट्या याकडे वळतात. त्यानं आपला पूर्वग्रह आणखीच पक्का होतो.

हे सगळं जाणवून मी त्या दिवशी त्या बाईला म्हटलं, ‘तुम्ही पुन्हा एकत्र यायला लागा. वाटल्यास मी येते तुमच्या पहिल्या बैठकीला !’

यावर ती नाराजीनं म्हणाली,

‘काही नको. नाही तरी कसलं हो आपलं बायकांचं आयुष्य ? आपल्याला गरिबीही नाडते आणि श्रीमंतीही नाडते !’

‘कारण त्यातलं काहीच आपण आपल्यासाठी मिळवलेलं नसतं. असं नाही तुम्हाला वाटत ?’ मी विचारलं, ती विचारात पडली. मी मात्र माझं नेहमीचं पालुपद पुन्हा एकदा गाठलं – ‘जो स्वेच्छेनं पाण्यात उतरतो त्याचा प्रश्नच नसतो. ज्याला ढकललं जातं तोही लवकर, उशीरा, सहज, कष्टानं पण हातपाय हलवायला लागतोच. नुसतंच काठाकाठाशी घुटमळणाऱ्यांच्या अंगावर मात्र असेच शितोडे उडायचे !’ ❑




अनुराधा पाटील यांचे अनुभवविश्व व्यक्तिकेंद्रित आहे. त्यामुळेच समाजजीवनाच्या संदर्भात मानवी जीवनाचे झालेले दर्शन त्यातून दिसत नाही.

¤

लेखांक दहा

अविनाश सहस्रबुद्धे

¤

# प्रगल्भ व्यक्तिमत्त्वाचे भावगर्भ दर्शन

कधीकधी सारंच कसं पुसून जातं
तू, समोरचं झाड, हा रस्ता.
माझे डोळे पहात असतात ही
बिनचेहऱ्याची संध्याकाळ
हे महापुरात बुडत जाणारं शहर
तसा तूही असतोस कधी...
अनोळखी, परका...
माझ्या श्वासांपलीकडचा !
मला व्यापून उरते आसपासची
सारी उदासीनता.

‘दिगंत’ या अनुराधा पाटील यांच्या काव्यसंग्रहातील ही प्रातिनिधिक कविता म्हणता येईल.

या कवितासंग्रहाच्या भावानुभावाच्या केंद्रस्थानी प्रामुख्याने कवयित्रीची प्रेमविषयक जाणीव आहे. या संग्रहातील कवितांमधून या कवयित्रीच्या वाङ्मयीन प्रेरणा, तिच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू व अंतर्मनातील असंख्य भावछटा यांचे दर्शन होते. त्यातही या कवयित्रीच्या काव्यनिर्मितीला जीवनरस पुरविणाऱ्या धमन्या मुख्यत्वे प्रेमानुभूतीच्या आहेत हे संग्रहातील कविता वाचताच चटकन जाणवते. या कवितांतले अनुभव हे प्रेमानुभूतीशी, निसर्गाशी व काही वेळा परिस्थितीच्या रूपाशी निगडित आहेत. या कवितांतून व्यक्त झालेले प्रीतीचे अनुभव विविधतेने नटलेले आहेत.

भावनांच्या अनेक सच्च्या सुरावटींनी फुलणारे आहेत. प्रीतीतून, प्रियकराशी झालेल्या आणि न झालेल्या, फक्त स्वप्नसृष्टीतच पाहिलेल्या गाठीभेटीतून उद्भवणाऱ्या अनुभवांनी या कवयित्रीच्या अनेक कविता व्यापलेल्या आहेत. म्हणूनच ‘तिला’ भेटणारा हा ‘तो’ जितका परिचयाचा तितकाच ‘अनोळखी, परका’ ही आहे. या कवितांत हा प्रियकर अनेक स्वरूपांत अवतरतो. कधी तो रक्तात, धमन्यात वाहणारा प्रेषित होऊन अवतरतो तर कधी दूरस्थ आभाळासारखा, निर्विकार स्वप्नांसारखा भासतो. हा प्रियकर ‘रुजत जावीत आत आत मुळे मातीत, तसा तू माझ्यात’ अशी समृद्ध करणारी जाणीव देणारा जसा आहे तसाच ‘तगमगणाऱ्या मध्यरात्री असंख्य हुंदके देणारा’ ही आहे. अनुराधा पाटील यांचे वैशिष्ट्य असे की, या कवितांतून भेटणाऱ्या ‘ती’च्या प्रीतीला एक स्थैर्य, पूर्णत्व आणि प्रौढत्व त्यांनी मिळवून दिले आहे. म्हणूनच त्यात हुरहूर, आर्तता, विषण्णता जशी आहे तसेच या सर्वांतून उद्भवणारे चिंतनही आहे. या चिंतनातून जीवनाच्या स्वरूपाविषयी, मानवी मनाच्या अथांगतेविषयी कधी उत्तरं शोधण्याची प्रेरणा देणारी तर

कधी निरुत्तर करणारी प्रश्नचिन्हं त्यांना पडतात. जीवनातला विस्कळितपणा, उजाडपणा, उदासीनता प्रकर्षाने जाणवते. माणसाच्या एकलेपणाची जाणीव होते आणि कवयित्री स्वत:लाच प्रश्न विचारते, 'कुठे हरवतात माणसं अशी मनात वाढणारी ?' आयुष्यभर मनात वाढलेली ही माणसं अशी अचानक हरवली की,

क्षितिजाच्या काठाशी चंद्र मावळून गेले
डोळ्यांपुढे स्वप्न होते तेही दिसेनासे झाले

अशी तिची अवस्था होते. आपल्या सगळ्या भावभावना कोमेजून जाव्यात असा हा प्रेमानुभव आहे असं कवयित्रीला वाटतं.

सीमा विसरून माझा झालास
असे दान तुझेच होते
लाख हातांनी देऊ केलेस
एवढेच मला पुरे होते.

असा सुरू झालेला प्रेमानुभावाचा प्रवास शेवटी

देणे तुझे असे की, हा शाप संचिताला
वाटा जुन्या व्यथांच्या आल्या पुन्हा
घराला !

असा अंतर्मनालाच कोमेजून टाकणाऱ्या अवस्थेत संपतो. या प्रवासात भेटलेले प्रीतीचे असंख्य अनुभव अनेक भावनात्मक विणींनी आणि लयींनी विणलेले आहेत. मोकळ्या मनानं या अनुभवांना सामोरं जायचं, त्यामुळं उत्पन्न होणाऱ्या सर्व मन:स्थितीचा स्वीकार करायचा असं हे कविमन आहे. या कवयित्रीचे अनुभवविश्व प्रेमानुभूतीशीच प्रामुख्यानं निगडित असलं तरी त्यातल्या अनुभवाचा सच्चेपणा ठायी ठायी जाणवतो. हा सच्चेपणा काव्यांतर्गत प्रमाणांनीच सिद्ध होतो. हा अनुभव प्रांजल, सच्चा असल्यामुळंच त्यात भडकपणा, आक्रस्ताळीपणा, नाटकीपणा नाही, कृत्रिमता नाही. कवितेत व्यक्त होणारी भावना आणि ज्यांच्या आधारे ती व्यक्त होते ते प्रसंग, दृश्य अथवा प्रतिमा यांचा सांधा जुळलेला आपल्याला दिसतो. प्रेमानुभवातील दु:खाचं व्यथेचं प्रदर्शन करण्याचा प्रयत्न यात नाही जो आजच्या अनेक कवयित्रींच्या कवितांत दिसतो व म्हणूनच या अनुभवात नकलीपणा किंचितही जाणवत नाही. या प्रेमानुभवाने आलेली नैराश्याची जाणीव कविता क्र. ४९ मधून अत्यंत प्रभावीपणे व्यक्त झाली आहे. कवयित्री म्हणते,

अथांग क्षितिजाच्या काठांना घालीत
पालाण
निघून गेलेत स्वप्नांचे काफिले
नि:शब्द कोसळतात आज सरी आकाश
हरवून
गहिवरले मातीच्या दिठी दिठी मरण-
सोहळे.

३८ क्रमांकाच्या कवितेत अनुभवातील



**सौ. अनुराधा पाटील :**
५ एप्रिल १९५४ रोजी पहूर (जि. जळगाव) या खेड्यात शेतकरी कुटुंबात जन्म. शिक्षण मॅट्रिकपर्यंत. सध्या वास्तव्य औरंगाबाद मुक्कामी. प्रतिष्ठान, युगवाणी, वैखरी, मराठवाडा दिवाळी इ. नियतकालिकांतून कवितांना प्रसिद्धी. 'दिगंत' काव्यसंग्रह १९८१ मध्ये प्रकाशित.

१

आणि आता हे उदास
अंतहीन आकाश......

आपण आपल्याच घराचं
दार वाजवावं तशी मी
तुला शोधत होते कुठेही
सांग ना कुठे जावं
कायम गुलाम असणाऱ्यांनी
कसे सोडवावेत, आवळत
जाणारे अदृश्य पाश
आणि आता हे उदास
अंतहीन आकाश...

मातीला फुटणाऱ्या पहिल्या
अंकुरासारखे अप्रूप
माझ्याही नकळत किती—
काही तुला देत गेले
तुला कळलेच नाही
माझे असणे.
कशी मांडावी जगण्याची खोटी
आरास आणि आता हे उदास
अंतहीन आकाश...

केवढे बदल झालेले
तुझ्यात आणि बाहेर
भ्रमात जगण्याचीच सवय
एवढेच निर्विवाद सत्य
अन् थांबलासा वाटणारा
माझा श्वास.

आणि आता हे उदास
अंतहीन आकाश...

आजही तुझ्यासाठी येणारा
क्षण, केवढा उजळपणा
घेऊन सामोरा येतो
मला आठवत रहाते
एखादी व्याकुळ प्रेयसी
'आवो आखरी घाव
तुम्हारा सही' म्हणणारी.
तिच्या आसवात वितळतो विश्वास
आणि आता हे उदास
अंतहीन आकाश......

२

अनावर मोहाने तिने एकदा
आयुष्याचा तळहात
वाचून पाहिला
आणि त्याबरहुकूम ती चालू लागली.
रेषांच्या झावळांनी बंदिस्त केलेले
संकेत खुडून
चालता चालता ती विसावली
ते अरण्य होते
आयुष्यासारखेच अंगावर येणारे.
सरत्या मुक्कामाची वेस
अजून दूर होती आणि
सगळे रस्ते अरण्यातून जातात
हे तिला माहीत नव्हते.

आर्तता इतकी दाट होऊन येते की, अनुभवांचा पाराच कवयित्रीने चिमटीत पकडला आहे असे वाटते. अनुभवांची ही 'बेवारस' आर्तताच कवयित्रीला स्वतःसाठी एक स्वतंत्र रस्ता शोधण्याला उद्युक्त करते आणि ती म्हणते,

मग कुठवर आवळावेत बळेबळेच हे
ठिसूळ बंध
आपणच आपल्यासाठी निर्माण केलेले
जथ्थेच्या जथ्थे व्यथांचे आणि त्यांची
बेवारस आर्तता
म्हणून ठरवून टाकलंय
सर्वच दुःखांना फ्रेम करून टाकावं
आणि—
शोधावा आपणच आपल्यासाठी एक
स्वतंत्र रस्ता.

१९ क्रमांकाच्या कवितेत तर एकटेपणाच्या अनुभवांचा तळ कवयित्रीने गाठला आहे असे वाटते.

नुसतेच जगण्याचे बनावटी जाहीरनामे
आता डकवलेले आपल्या रस्त्यांवर
केवढे अफाट पसरलेले जग आणि
एकटेपणाची मोहर तप्त पावलांवर.
सभोवार पसरलेले आपल्याच हाकांचे
लांबच लांब प्रदेश सोबतीला
आता आता सहज सरावताहेत पावलं
या अंधाराच्या समृद्ध युगाला.

अशा ओळींमधून एकटेपणाची व्यथा व्यक्त होते.

अनुभव सगळ्यांनाच येत असतात; परंतु त्या अनुभवांचं आकलन होणं ही अगदी वेगळी गोष्ट आहे. हे आकलन करताना, ते सर्वांगाने न्याहाळताना मनातले सगळे संकेत, पूर्वग्रह बाजूला ठेवावे लागतात व ही गोष्ट वरून वाटते तितकी सोपी नाही. अनुराधा पाटील यांना मात्र हे साधलं आहे आणि त्यामुळंच या अनुभवांचं वजन, त्याचं रूप, त्यातील गर्भित पापुद्रे, वळणं त्या नेमकेपणानं टिपताना दिसतात.

पुरात वाहून गेलेल्या उजाड
गावासारखी मी,
मलाही माहीत आहे
दिव्यावर जमणाऱ्या काजळीसारखे
रातोरात तर छातीत
दाटत नसते सुनेपण.
माझ्या सहज स्पर्शातेही
किती दुखावतात आज
जुने दिवस.

*या ओळींमध्ये एका गाढ, खोल कुठे तरी* व्यथित करणाऱ्या, उदास करणाऱ्या अनुभवाचं रूप त्यांनी सहजगत्या पकडलं आहे.

'दिगंत' या संग्रहातील कविता वाचल्यावर असं जाणवतं की, ह्या कवितेमागे जे मन आहे ते प्रेमानुभूतीच्या जखमेने व्यथित झालेले, आर्द्र मन आहे व म्हणूनच एक प्रकारचं औदासिन्य, खिन्नता त्यांच्या साऱ्या अनुभवविश्वाला व्यापून राहिलेली आहे. अनुराधा पाटलांचा अनुभव मुख्यतः भावनिक आहे. या अनुभवाचे रूप सर्वत्र संयत, हळुवार असे आहे. प्रेमानुभवातील अनंत गहिऱ्या छटा आपल्याला या कवितांमधून पहायला मिळतात. इतक्या अनोख्या, संमिश्र, सत्य आणि स्वप्न यांच्या सीमेवर घोटाळणाऱ्या विलक्षण भेदक, उत्कट छटा आजच्या सामाजिक बांधिलकीच्या युगात तरुण कवींच्या कवितेत दुर्मिळपणेच दिसतात. तितकीच विलोभनीय व प्रांजळ आहे त्यांची अभिव्यक्ती. मिताक्षरी, संयत, स्वच्छ, सरळ व तितकीच सूचकही. या कवितांतून प्रकट होणारे स्त्रीत्व जसे उत्कट व अंतर्मुख आहे तसेच ते सुजाण आणि स्वाभिमानी आहे. अनुराधा पाटील यांचे अनुभवविश्व हे व्यक्तिकेन्द्रित आहे व त्यामुळेच समाजजीवनाच्या संदर्भात मानवी जीवनाचे झालेले दर्शन त्यातून दिसत नाही. मानवी जीवनाचा भोंगळपणा, विद्रूपता, शोषणाचे दृश्य-अदृश्य धागेदोरे, अन्याय, त्यातून येणारे असहायपण इ. चे दर्शन या कवितांमधून होत नाही. अपवाद फक्त क्रमांक ४८ कवितेचा.

भाबड्या आशावादाने पाहात
आलोय मी
ही उजाड खेडी,
गुडघ्याभोवती हातांची मिठी घालून
बसलेलं हे जीवन,
किती समजूतदारपणानं संपत
जातात ही माणसं.

अशा ओळींमधून कवयित्रीने आजच्या ग्रामीण भागातील माणसाची अगतिकता अत्यंत प्रभावीपणे व्यक्त केली आहे.

अनुराधा पाटील यांनी आपल्या प्रेमानुभूतीच्या विश्वातून पाहिलेली मानवी मनाची असंख्य रूपं जशी त्यांच्या कवितेतून दिसतात तशीच निसर्गाची विविध रूपंही दिसतात. म्हणूनच आभाळ, पाऊस, माती, लाटा मोहर, डोंगररेषा, नदी, हिरवे रान, शेतं, सळसळणारा पिंपळ, शुभ्र पांढरे मोर, पक्षी अशा निसर्गप्रतिमांचा गट त्यात मोठा आहे. त्यातही 'पाऊस' ही कवयित्रीची विशेष आवडती प्रतिमा आहे.

१. कळत नाही कुठे सोडून यावा
डोळ्यांच्या
काठावर उतरणारा हा अपरंपार पाऊस
२. पाऊस नसतानाही पावसाचे गीत मी

---

'आजचे कवी' ही लेखमाला गेल्या वर्षी, ७ सप्टें. ८३ अंकापासून सुरू झाली. १९७० च्या आगेमागे ज्यांनी कवितालेखनास प्रारंभ केला आणि ज्यांचा पहिला कवितासंग्रह नुकताच प्रसिद्ध झाला आहे अशा दहा कवींची आणि त्यांच्या कवितांची ओळख या लेखमालेतून करून देण्याचा उद्देश होता.

दिवाळीपूर्वी मालेतील पाच लेख प्रसिद्ध झाले. दिवाळीनंतर बाकी चार लेख प्रसिद्ध झाले. *या अंकात शेवटचा दहावा लेख प्रसिद्ध होत आहे. ज्या दहा कवींची आपण या* सदरात नोंद घेतली, त्यांची नावे आहेत— द. भा. धामणस्कर, हेमंत जोगळेकर, वृंदा लिमये, अनिल द्रविड, प्रमोद कोपर्डे, नारायण कुलकर्णी कवठेकर, उत्तम कोळगावकर; ह शि. खरात, वसंत जाधव आणि अनुराधा पाटील.

ही लेखमाला या अंकापासून संपणार असली तरी नव्यानं पुढे येणाऱ्या काही 'आजच्या कवींची' नोंद आपण याचप्रकारे 'माणूस' मध्ये अधूनमधून घेणारच आहोत. ◻

मी माझ्या हुंदक्यांनी ऐकत असते.

३. केव्हा केव्हा पाऊस पडत असतानाही
गोठून जातात माझे अश्रू
पाऊस न येण्याच्या भयाने.

४. त्यांच्या जगण्यालाच फुटलेले
अक्षय पावसाचे एक गाणे

५. या पाऊस धारांनी केले आयुष्य पांगळे

अशा अनेक ओळींमधून 'पाऊस' प्रतिमेचा वापर अत्यंत समर्पकपणे कवयित्रीने केला आहे. काही वेळा मनोनिर्मित अगर सांकेतिक प्रतीकांच्या दृश्यांच्या आधारे देखील त्यांची कविता साकार होताना दिसते. शिवालय, फुलवाती, अभिषेक, गाभारे चंदन, ॐकार, ऋचा, अभंग, संन्यासी, वेद इ. सनातन प्रतिमांचा वापरही जागोजागी दिसतो. अशा प्रतिमांमधून कवयित्रीचे श्रद्धाशील मन तसेच भारतीय संस्कृतीशी खोलवर असलेले नाते दिसते.

अनुराधा पाटील भावानुभवाच्या अभिव्यक्तीसाठी शब्दांचा वापर अत्यंत सावधपणे करतात. परिचित शब्दसमूहांची, प्रतिमांची भारतीय संस्कृतीशी नाते असलेल्या विशिष्ट सनातनी प्रतिमांचीही मांडणी त्या अशा पद्धतीने करतात की, त्यांच्या कवितेला संथ अशी लय प्राप्त होते. प्रतिमांच्या, चमत्कृतीच्या, आलंकारिक भाषेच्या, यमकांच्या आहारी जाण्याचा त्यांचा पिंड नाही.

थोडक्यात, संग्रहातील कवितांमध्ये कवयित्रीच्या अंतर्मनातील भावभावनांचे जसे दर्शन घडते तसेच तिच्या परिपक्व व प्रगल्भ व्यक्तिमत्वाचेही अत्यंत भावगर्भ दर्शन काव्यरसिकांना घडते. □


**वैराण मुलुखाचे**
**सुजलाम् सुफलाम् भूमीत**
**रूपांतर करणारा**
**थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ**
**डॉ. कार्व्हर यांचे**
**प्रेरणादायी चरित्र**

**एक होता कार्व्हर**

लेखिका : **सौ. वीणा गवाणकर**
दुसरी आवृत्ती
मूल्य : तीस रुपये
**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पुणे ३०


# पुस्तके

## 'सत्तांतर'

### एक प्रायोगिक कादंबरी

'कादंबरी' हा वाचकप्रिय वाङ्मयप्रकार आहे. 'मागणी तसा पुरवठा' या न्यायाने आज 'रंजनात्मक कादंबरी' विपुल प्रमाणात लिहिली जात आहे. शृंगारिक, रहस्यमय, काल्पनिक कथानक आणि तेच तेच मध्यमवर्गीय जीवन बहुसंख्य मराठी कादंबरीकार रंगवीत आहेत. विपुलतेने लिहिली जाणारी आजची रंजनात्मक कादंबरी मराठी लेखकांचे अनुभव–दारिद्र्यच स्पष्ट करते. मराठी कादंबरी-लेखक अनुभव समृद्धीत दारिद्र्यरेषेच्या खाली आहेत. एकाच कादंबरी-लेखकाचे संपूर्ण लेखन वाचताना तर हा अनुभव प्रकर्षाने येतो. अशा बहुप्रसव लेखकांच्या पहिल्या आणि शेवटच्या कादंबरीत अगदी जुळ्या भावंडांइतकी एकरूपता असते.

नवे विषय, नवे अनुभव यांना शब्दबद्ध करावे, मराठी कादंबरीला अज्ञात असलेली अनुभवाची क्षितिजे शोधावीत, या जिद्दीने लेखन करणारे लेखक अपवादात्मकच आहेत. मानवी जीवन-दर्शनापलीकडे मराठी कादंबरीचे अनुभवविश्व नाही. मानवी जीवनाप्रमाणेच निसर्गघटक, प्राणी, पक्षी यांना स्वतंत्र अस्तित्व असते, व्यक्तिमत्त्व असते. त्यांचे एक स्वतंत्र विश्व असते; परंतु मराठी कादंबरीत प्राणिजीवन, निसर्ग येतो तो स्थूल स्वरूपात, प्रतीकात्मक किंवा पार्श्वभूमीसारखा. गो. नी. दांडेकरांची 'वाघरू' डॉ. आनंद यादवांची 'गोतावळा', 'माऊली' ('राजस' दिवाळी अंक १९७९) या कादंबऱ्यांत प्रामुख्याने प्राणीजीवन चित्रित झालेले असले, तरी मानवी जीवनाच्या संदर्भातच लेखक प्राणिजीवनाचा विचार करतात. व्यंकटेश माडगूळकरांची 'सत्तांतर' ही कादंबरी मानवी जीवनाशी समांतर अशा वानरासारख्या वन्य प्राण्यांच्या जीवनाचे स्वतंत्ररीत्या दर्शन घडविते.

'सत्तांतर' ही मराठीतील एक 'प्रायोगिक कादंबरी' आहे. शिकारीच्या छंदातून व्यंकटेश माडगूळकरांनी वानरांच्या जीवनाचे जे निरीक्षण केले, या प्राण्यांच्या जगण्यात त्यांना जे वैशिष्ट्यपूर्ण वेगळेपण जाणवले, ते 'सत्तांतर' मध्ये माडगूळकरांनी चित्रित केले आहे.

बारा दशलक्ष वर्षांमागे आफ्रिकेत जन्माला आलेला वानरांचा वंश युरोपच्या मार्गाने आशियात आला. तो आजपर्यंत टिकून आहे. वानरांचा वंशवेल अखंड चढता रहावा. उत्तम बलिष्ठ नरांचाच वंश रहावा, दुर्बलांचा राहू नये, संख्या सतत मर्यादित रहावी, म्हणून दर साडेतीन वर्षांनी वानरांच्या टोळचात सत्तांतर होते. 'सत्तांतरा'-चे हे तत्त्व त्यांनी निसर्गनियमांनी अंगीकारलेले असते. वानरांच्या टोळचांतील 'सत्तांतर', सत्ता-संघर्ष हे कादंबरीचे केंद्रवर्ती सूत्र आहे.

मध्यभारतातील एका विशाल अरण्यात 'मुडा' आणि त्याची सतरा जणांची टोळी टिकून होती. ह्या अरण्यातील एक तळं आणि नाला–त्यांच्यामधला एक लहानसा दीड चौरसकिलोमीटरचा प्रदेश म्हणजे 'मुडा' वानरांचं राज्य होते. ते त्यानं स्वसामर्थ्याने कमावले होते. त्याच्या शेजारच्या प्रदेशात 'लालबुड्या' ची तेरा जणांची टोळी रहात होती. तर कधीकाळी बळकावलेली आपली वडिलोपार्जित 'सत्ता' परत घण्यासाठी, 'मोगा' आणि त्याचे पाच तरणेबांड साथीदार घुसखोरी करीत होते. मोडकळीस आलेल्या, कमकुवत अशा एखाद्या टोळीच्या प्रमुखाला अधिकारपदावरून उखडून लावून तिचा ताबा मिळविण्याच्या उद्देशाने हे घुसखोर आले होते.

'सत्तांतर' मधील संघर्ष हा सत्तेकरिता चाललेला संघर्ष आहे. माडगूळकर अनेक दिशांनी तो व्यक्त करतात. 'सत्तांतर' मधील अनुभव विविध पातळ्यांवरून त्यामुळेच व्यक्त होताना दिसतो. 'सत्ते' बरोबरच मिळणारी सर्व सुख-उपभोगाची सजी-

वाची लालसा, सजीवाला असणारी 'स्व' अस्तित्वाची जाणीव· अस्तित्व रक्षणाकरिता भोवतालचे वास्तव अनुकूल करण्याची मूलभूत प्रेरणा, निद्रा, भय, मैथुन, भक्ष्य, निवारा यांच्या प्राप्तीकरिता चाललेला वानरांचा 'संघर्ष' स्वार्थ, सूड, प्रीती, क्रौर्य, करुणा, वात्सल्य इत्यादी भावनांनी रंगतो.

'जीवन आणि मृत्यू' या स्वरूपातही हा 'संघर्ष' व्यक्त होतो. विराट जीवनचक्र फिरत असते आणि जीवन–मृत्यूचा संघर्षही त्याबरोबर अटळच असतो. जीवन–संघर्षात 'जुने जीव नाहीसे होतात, नवे जन्माला येतात. जीवन वाहात राहाते.' जंगलातील वणवा, बिबट्या वाघ, बहिरीससाणा, अजगर, जंगली कुत्री इत्यादी हिंस्र प्राणी, पशुपक्षी यांच्याशी संघर्ष करीत वानरं जगत होती. सजीवांची जीवनेच्छा प्रबळ असते. स्वतःच्या अस्तित्वरक्षणाकरिता, सतत जीवनसंघर्ष चालू असतो. माडगूळकर जंगलातील हा जीवनसंघर्ष अनेक प्रसंगांतून व्यक्त करतात. 'जंगलात वाघ कांचनमृगाच्या पाठीशी लागतो. कांचनमृग जिवाच्या अकांताने पळतो. थकतो. मृत्यूच्या भीतीने तळ्यात उडी घेतो आणि मगरीचे भक्ष्य बनतो. एक जीव दुसऱ्या जिवावर जगतो. एकाचे अस्तित्व दुसऱ्याच्या अस्तित्वाला आधार देते. कांचनमृगाच्या मृत्यूने वनजीवन अस्थिर होत नाही. जीवनचक्र फिरतच रहाते. कांचनमृग-मगरीच्या संघर्षानंतर माडगूळकर लिहितात, 'तळ्यात ज़ोरदार खळबळाट झाला आणि मग सगळं शांत झालं!' कांचनमृगाचा मृत्यू भोवतालच्या अस्तित्वावर काहीही परिणाम करू शकत नाही. त्याचप्रमाणे लांडोर, चितुरपक्षिणीची अंडी चोरताना विषारी सर्पाने 'लालबुड्या' च्या हाताचा चावा घेतला– करुझाडाचा बुडाशी तो एकाकी मरून पडला. मुंग्या, द्रिपाय, गिधाडं, तरस यांचे भक्ष्य बनला. दुसऱ्या दिवशी त्या ठिकाणी 'लालबुड्यां' ची नामोनिशाणीसुद्धा राहिली नाही. सजीवांचा अस्तित्वरक्षणाकरिता चाललेला संघर्ष आणि विराट जीवनचक्राच्या गतीतील त्या अस्तित्वाची निरर्थकता माडगूळकर संघर्षातून स्पष्ट करतात.

जीवन वाहते असते. काळ गतिमान असतो, तसाच संघर्षही प्रवाही असतो. 'हजारो वर्षं फिरत आलेलं संघर्षाचं हे रहाटगाडगं असंच फिरत राहाणार होतं.' व्यंकटेश माडगूळकर वन्य जीवनातील संघर्षाचं स्वरूप स्पष्ट करताना लिहितात. 'काळाप्रमाणंच संघर्षही सतत वाहतच असतो. त्याला खंड असा नसतोच. असलीच तर भरती असते, पूर असतो. जेव्हा जेव्हा खाणारी तोंडं भरमसाट वाढतात, गर्दी होते. तेव्हा तेव्हा संघर्ष बळावून उठतो.' (पृ. ७०)

## 'आईपण मरत नव्हतं'

वन्य जीवनातील, मानवेतर सृष्टीतील अनुभव शब्दबद्ध करणे, त्या अनुभवांना मूर्तरूप देणे कलावंताला कठीण असते. वानरांचे भावविश्व मुके, अबोल असे. ज्यांना भाषा ज्ञात असते, ते राग, लोभ, द्वेष, प्रेम इत्यादी भावना शब्दांतून व्यक्त करतात; परंतु ज्यांना बोलता येत नाही त्यांची भाषा कृती, ध्वनी, हावभावांची असते. शब्द हे माध्यमच अनुपस्थित असल्याने, वानरांसारख्या मुक्या प्राण्यांच्या हालचाली, शारीरिक तपशील यातून माडगूळकर सामर्थ्यवान मुडा, भांडखोर बोकांडी, वृद्ध एकाकी बोथरी, उनाडी, तरणी, क्रूर मोगा यांना स्वतंत्र आकार देतात, व्यक्तिमत्त्व देतात.

वानरासारखा चतुर प्राणी आपल्या राग, लोभ, द्वेष, क्रौर्य, वात्सल्य, अहंकारादी भावभावना व्यक्त करतो. 'मुडा' च्या पराभवानंतर आणि 'लालबुड्या' च्या अंतानंतर सर्व प्रदेशाची सत्ता मोगाच्या हातात येते. संतापलेला मोगा अत्यंत क्रूरपणे लांडीचे पोर ठार करतो. स्वतःच्या अपत्याची क्रूर हत्या लांडी पाहते. माडगूळकर लांडीच्या अस्वस्थतेचे वर्णन करतात–'आक्रोश करता आला असता, तर कुणाचंही काळीज उन्मळून यावं असा तिनं केला असता, छाती पिटली असती. जमिनीवर घालून घेतलं असतं. तोंडात माती कोंबून घेतली असती. हे सगळं तिच्या डोळ्यांत, चेहऱ्यावर दिसत होतं.' (पृ. ६०) मेलेलं पोर छातीशी कवटाळत लांडी चार दिवस हिंडत होती. माडगूळकर लिहितात– 'पोराला मरून चार दिवस झाले, तरी तिनं त्याला टाकलं नाही. घेऊन हिंडत होती. पोर मेलं होतं; तिचं आईपण मरत नव्हतं.' (पृ. ६१) व्यंकटेश माडगूळकरांची एखादी समर्पक प्रतिमा, काव्यात्मक वाक्य, एखादा ध्वनिवाचक शब्द, सुभाषितासारखा सूत्रमय विचार त्या सर्व प्रसंगाला सजीव करतो.

'सत्तांतर' चे लेखन काल्पनिक नाही. वानरांच्या जीवनाचे माडगूळकरांनी अतिशय सूक्ष्मपणे निरीक्षण केलेले आहे. सूक्ष्मनिरीक्षण आणि त्याची चित्रमय अभिव्यक्ती ही माडगूळकरांच्या लेखणीची सामर्थ्ये 'सत्तांतर' मध्ये उत्कर्षाला पोचली आहेत. टोळ्यांतील हल्ले–प्रतिहल्ले, त्यातील डावपेच, घुसखोरीच्या टोळीला पाहून हुप्प्याला आलेला संताप, टोळीवरील संकट टळल्यानंतर वानरींनी एकमेकींना मिठ्या मारून व्यक्त केलेला आनंदोत्सव, टोळीची पाणी पिण्याची, भक्ष्य शोधण्याची पद्धती, वानरींची भांडणं, नराला वश करण्याकरिता मादीचं वागणं इत्यादी अनेक निरीक्षणं माडगूळकर छायाचित्रासारखी टिपून घेतात आणि साक्षीभावाने शब्दांत चित्रित करतात. माडगूळकरांचे निरीक्षण–निवेदन वाचकाला प्रत्यक्षानुभूतीचा आनंद देते.

व्यंकटेश माडगूळकरांची प्रत्यक्षानुभूती देणारी निरीक्षणे सजीव करण्याला सहकार्य करते ते त्यांचे चिंतनशील व्यक्तिमत्त्व. माडगूळकर जेव्हा वानरांच्या संघर्षमय जीवनातील घटना–प्रसंग चित्रित करतात तेव्हा त्यातील कार्य–कारणभावांचा अन्वयार्थही लावू पाहतात. काही वेळा घटना–प्रसंगांच्या शेवटी तात्पर्यवजा किंवा निष्कर्षासारखे एखादे चिंतनात्मक, स्वगतात्मक वाक्य येते.

'कोणतीही घारिष्टाची गोष्ट करताना आणीबाणीचे क्षण अगदी थोडे असतात आणि सामोरे जाणं हीच खरी परीक्षा असते.' (पृ. १२)

'सत्ता हस्तगत करणं ही एकट्या–दुकट्याची कामगिरी नसते. दोन हात झोपडी उभारू शकतात. प्रासाद उभा करायचा तर हजारो हात लागतात.' (पृ. ३७)

'संघटित राहण्यासाठी खऱ्या वा काल्पनिक अशा शक्तीची धास्ती असावीच लागते.' (पृ. ४६)

वानरांचे स्वतंत्र जीवन, अनुभव चित्रित करताना मानवी आरोप कुठे न करता माडगूळकरांची अशी 'स्वगत' उत्स्फूर्तपणे येतात. वाचकाला अंतर्मुख करतात.

'सत्तांतर' ही वन्य जीवनानुभवाशी संबंधित कादंबरी असल्याने या कादंबरीत निसर्गाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. निसर्ग हा वानरांच्या जीवनाचा अवि-

भाज्य भाग आहे. निसर्गाच्या अंतरंगात एक विराट जीवनचक्र गतिमान आहे. या जीवनचक्राच्या गतीचे माडगूळकरांना आकर्षण आहे. जीवनाप्रमाणेच संघर्षही गतिमान असतो. जीवनसंघर्षात जुने नाहीसे होते आणि नवे जन्माला येते. जीवन वाहते राहते. 'जीवन', 'सघर्ष', आणि 'काळ' गतिमान असतात. 'सत्तांतर'मध्ये वानरांच्या जीवनात घडणाऱ्या दर साडेतीन वर्षांच्या सत्तांतराशी निसर्ग समांतर आहे. कथावस्तूशी एकरूप झालेला निसर्ग 'स्थिती–गती', 'लय–निर्मिती' हे सतत फिरणारे चक्र सूचित करतो. वानरांचा सत्तासंघर्ष सुरू होतो, तो उष्णकाळात. मार्च महिन्याचा सुरुवातीचा काळ. वानरांच्या संघर्षास, विनाशास पार्श्वभूमी लाभते ती उन्हाळ्याची. वर्षाऋतूच्या सुरुवातीला हा संघर्ष संपतो. सगळी सृष्टी नवनिर्मिती करू लागते. तरणीच्या पोटी असलेला 'मुडा'चा गर्भही जन्माला येतो. उन्हाळा, पावसाळा हे ऋतुचक्र सत्तांतराच्या संघर्षमय जीवनचक्राशी समकक्ष आहे. कादंबरीचा शेवट त्यामुळेच लक्षणीय ठरतो. 'जीवन', 'संघर्ष' आणि 'काला'ची गतिमानता तो सूचित करतो.

वानरांचे भावविश्व मर्यादित. 'संघर्ष' या एकाच सूत्राभोवती गुंफलेली कथावस्तू मर्यादित असल्याने, काही ठिकाणी तपशिलात्मक पुनरावृत्ती निर्माण होते. कादंबरीच्या सुरुवातीला इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांचे 'मनुष्य हा पशुकोटीतील प्राणी आहे व त्याचे जवळचे सगेसोयरे पशू म्हटले म्हणजे वानर होत.' हे अवतरण उद्धृत केले आहे. त्यामुळे वाचक मानवी वर्तणुकीच्या संदर्भातच वानरांच्या जीवनाचा, वर्तणुकीचा अर्थ लावू पाहतो. अवतरणाची चौकट टाळता आली असती, तर वानरांच्या भावविश्वाचा स्वतंत्र अर्थ अबाधित राहून, या अनोख्या वन्य अनुभवाचे अनेक संदर्भसूचकत्व अधिक विस्तारले असते. मानवेतर अनुभवविश्वाचा शोध घेणारी मराठी कादंबरी वाङ्मयातील पहिली प्रायोगिक कादंबरी म्हणून 'सत्तांतर'चे स्थान निश्चितच निर्विवाद आहे.–

–वि. रा. जोशी

'सत्तांतर' (कादंबरी)
मॅजेस्टिक प्रकाशन, गिरगांव,
मुंबई - ४०० ००४.
प्रथमावृत्ती - जुलै १९८२
पृष्ठे ७८ : मूल्य १५ रुपये

# रंगभूमी

## 'अग्निदिव्य'


वि. भा. देशपांडे

मच्छिंद्र कांबळी यांनी भद्रकाली नाट्यसंस्था काढून काही काळ लोटला. आरंभीच्या काळात त्यांनी प्राधान्याने मालवणी नाटकांचेच प्रयोग पेश केले; पण अलीकडे त्यांनी मालवणीव्यतिरिक्त नाटकांचे प्रयोग जाहीर केले आहेत. त्यामध्ये रत्नाकर मतकरी यांचे 'अग्निदिव्य' हे एक नाटक मोठ्या जाहिरातीच्या साहाय्याने पेश केले.

'अग्निदिव्य' हे काही वर्षांपूर्वी गाजलेल्या एका खटल्याचा आधार घेऊन उभे आहे. मात्र तो खटला (शैला लाटकर खून खटला) म्हणजे हे नाटक एवढ्याच अर्थाने मतकरींनी ते मर्यादित ठेवले नाही. त्याच्या कक्षा वाढवण्याचा यथाशक्ती प्रयत्न केला आहे; पण तो मर्यादेपर्यंतच साधला आहे. ज्या वेळी एखादा प्रसिद्ध खटला किंवा सर्व परिचित घटना नाट्यविषय म्हणून वापरली जाते त्या वेळी नाटककाराला त्याचा एक किमान फायदा मिळत असतो. त्यातल्या घटितांचा, व्यक्तींचा, तपशिलासह काही भाग प्रेक्षकांना ज्ञात असतो. प्रेक्षक अशा नाटकामध्ये आपल्याला पूर्वपरिचित असलेल्या घटना, व्यक्तींच्या तपशिलाच्या खुणा शोधीत असतो, त्यामध्ये जितके साम्य अधिक तितका तो नाट्यविषयाला अधिक जवळ जात असतो; पण याच प्रक्रियेचा उलटा भाग असा दिसतो की, जे आपल्याला पूर्वपरिचयाचे आहे, त्यापेक्षा नाटककाराने अधिक काही वेगळे सांगितले आहे का? वेगळे आहे ते कल्पित आहे, वास्तवाला भिडणारे, भासवणारे किती आहे? असे काही प्रश्न त्या निमित्ताने मनात उभे राहतात.

हुंडाबळी हे आजच्या समाजजीवनातील भयाण वास्तव आहे. या भीषण वास्तवाचे वृत्त जेव्हा आपण वृत्तपत्रांतून वाचतो किंवा खाजगीत ऐकतो तेव्हा काही क्षण स्तिमित, बधिर होऊन जातो. मग असे वाटत राहते की, अशा घटनेवर आधारलेले नाटक त्याहीपेक्षा बधिर करणारे, अस्वस्थ करणारे असणार! कारण तिथे दृश्यात्मक अनुभवाला सामोरे जायचे असते! असे बधिर होणे, अस्वस्थ होणे 'अग्निदिव्य'च्या संदर्भात घडले नाही. याचे मुख्य कारण हे नाटक बहुतांशपणाने निवेदन–कथन यामध्ये अडकून राहिले. त्याला दृश्यात्मकता लाभली ती अल्प प्रमाणात आणि तीही बऱ्याचदा पूर्वघटित दृश्यांच्या (फ्लॅश बॅक) रूपाने. दुसरे कारण म्हणजे जो छळ मृदुल या मध्यवर्ती व्यक्तिरेखेचा म्हणून अपेक्षित होता, तो छळ करणारी बनुताई सतर्क, सकारण स्तरांवर लेखनात उभी राहिलेली नाही. या बनुताईचे म्हणजे सासूचे आपल्या सुनेला छळणे ही जशी काही प्रमाणात पारंपारिक गोष्ट आहे, तशीच आणि तितकीच व्यक्तिगत कारणांचीही गोष्ट आहे. या बनुताईच्या व्यक्तित्वातील अमानुषता ही छळासाठी उपयोगी पडणारी गोष्ट मर्यादेपर्यंतच आहे. तिला याहीपेक्षा अधिक एकाग्र असे कारण हवे. तिच्या मुलाची–महेशची व्यक्तिरेखा तर नगण्यच ठेवली आहे. आई-वडील अगतिक होण्यापलीकडे काही करू शकत नाहीत असे आणि एवढेच दाखवावचे असेल तर ते व्यक्त होते आहे; पण ते नाटकाच्या उभारणीला फार मोठी मदत करू शकत नाहीत. तसेच पहिल्या दोन अंकांचे नाटक त्यांच्या घरात–अंगणात घडत असल्याने तिथल्या निवेदन-प्रतिक्रियांनीच नाटकाचा भाग मोठ्या

प्रमाणात व्यापला आहे. नाटक तिसऱ्या अंकात नवरा–सासू यांच्या घरी आल्यावर नाट्यविषयाच्या घडणीसाठी नाटककाराला घटितांची गती वाढवावी लागली. ती गती वाढल्याबरोबर नाट्य-परिणाम उणावण्यास आणखी मदत झाली. मूळ कथानकाला जोड म्हणून निर्मला या मृदुलच्या बहिणीच्या प्रेमाची–विवाहाची उपकथा सांगण्याचा प्रयत्न झाला आहे. या सर्वांचा परिणाम असा झाला की, दर्शनी नाट्यविषय आकर्षक असूनही त्याला आशय-घनता लाभली नाही. व्यक्तिरेखांना अर्थ-पूर्णता आली नाही. आजच्या भयाण समाज-जीवनातील एक समस्या आपण पाहतो आहोत. त्याने जे अस्वस्थ व्हायला हवे तसे झाले नाही. रंगमंचावर घटना–प्रसंग होत राहिले. प्रेक्षकांच्या मनात ते खोलवर रुजले नाहीत याला नाट्यलेखन प्राधान्याने कारणी झाले !



**एका महत्त्वाच्या प्रसंगात – चित्रा, विश्वास मेहेंदळे आणि सुलभा देशपांडे**

नाटलेखनातील अपुरेपण किंवा उणेपण भरून काढण्याचा यथाशक्ती प्रयत्न केला तो दिग्दर्शक आणि कल्पकारांनी. शेवटी त्यांच्याही काही मर्यादा आहेत, त्या प्रयोगाच्या मर्यादा ठरल्या ! दिग्दर्शक कमलाकर सारंग हा आता व्यावसायिक रंगभूमीवर एक जाणता दिग्दर्शक म्हणून मानला जातो. जशी त्याने तेंडुलकरांची नाटके जितक्या धिटाईने–जाणतेपणाने दिग्दर्शित केली आहेत, तितक्याच गुणवत्तेने रत्नाकर मतकरींचीही नाटके केलेली आहेत. विशेषत: 'जोडीदार', 'खोल खोल पाणी' इत्यादी. दिग्दर्शक म्हणून त्यांनी 'अग्निदिव्य'च्या संदर्भात जो कार्यभाग करावा अशी अपेक्षा होती ती घडलेली दिसत नाही. नाही तर रंगाकृतीत लेखना-तले इतके ढोबळपण निश्चितच राहिले नसते. हे का घडू शकले नाही ते सारंग आणि मतकरीच जाणोत !

या नाटकातील कलाकारांचा अभिनय ही एक जमेची बाजू आहे. विशेषत: सुलभा देशपांडेने उभी केलेली बनुताईची भूमिका दीर्घकाळ ध्यानात राहणारी आहे. या भूमिकेसाठी तिने केलेली वेशभूषा वेगळी तर होतीच; पण चष्म्याचा वापरही निराळे व्यक्तिमत्त्व उभे करण्यास कारणी झाला. सुलभाने केलेला मुद्राभिनय, त्यातही डोळ्यांचा केलेला वापर, आवाजातील चिरकेपण आणि रंगमंचीय जलदगती हालचाली यामुळे तिच्या व्यक्तिरेखेतील अनेक बारकावे तपशिलासह अभिव्यक्त झाले. तिच्या अभिनयातील गुणवत्ता जितक्या आधिक्याने जाणवत होती त्याच वेळी तिची व्यक्तिरेखा लेखनात अधिक खोलवर जाऊन सतर्क किंवा तर्कसंगत, सकारण उभी नाही हेही जाणवत होते. त्यामुळे तिच्या अभिनयाला आव्हान अधिकच मोठे होते. तिच्यानंतर लक्षवेधी वाटली ती अनुराधा तोवर. तिने मृदुल या व्यक्तिरेखेतील अनेक बारकावे आपल्या अभिनयाने व्यक्त केले. आवाज, मुद्रा-भिनय याबरोबरच तिला असलेली जाण-कारीही लक्षात येत होती. व्यावसायिक नाटकात तिला निश्चितच एक भवितव्य आहे, अशा खुणा तिने या भूमिकेच्या अभिनयातून निर्माण केल्या आहेत. सुप्रिया मतकरी, विनय पांडे यांनी आपल्या वाट्याला आलेले प्रवेश यथायोग्य केले; पण त्यांना तसा अभिनयाला अधिक वाव नव्हता. विश्वास मेहेंदळे आणि बाळ कर्वे यांनी आपल्या भूमिका चोख केल्या. विश्वासने आवाजाचा अतिरिक्त वापर कमी करायला हवा. बापाची अगतिकता त्याने परिणामकारीरीतीने व्यक्त केली. बाळ कर्वेने इतक्या वर्षांच्या अनुभवाच्या बळावर सोपारकर ही व्यक्तिरेखा लेखनात काहीशी उपरी असूनही चांगली केली. विलास गुर्जरांचा प्रधान चांगला वाटला. चित्रा या चित्रपटतारकेने व्यावसायिक नाटकात माझ्या माहितीप्रमाणे बऱ्याच वर्षांनी काम केले. अनुभवाचे सातत्य नस-ल्याने त्यांचा शब्द प्रेक्षकांपर्यंत पोहोचणे अवघड जात होते.

नेपथ्य, प्रकाश आदी गोष्टी ठीक होत्या; पण दुसऱ्या आणि तिसऱ्या अंकांमध्ये नेपथ्यबदलाचा वेळ प्रेक्षकांच्या सहनतेची कसोटी पाहणारा ठरतो, तसे होणे चांगले नाही.

¤

ग्रामीण भागात
डॉक्टर्स नेण्याचा प्रयत्न
भारतात प्रथम
डॉ. आयडांनी केला.
त्यांच्या त्यागमय
जीवनाची कहाणी.

**डॉ. आयडा स्कडर**

सौ. वीणा गवाणकर

बावीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे - ३०.

वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे प्रेरणादायी
चरित्र.

**एक होता कार्व्हर**

सौ. वीणा गवाणकर

तीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे - ३०.

प्रतिकूल निसर्ग
जीवघेणी उपासमार
सहकाऱ्यांचे मृत्यू
भयाण एकाकीपणा, त्यावर
मात करून, चार हजार मैलांची
पायपीट करून ते कैदी
भारतात पोचले.
कसे ?
दुसऱ्या महायुद्धातील
एक चित्तथरारक पलायन कथा.

**मला निसटलंच पाहिजे !**

अनुवाद : श्रीकांत लागू

वीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

एका बाजूने
रशियन रणगाडे
झेपावत असताना,
कोणत्या जीवनमूल्यांना
आवाहन करून वालेसाने
पोलिश जनतेचा
लढा उभा केला ?

त्या लढ्याचे चित्रण -
मराठीत प्रथमच.

**लेक वालेसा**

डॉ. श्रीकांत मुंदरगी

बावीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे - ३०.

श्याम बेरकी आहे
तसाच मिश्किल.
तो मध्यम आकाराचा,
मध्यम विकारांचा, मध्यम
वर्गातला, मध्यम बुद्धीचा आहे.

त्याच्या संसार कथा.

**काही दिवस श्यामचे काही राधाचे**

फिरोझ रानडे

पंचवीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे - ३०.

# नाट्यपंढरी



## ☐ बोडसांचा कोट बालगंधर्वांना !

गडकऱ्यांची प्रेमसंन्यास नि पुण्यप्रभाव ही दोनच नाटके त्यांच्या हयातीत रंगभूमीवर आली. पहिले प्रेमसंन्यास महाराष्ट्र नाटक मंडळीच्या रंगभूमीवर, तर दुसरे पुण्यप्रभाव किर्लोस्कर संगीत मंडळीच्या रंगभूमीवर. बाकीची तिन्ही नाटके—भावबंधन, एकच प्याला नि राजसंन्यास ही त्यांच्या मृत्यूनंतर रंगभूमीवर आली. ( वेड्यांचा बाजार हे त्यांचे प्रहसन ) ही पित्याविना पोरकी पोरे फार फार गुणी नि पराक्रमी. आपल्या जन्मदात्याचे नाव अजरामर करणारी, चिरंजीव करणारी. याचा अर्थ असा नव्हे, की पहिली दोन कमी गुणी होती. तीही तशीच गुणी; पण त्यांचे बोट धरायला,ती चार-पाच वर्षांची होईतो का होईना, त्यांचा पिता हयात होता. त्यांच्या पाठीवर त्याच्या प्रेमाचा हात फिरला होता.

गडकऱ्यांच्या साऱ्याच नाटकांनी मराठी माणसाला अपूर्व आनंद दिला. एकेक नाटक असे विक्रमी, की एकेका नाट्यसंस्थेचा जणू प्राण. हुकमी एक्का ! हा खेळ लागला की, पैशांचा पाऊस पडावा. कंपनी साऱ्या अडचणीतून मोकळी व्हावी.कंपनीच्या पन्नास-पाउणशे माणसांच्या कुटुंबावर आनंद फुलावा. भावबंधन हे ‘ बलवंत ’ चे बलस्थान तर एकच प्याला ‘ गंधर्व ’ ची कीर्ति! पुण्यप्रभाव, ‘ ललितकले ’ चा अडखळणारा रथ सावरणारी पुण्याई !

असे सांगतात, की गडकरी एकदा बालगंधर्वांना म्हणाले होते, ‘नारायणराव, आजपर्यंत तुम्ही भरजरी शालू-शेल्यात रंगभूमीवर मिरवलात. किर्लोस्कर-देवल-खाडिलकरांची शब्दकळा सावरलीत; पण मी माझ्या नाटकात तुम्हाला फाटक्या पातळात रंगभूमीवर आणणार आहे !’ त्याचीच परिणती, म्हणजे काळजाची कालवाकालव करणारे, समर्थ शब्दलेणे—एकच प्याला ! एकच प्याला रंगभूमीवर आले नि खरोखरच सिंधूच्या रूपाने गंधर्वांचे एक अगदी वेगळेच दर्शन घडले !

हे नाटक मास्तरांनी गणपतराव बोडसांसाठी लिहिले होते. त्यातला गद्यप्रमुख सुधाकर हा खास गणपतरावांसाठीच लिहिला होता; पण झाले मात्र उलटे ! नाटक रंगभूमीवर आले नि तेजस्वी, साध्वी सिंधूचे ( बालगंधर्वांचे ) झाले, सुधाकराचे राहिले नाही. बोडसांवाचून अडले नाही. म्हणून एकदा अभिनयश्रेष्ठ चिंतामणराव कोल्हटकर म्हणाले, ‘ गणपतराव, मास्तरांनी माप घेतले तुमचे; पण कोट बसला नारायणरावांना !

## ☐ मोबदला घेणार नाही !

बालगंधर्वांना घडविण्यात, त्यांच्या यशात काकासाहेब खाडिलकरांचा सिंहाचा वाटा होता. बालगंधर्व म्हणजे, भामिनी, देवयानी, रुक्मिणी, द्रौपदी, मेनका, सावित्री या सगळ्या काकासाहेबांच्या नायिका. या भूमिकांनी गंधर्वांचे कलाजीवन संपन्न झाले, वैभव चढले; पण द्रौपदी नाटक रंगभूमीवर आले नि बालगंधर्वांना कर्ज झाल्याचा गवगवा सुरू झाला. कर्ज झाले ही गोष्ट खरी; पण ते द्रौपदी पडले म्हणून नाही; तर नारायणरावांनी त्या नाटकाच्या उभारणीसाठी साक्षात मयसभा उभारून हजारो रुपयांची उधळण केली म्हणून ! शिवाय कलासक्त नारायणरावांनी आयुष्यात कर्जाचा कधी विचार केला होता ? जे हवे ते हवेच. त्यात काहीही कमी होता कामा नये. कलेचा आविष्कार, कर्जाच्या कुंपणात त्यांनी कधीच बंदिस्त केला नाही, हाच त्या थोर कलावंताचा स्थायीभाव होता. म्हणूनच बालगंधर्व ते बालगंधर्व !

हे सगळे माहीत असले, तरी आपल्या ‘ द्रौपदी ’ मुळेच नारायणरावांना कर्ज झाले हा लोकापवाद काकासाहेबांना सहन होईना. त्यांनी स्वच्छ सांगून टाकले की, ‘ नारायणरावांचे कर्ज फिटेपर्यंत नाटकाचा मोबदला घेणार नाही !’ नि खरोखरच नाटकाचे कर्ज फिटेपर्यंत त्यांनी मानधन घेतले नाही !

## ☐ तालमीला उभा रहा !

काकासाहेब खाडिलकर हे ‘ महाराष्ट्र नाटक मंडळी ’ चे दैवत. त्याच कुटुंबात केशवराव दाते लहानाचे मोठे झाले. ‘कीचक वधा ’ वरची बंदी उठली नि ते दात्यांच्या अमदानीतच पुन्हा रंगभूमीवर आले.या नाटकाच्या खास तालमी घेण्यासाठी काकासाहेब कंपनीच्या मुक्कामी नाशिकला आले. केशवराव तालमीला हजर होते; पण त्या नाटकात भूमिका करीत नव्हते. तालमीच्या वेळी काकासाहेब काही बोलले नाहीत; पण तालीम आटोपल्यावर दात्यांना बाजूला घेऊन म्हणाले, ‘ हे रे काय, या नाटकात तू काम करणार नाहीस ? ’ त्यावर दाते भीत भीत म्हणाले, ‘ माझा आवाज चालत नाही. घशाला फार ताण पडतो. ’ लगेच काकासाहेब करारी आवाजात म्हणाले, ‘ ताण पडलाच पाहिजे. उद्यापासून भीमाच्या कामाला उभा रहा !’ दुसऱ्या दिवसापासून दाते तालमीला उभे राहू लागले. केशवरावांचा भीम पुढे खूप गाजला. याला म्हणतात नाटककाराची—गुरूची जरब नि नटाची विनयशीलता—आज्ञाधारकता !

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage–No. 11 ) Regd. No. PNCW–28

